वाल्मीकीचा जय.

लेखक

वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.

प्रकाशक

ए. सी. भट आणि मंडळी.

बुधवार, पुणे-सिटी.

किंमत ८ आणे.

वाल्मीकीचा जय

[महामहोपाध्याय श्री हरप्रसाद शास्त्री एम. ए.
यांच्या ' वाल्मीकीर जय ' नामक सुप्रसिद्ध
बंगाली पुस्तकाचें मराठी भाषांतर.]

भाषांतरकर्ता

वासुदेव गोविंद आपटे बी. ए.

संपादक आनंद.

प्रकाशक

ए. सी. भट आणि मंडळी

बुधवार पेठ, पुणें.

मुद्रक

केशव रावजी गोंधळेकर ' जगद्धितेच्छु ' छा० पुणें.

१९१०

अनुक्रमणिका.

प्रस्तावना.

'सृष्टि निर्माण केल्यावर थोड्याच दिवसांनीं देवांनीं असें जाहिर कलें कीं, अमुक दिवशीं समग्र पृथ्वीची वांटणी आपआपल्या मर्जीप्रमाणें करून घेण्याची आह्मी मनुष्यांस परवानगी देऊं. नेमलेला दिवस आल्याबरोबर सर्व सुपीक जमिनी शेतकऱ्यांनीं घेतल्या. व्यापारी लोकांनीं सर्व रस्ते आणि समुद्र पटकाविले; तपस्वी लोकांनीं डोंगर आपल्या वांटणीस घेतले; सरदार लोकांनीं शिकारीकरितां जंगलें घेतलीं; राजे लोकांनीं कर वसूल करतां यावे ह्मणून पूल व खिंडी घेतल्या; या वांटणीच्या वेळेस गहन विचारांत गुंग असल्यामुळें कवि मात्र हजर नव्हता. तो येऊन पाहतो तों सर्व वांटणी होऊन गेली होती. आपल्यास कांहींच उरलें नाहीं म्हणून तो रडूं लागला. आतां काय करावें ? आपणास देण्यासारखें आतां देवाचे जवळ कांहींच नाहीं. ही त्याची स्थिति पाहतांच देव त्यास ह्मणाले, "बाबा, रडूं नको, ये आणि या निळ्या आभाळांत आमच्या पाशींच रहा. जेव्हां जेव्हां तुला यावेंसें वाटेल तेव्हां स्वर्गाचें दार तुला खुलेंच आहे." कवीनें ही त्यांची देणगी स्वीकारिली, परंतु सध्यांच स्थानत्याग करण्याचें त्यास कारण नव्हतें. जेव्हां त्याचे मनास कांहीं काळजी किंवा चिंता नसेल आणि तो खुषींत असेल तेव्हां सुस्वर लावलेल्या वाद्याप्रमाणें स्वर्गच पृथ्वीवर आणण्याचें सामर्थ्य त्याच्या मनास प्राप्त झालेलें होतें.'

पाश्चात्य वाङ्मयांतील या दंतकथेंत कवीचें आणि काव्याचें सर्व रहस्य खचलें आहे; कवीला स्वर्गद्वार हवें तेव्हां खुलें आहे, किंवा या मर्त्यभूमीसच स्वर्ग बनविण्याची जादूची कांडी कवीचे हातांत असते असें ह्मणण्याहून कवीची महती अधिक काय वर्णितां येईल ? इहलोकींच्या आधिव्याधि सर्व विसरून जाऊन केवल उपाधिरहित आध्यात्मिक सुखाचा आस्वाद सहृदय मनुष्याचे मनास देऊन तेवढ्या कालापर्यंत तरी स्वर्गसुखाच्या अनुभवाची प्रतीति करून देणाऱ्या कविकृतीची

थोरवी वर सांगितल्याहून अधिक वानणें शक्य नाहीं. विश्वामित्र ऋषींनीं तपोबलानें प्रतिसृष्टि निर्माण केल्याचें हृदयंगम वर्णन पुढील ग्रंथांत क्रमाक्रमानें येणारच आहे. त्यांत सूर्यमण्डलाचे, किंबहुना अनेक सूर्यमालेचेही, पलीकडे जाऊन तेथील अनुपम शोभेचें चित्र रेखाटण्याची दिव्य शक्ति कवीचे अंगीं असते याची साक्ष वाचकांस पटेल, व कवींना सृष्टीचें विधातृत्व रसिकांनीं यथार्थ दिलें आहे, अशी मनाची खात्री होईल.

" वाल्मीकीर् जय " या नांवाचा मूळ बंगाली ग्रंथ सुमारें ३० वर्षांपूर्वीं महामहोपाध्याय पंडित हरप्रसाद शास्त्री एम. ए. यांनीं लिहिला. जेव्हां हा मूळ ग्रंथ प्रसिद्ध झाला, तेव्हांच या ग्रंथाचें व ग्रंथकाराचें कौतुक सहृदय वाचकांनीं " कलकत्ता रिव्ह्यु " नांवाच्या आंग्ल त्रैमासिकांत केलें. प्रोफेसर सील या प्रसिद्ध पण्डितजींनींही ह्या ग्रंथाच्या अनेक गुणांची प्रशंसा करून पाश्चात्य वाङ्मयांतील अशाच प्रकारच्या ग्रंथांशीं याची तुलना करून प्रस्तुत ग्रंथ त्याहून अधिक सरस आहे असें आपलें मत आपल्या टीकात्मक इंग्रजी लेखांत प्रसिद्ध केलें. त्या टीकांचा सविस्तर अनुवाद न करतां महाराष्ट्रवाचकांस त्या टीकांचें सार मात्र येथें सादर करतों.

१ " पण्डित हरप्रसाद शास्त्री यांची ही कृति खरोखरच फार उदात्त आहे. या काव्यांतील भाव विशुद्ध आणि प्रौढ आहेत; भूमिका उभय लोकांतील तुंग शिखरांनीं खचल्या आहेत; भाषारीतींत पराकाष्ठेचें ओज भरलें आहे; आणि प्रतिभा इहलोकांतील आणि स्वर्गांतील अत्युच्च गिरिशिखरांहूनही उंच भरारी मारीत आहे; या कृतींतील विश्वामित्र हें पात्र ह्मणजे प्रतिभाशक्तीची अद्भुत व मनास थक्क करून टाकणारी कृति आहे. "

२ " बुद्धि आणि शारीरिक शक्ति या दोहींहून नीति श्रेष्ठ आहे हें त्रिकालाबाधित सत्य प्रस्थापित करणें हेंच " वाल्मीकीर् जया " चें प्रधान रहस्य आहे असें ह्मटल्यानें त्या कृतीचें यथार्थ वर्णन

होत नाहीं. नीतीची गंभीरता व तिची विश्वव्यापकता या कृतींत पदोपदीं दृग्गोचर होत आहेच, पण पौराणिक कथांचें बीज व कल्पनासृष्टीचे एकामागून एक येणारे देखावे हेंच या काव्यप्रबंधाचें सार आहे. कल्पनासृष्टींतून इतका शोभायमान चित्रपट अजून कोणींही काढिला नाहीं. एकंदर मांडणीची भव्यता, नैसर्गिक स्वातंत्र्याची क्षणोक्षणीं होणारी प्रतीति, निर्माणशालि प्रतिभेची केवळ उन्मादावस्था, निरनिराळ्या घटकांची सुसंबद्धता, चित्रपटाची विशालता व प्रत्येक पात्राची अनुरूप चेष्टा आणि चित्तवृत्ति ह्या गुणांत या प्रबन्धाची बरोबरी पाश्चात्य वाङ्मयांतही होणार नाहीं. ह्या चित्रपटास हिमालयाची भव्यता आहे. प्रतिसृष्टि निर्माण करणारा व स्वर्गांतून पतन पावणारा विश्वामित्र ह्या चित्रपटांतील गौरीशंकर शिखर होय. आकाशगंगेच्याही पलीकडून हिमालयाच्या शिखरावर ऋभूंचें अवतरण हें कांचनगंगा शिखर होय आणि विराट्मूर्तींचें दर्शन हें या विशाल पर्वतराजींतील धवलगिरि शिखर होय. ”

मार्मिक टीकाकारांच्या या प्रशंसापर उद्गारांत भर घालणें कठिण आहे. महाराष्ट्रवाचकांस ह्या टीकेच्या सत्यतेची प्रतीति होईलच. गद्यकाव्याच्या दृष्टीनें हा ग्रंथ अद्वितीय आहे याविषयीं कोणीही वाद करणार नाहीं. परंतु दुसऱ्या एका दृष्टीनेंही या प्रबन्धाचें महत्व फार मोठें आहे.

विश्वामित्राचा आणि वसिष्ठाचा कलह सर्व हिंदु वाचकांस माहित आहे. या कलहाचें प्रमेय बुद्धिमान् पुरुषांनीं निरनिराळ्या प्रकारें काढिलें आहे. परलोकवासी न्यायमूर्ति रानडे यांनीं या कलहांत प्रचलित सामाजिक सुधारणेचें बीज आहे असें प्रतिपादन केलें. पंडित हरप्रसाद शास्त्री हे प्रतिभासंपन्न कोमल अंतःकरणाचे कवि आहेत; ह्मणून केवल सामाजिक सुधारणेकडेसच यांचा ओढा नसून सर्व मनुष्यजातीच्या उन्नतीकरितां यांच्या अंतरात्म्यास तळमळ वाटत असल्याकारणानें त्यांनीं रानड्यांच्याही पुढें धांव मारली आहे. यच्चावत् मनुष्य जातींत भ्रातृभाव कसा उत्पन्न होईल हेंच वसिष्ठविश्वामित्राच्या कलहाचें इंगित

आहे व प्रेमयुक्त वाणीनें लोकांचीं अंतःकरणें सद्गदित करूनच असा भ्रातृभाव उत्पन्न करितां येईल असा मनाशीं निश्चय करून तदनुरूप संविधानकाची त्यांनीं रचना केली आहे. कवितादेवीच्या आद्य पुत्रानें ह्मणजे श्रीवाल्मीकीनें श्रीरामकथेच्या द्वारें भ्रातृभावाचें प्रेमामृत अखिल मनुष्यजातीस पाजावें अशी योजना वसिष्ठ आणि विश्वामित्र यांचेकडून कवीनें करविली आहे, ती वरील दृढविश्वासाचेंच फल होय. या एकाच भरारीवरून पण्डितजींच्या प्रतिभेचें अचाट सामर्थ्य ध्यानांत येईल व कवींना स्वेच्छेनें स्वर्गांत संचार करतां येतो अशी जी दंतकथा आरंभीं सांगितली आहे तिची प्रतीति पटेल.

वसिष्ठासारखा विद्यातपोनिधि–केवल ब्रह्मनिष्ठ ऋषि, विश्वामित्रा-सारखा अतुलनिधि चक्रवर्ती राजा, व वाल्ह्याकोळ्यासारखा क्रूर लुटारू वाटमाऱ्या या तिघांचीही चित्तवृत्ति एकसमयावच्छेदीं उचंबळून जावी व तिघांनींही भ्रातृभाव स्थापित करण्याच्या उद्योगास प्रवृत्त व्हावें, यालाही कांहीं हेतु पाहिजे. ही हेतूची उणीव भरून काढण्याकरितां ऋभूंच्या अवतरणाची व त्यांच्या मधुर गायनाची कल्पना केली. ही एक प्रतिभेचीच कृति होय. बंगाली टीकाकारांनीं वाखाणिलेल्या या चित्रपटपरंपरेंत दृष्टीस पडणारें संविधानकचातुर्य वर्णित बसल्यास ही प्रस्तावना कंटाळवाणी होईल ह्मणून हें दिग्दर्शन येथेंच पुरें करितों.

रामायण हें आदिकाव्य आहे, तसेंच तो धर्मग्रंथ आहे अशीही लोकांची दृढश्रद्धा आहे; आणि काव्याच्या दृष्टीनें रामायणाच्या उत्प-त्तीचें बीज दाखविण्याचा पण्डितजींचा उद्देश होता असें जरी मानलें, तरी लोकांची श्रद्धा शिथिल करण्यासारखा प्रकार कवीचे हातून झालेला नाहीं हेंही अभिनंदनीयच आहे.

सर्व मनुष्यांनीं एकमेकांवर सख्ख्या भावंडाप्रमाणें प्रीति करावी हें रामायणाच्या रचनेचें मूळ आहे, असा पण्डितजींचा अभिप्राय आहे हें वर सांगितलेंच आहे. असाच रामायणरचनेचा उद्देश होता असें जरी वाचकांचें मत झालें नाहीं, किंवा पण्डितजींचा अभिप्रेत अर्थ त्यांच्या कृतीनें सिद्ध झाला नाहीं असेंही जरी कोणास वाटलें,

तरी त्यामुळें या काव्यप्रबन्धाच्या रसाची कांहीं हानि होत नाहीं. श्रीरामचंद्राच्या अवतारकृत्याचें सर्वपरी मनासारखें समाधान या ग्रंथानें होत नाहीं असेंही मानण्यास अवकाश आहे. तथापि श्रीरामाचें चरित सर्व अंगांनीं आदर्शभूत आणि अनुकरणीय झालें आहे असा ठसा वाचकांचें मनावर उठण्यास हें पुस्तक एक नवीन साधन झालें आहे, असें मला वाटतें.

पण्डितजींचा काव्यप्रबन्धाचा खरा हेतु वर सांगितलाच आहे. वाल्मीकीची प्रशस्ति अशा अर्थाचें नांव जरी या गद्यकाव्यास दिलें आहे, तरी बल आणि मति यांहून नीति श्रेष्ठ आहे; शारीरिक शक्तीनें, बुद्धीच्या आणि ज्ञानाच्या सामर्थ्यानें जी गोष्ट दुष्कर आहे तीच नीतिप्रभावानें साध्य होते; किंवा बाहुबलानें किंवा डोक्यानें जी गोष्ट होत नाहीं ती अंतःकरणानें होते; हें दाखविण्याकरितां वसिष्ठ आणि विश्वामित्र हीं पात्रें अनुक्रमें मानसिक आणि शारीरिक शक्तींचे निदर्शक कल्पून त्यांचेकडून नीतिबलाचा निदर्शक वाल्मीकि याचें साहाय्य मागविलें आहे.

हें काव्य शब्दसृष्टींतील भव्य चित्रपटाची परंपरा आहे असें वर सांगितलेंच आहे. प्रत्येक पोटभाग हा एक एक स्वतंत्र चित्रपट असून प्रत्येक खंड या चित्रपटांतील निरनिराळ्या देखाव्यांचें समग्र स्वरूप प्रकट करतो. ह्या सर्व चित्रपटांची शोभा वर्णन करण्याचें कारण नाहीं. तथापि त्यांतल्यात्यांत हिमालयाचे शिखरावर ऋभूंचें अवतरण, त्यांचें गायन व त्या गायनानें झालेली वस्तुजाताची तल्लीनता, वसिष्ठ ऋषींचा आश्रम, नन्दिनीचें स्वर्गारोहण व विश्वामित्राची निराशा, त्याची उग्र तपश्चर्या व प्रतिसृष्टि, त्याचें अधःपतन, वाल्मीकीची एकतानता व शेवटल्या खंडांतील विराट्स्वरूपदर्शन आणि यावच्चंद्रदिवाकरौ रामकथेच्या उद्घोषणाकरितां वाल्मीकीनें केलेला स्वर्गसुखाचाही परित्याग, हे चित्रपट मनावर चिरस्थायी संस्कार केल्याशिवाय राहणार नाहींत. ज्ञान, तपश्चर्या, इत्यादि साधनांची मूर्ति अनन्यभावानें विराट पुरुषाला शरण गेल्याशिवाय होणें नाहीं, अशा अर्थानें भगवद्गीतेंत

वर्णिल्याप्रमाणें " नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते नमोस्तु ते सर्वत एव सर्व " इत्यादि उपसंहार अंतःकरण भक्तिप्रवण करून वाचकांचे मनावर पावित्र्याचा संस्कार करतो, आणि हें पुस्तक हातांतून खालीं ठेवतांना आपण एका परम शुद्ध, परम सात्विक व भक्तिमान् मनुष्याचा निरोप घेत आहों असें वाटतें. ज्या वाल्मीकि ऋषीनें सर्व जगाचे कल्याणाकरितां आदर्शभूत हें श्रीरामचरित रसाळवाणीनें कथन केलें, तो वाल्मीकि या भरतखंडांतच जन्मला, व त्याचे गुणानुवाद मधुरवाणीनें गाणारे पण्डित हरप्रसाद शास्त्री हेही आपले बन्धूच आहेत, हें आपलें महाभाग्य आहे व यांतच आपलाही धन्यवाद आहे असें वाचकांस वाटल्यावांचून राहणार नाहीं.

बंगाली टीकाकारांनीं या गद्यग्रंथास काव्य अशी संज्ञा दिली आहे व ती सर्वथैव यथार्थ आहे असें वाचकही कबूल करतील. " रसात्मक वाक्य " असें साहित्यशास्त्रकारांनीं काव्याचें लक्षण केलें आहे. रस हाच काव्याचा आत्मा व पद्यरचना अथवा छंदोबन्ध हा त्याचा ऐच्छिक देह मात्र आहे. लाघव, स्मृतिसौलभ्य, संगीतानुकूलता व तदनुषंगानें मनोवेधकता इत्यादि गुण पद्यरचनेमुळें काव्यास प्राप्त होतात ही गोष्ट खरी आहे; तथापि काव्यरसाचे अव्याहत प्रवाहास गद्यांत जसा व जितका अवकाश मिळतो, तसा व तितका पद्यरचनेच्या नियमबद्ध पद्धतींत मिळत नाहीं असा पुष्कळांचा अनुभव आहे. गद्य-ग्रंथांत विशेषतः चरित्रादि वर्णनात्मक ग्रंथांत क्वचित् असे काव्यास शोभणारे चटकदार प्रसंग आढळतात; परंतु आरंभापासून शेवटा-पर्यंत केवळ रसोदधींतच पोहण्याचा अनुभव येण्यासारख्या गद्यग्रंथाची काव्यांत गणना करण्यास साहित्यशास्त्राचा प्रत्यवाय नाहीं.

" वाल्मीकीचा जय " या भरतभूमींत पूर्वींच झाला आहे. दक्षि-णेंत कन्याकुमारीपासून अयोध्येपर्यंत हजारों तीर्थें व मंदिरें, सरोवरें व वनें श्रीरामचरिताच्या पावित्र्याची साक्ष देत आहेत. श्रीराम अमुक मार्गानें गेले, त्यांनीं अमुक ठिकाणीं अमुक केलें, सीतादेवीनें अमुक कुंडांत स्नान केलें, फार तर काय, तिनें अमुक ठिकाणीं रोट

भाजले व खाऊन राहिले ते अमुक ठिकाणीं टाकले इत्यादि आख्या-यिकांनीं भरतखंड दुमदुमत आहे. हा सर्व वाल्मीकीच्या रम्य कृतीचाच प्रभाव !

लंकापतेः संकुचितं यशो
यत्कीर्तिपात्रं रघुराजपुत्रः ।
स सर्व एवादिकवेः प्रभावो
न कोपनीयाः कवयः क्षितीन्द्रैः ॥

ही बिल्हणाची उक्ति सर्वथा सत्य आहे.

योगीन्द्रश्छन्दसां स्रष्टा रामायणम
वल्मीकजन्मा **जयति** प्राच्यः प्रा[illegible]ुनिः ॥

अशा गोड शब्दांनीं दुसऱ्या एका सहृद[illegible] कवीनें वाल्मीकीचा जयजयकार पूर्वींच केलेला आहे.

वाल्मीकीच्या जयाचीं हीं बाह्य स्मारकें अनेक आहेतच; परंतु रामायणकथेचा मनुष्यांचे अंतरंगावर घडणारा संस्कार याहूनही बलवत्तर आणि चिरस्थायी आहे. उदेपूरचा महाराणा श्रीलाखाजी (सन १३८३–१३९८) यानें जेव्हां द्वितीयसंबंध केला आणि या द्वितीयसंबंधास विघ्न येऊं नये म्हणून भीष्माप्रमाणें त्याच्या ज्येष्ठ पुत्रानें राज्याचा परित्याग केला, तेव्हां—

रघुकुलरीति सदा चाल आई
प्रान जायें पै वचन न जाई ।

असे उद्गार काढून त्यानें बापास आपल्या एकवचनीपणाचें आश्वासन दिलें हें वाल्मीकिच्याच जयाचें एक उदाहरण होय. श्रीरामाचें सर्व चरित उदात्त आहेच. पण त्यातले त्यांत त्याचें एकवचनीत्व व एकपत्नीत्व या दोन कडक व्रतांचा लोकांचे मनावर अदृश्य! पण शाश्वतिक संस्कार किती झाला आहे हें सांगणें कठिण आहे. सीतादेवीचें पातिव्रत्य, तिची सहनशीलता, तिचें विशुद्ध सात्विक वर्तन ह्यांचाही आपल्या

देशभगिनींच्या अंतर्यामावर जो परिणाम झाला आहे त्याचा पाश्चात्य पंडितांनीं ही गौरव केला आहे ! हा ही वाल्मीकीचा जयच नव्हे काय?

प्रस्तुतचें मराठी भाषांतर मळ बंगालीवरून आपले रसिक मित्र रा. रा. वासुदेव गोविंद आपटे यांनीं केलेलें आहे. साहित्यसेवेला ज्यांनीं आपणास वाहून घेतलें आहे व प्रतिमासीं बालकांस जे 'आनंदा' ची मेजवानी देत आहेत, त्यांनींच आबालवृद्धांकरितां हें अपरूप बंगाली पक्वान्नाचें ताट वाढून तयार केलें आहे. त्याचा स्वाद व त्याची रुचि माझ्या महाराष्ट्रबन्धूंस आवडो व त्याच्या सेवनानें त्यांचें सात्विक बल वाढो एवढीच माझी ईश्वरापाशीं प्रार्थना आहे.

मरहट्ट-वाग्उपवनीं गुणाधिका
फुलती मनोज्ञ नव काव्यवाटिका ।
धरुं मूल ही हि सुकुमार वेल्लिका
नववङ्गदेश्य कवितामतल्लिका ॥ १ ॥

गणेश जनार्दन आगाशे.

वाल्मीकीचा जय.

खंड पहिला.

१

हिमालय.

वर्षाऋतु संपून शरद्‍ऋतूला प्रारंभ झाला आहे; आकाश अगदीं स्वच्छ निरभ्र आहे; नभोमंडलांत सर्वत्र नीलवर्ण—गाढ नीलवर्ण—भरला आहे; आणि मनाला मोहित करणाऱ्या अशा त्या नीलवर्णांतून मध्येंच मोठाल्या चांदण्या आणि तारे चम्‌चम् चमकत आहेत; तारकापुंजांतून जाणाऱ्या आकाशगंगेच्या ओघानें आकाश दुभंग केलें आहे; आणि शेवटीं तो ओघ स्वतःच दुभंग झालेला आहे; पृथ्वीतलावरची आर्द्रता जाऊन तें बहुतेक शुष्क झालें आहे; लतावृक्षांवर पालवी येऊन तीं टवटवीत दिसूं लागलीं आहेत; आणि त्यांचा हिरवा रंग जणूं काय पृथ्वीची नवयौवनसंपन्नता सूचित करीत आहे; वर गाढ नीलरंग, खालीं गहिरा हिरवा रंग आणि मध्यें जेथें त्या दोहोंचा संगम झालेला आहे तेथें जणूं

काय अप्रतिम कौशल्यानें काढलेलीं हीं दोन चित्रें एकाच चवकटींत बसविलीं असून मध्यें प्रेक्षकांसाठीं थोडीशी जागा राखून ठेविलेली आहे!

आकाश अगदीं निरभ्र आहे, आणि वावटळीमुळें उडणाऱ्या धुराळ्याचें नांव नाहीं, अशा वेळीं-अशा या शरदृतूंत-हिमालयाची अप्रतिम शोभा कोणीं अवलोकन केली आहे काय? एका बाजूला शतयोजनव्यापी विस्तृत, समवर्ती, हिंदुस्थानदेश अफाट पसरलेला आहे, आणि दुसऱ्या बाजूला पहावें तों पर्वताच्या एका रांगेच्या मागें दुसरी रांग आणि तिच्या मागें तिसरी, चवथी, या प्रमाणें लागलेल्या आहेत; आणि बर्फानें आच्छादिलेल्या पलीकडच्या पहाडाकडे तर पाहण्याची सोय नाहीं! त्या स्वच्छ आणि शुभ्र अशा बर्फावर सूर्यकिरण पडून त्यांचें परावर्तन झाल्यामुळें जिकडे तिकडे त्यांचें तेज झळाळत आहे. जणूं काय राजपुत्राच्या आगमनोत्सवप्रसंगीं विशाल नगरींतून नानावर्णरंजित अशा दीपमालाच उभ्या केल्या आहेत! पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे दृष्टि फेंकावी तर पर्वतशृंगांवर पर्वतशृंगें आणि त्यांच्यावर आणखी शृंगें दिसत आहेत. त्यांना विराम नाहीं, अंत नाहीं, अनंत म्हटलीं तरी चालतील.

वर्षाकाल नुकताच संपला आहे. जिकडे पहावें तिकडे दुधासारख्या शुभ्र फेंसानें सुशोभित असे पाण्याचे प्रवाह वेगानें इतस्ततः धांवत आहेत; कोठें कोठें त्यांच्या तुषारांवर सूर्यकिरण पडून इंद्रधनुष्याची अप्रतिम शोभा दिसत आहे; आणि

कोठें कोठें तर नद्यांचे प्रवाह गाढ अंधकारमय प्रदेशांतून चिरकाल वाहत आहेत, तरी ते कोणाच्या दृष्टीस पडलेले नाहींत; त्यांना कधीं खंड ठाऊक नाहीं कीं, कोणाचें लक्ष त्यांच्याकडे गेलेलें नाहीं! या नद्यांचे प्रवाहांचे दोन्हीं बाजूंना कित्येक कोस पर्यंत दाट झाडी असून लतावृक्षांच्या गुंफा बनलेल्या आहेत; ज्या ठिकाणीं असे प्रवाह नाहींत त्या ठिकाणीं निराळाच प्रकार आहे. ज्यांच्या समोर उभे राहतांच हे अंगावर पडून आपला चक्काचूर करतील कीं काय अशी उरांत धडकीच भरावयाची, असे प्रचंड विशालदेही प्रस्तर उभे आहेत! एकीकडे डोळे फिरतील इतकी उंची तर दुसरीकडे तिच्याच जवळ अतिशय खोल व जिचें तळ देखील दिसत नाहीं अशी दरी! मनुष्याच्या सूक्ष्म दृष्टीला या दरीचें तळ एखादे वेळीं दिसलेंच तर काय दिसणार? एक लहानसा ओढा वाहत आहे व त्याचें पाणी खडकाच्या खबदाडांतून खळखळत आणि नाचत बागडत वाहत आहे. कोठें शुष्क पण कणखर असे धिप्पाड वृक्ष सर्वांतक अशा कालाबरोबर हजारों वर्षेपर्यंत द्वंद्व करीत आणि या द्वंद्वांत मिळालेल्या जयानेंच जणूं काय गर्वित होऊन वर मान करून ताठ उभे आहेत, आणि कोमलतनु अशा लता त्यांच्या कमरेभोंवतीं विळखा घालून त्यांच्या आश्रयानें पांचपांचशें वर्षेपर्यंत जीव धरून राहिल्या आहेत.

हा हिमालय पर्वत तुम्हांला आज ज्या स्थितींत दिसत आहे त्याच स्थितींत तो अनंतकाल आहे. बर्फानें आच्छादित अशीं

त्याचीं तीं शिखरें, वेगानें धावणारे ते पाण्याचे प्रवाह, तें नीलवर्ण आकाश—सगळें कांहीं जसेंचें तसें आहे. गंभीर आणि मनोहर, भयंकर आणि मोहक असें हें सौंदर्य प्रत्येक शरदृतूंत दिसतें. पण ज्या शरदृतूंतल्या कथेचा उल्लेख आम्हांस कर्तव्य आहे त्या वेळीं अमावास्येची रात्र होती. त्या रात्रीं हिमालयाची शोभा कांहीं अपूर्वच होती. सत्ययुग आणि त्रेतायुग यांच्या संधीचा हा समय होता.

२

ऋभु.

मनुष्य मेल्यावर त्याचें काय होतें या प्रश्नाचें बरोबर उत्तर कोणाला देतां येणार आहे? कोणी म्हणतात कीं माणूस मेलें म्हणजे त्याचा स्थूल देह नष्ट होऊन सूक्ष्म शरीर धारण करणारें असें त्याचें पिशाच बनतें. ज्यांचे वाडवडील गत झाले आहेत, ते म्हणतात कीं, ते स्वर्गाला गेले. परंतु वेद म्हणतात कीं मेलेलीं माणसें स्वर्गाला जात नाहींत. जीं पृथ्वीवर सत्कार्य करतात तीं ऋभु[१] होतात. हे ऋभु कोठें राहतात व

---

१ जीं माणसें जिवंतपणीं सत्कार्य करतात व मेल्यावर देवता होतात त्यांना वेदांत ऋभु असें नांव दिलें आहे.

काय करतात याचें उत्तर कोणाला देतां येईल ? मागच्या प्रक-रणांत सांगितलेल्या शरद्ऋतूंतल्या अमावास्येच्या रात्रीं आकाश-गंगेचा ओघ दुभंग झालेला होता, आणि त्यांतून असंख्य ऋभूंचा समुदाय बाहेर पडला होता. त्यांच्या शरिरांच्या दिव्य कांतीनें सगळें ब्रह्मांड प्रकाशित झालें होतें. नक्षत्रांची प्रभा लोपली होती. चित्रपटांतल्या नक्षत्रमालिकेप्रमाणें तीं आकाशांत निष्प्रभ दिसत होतीं. एका क्षणांत ऋभूंनीं सगळें आकाश व्यापून टाकलें. पक्षीसुद्धां समुदाय करून उडूं लागले म्हणजे त्यांच्याकडे घटकाभर पाहत राहावें असें वाटतें. मग दिव्यकांति धारण करणाऱ्या आणि आकाशपथ आक्रमण करणाऱ्या या ऋभूंच्या समुदायांनीं जेव्हां अष्टदिशा आपल्या तेजानें व्यापून टाकल्या, तेव्हां पृथ्वीवरल्या एकंदर मानवजातींचीं मनें कौतुकानें व आश्चर्यानें चकित झालीं यांत नवल काय ? कोणी म्हणत कीं, हा नवा धूमकेतु उदय पावला आहे; कोणी म्हणत कीं नक्षत्रें स्वस्थानापासून भ्रष्ट होऊन पतन पावलीं आहेत. खरा प्रकार असा होता कीं ऋभु आज आपल्या जन्मभूमीच्या दर्शनार्थ आले होते.

जसजसे ते खालीं येत चालले, तसतसा त्यांचा आनंद अम-र्याद वाढूं लागला. शेवटीं ते हिमालयापर्यंत येऊन पोंचले. त्याच्या प्रत्येक शृंगावर—प्रत्येक उच्च भागीं—बसून ऋभुगण अत्यानंदानें गायन करूं लागले. बिचारा मानवप्राणी ! त्याला तें गाणें कसें समजणार ! परंतु श्रुतिमनोहर अशा त्याच्या नादा-नेंच सगळें जग मुग्ध होऊन गेलें ! पृथ्वी निःस्तब्ध, आकाश

निःस्तब्ध, तारे निश्चल, दुभंग झालेला आकाशगंगेचा प्रवाह निश्चल आणि निस्पंद, सगळें ब्रह्मांड स्तंभित–स्तिमित–महामोहनिद्रेंत चूर–झालें. ऋभूंची गाण्याकडेच एकसारखी तंद्री लागली होती. त्यांचा तो गीतध्वनि अखंड ब्रह्मांडाला व्यापून आणि आकाशगंगेच्या द्वारानें बाहेर पडून अनंतांत लीन झाला होता.

पृथ्वी, आकाश, सगळें ब्रह्मांड, आणि देशोदेशींचे लोक नाद-लुब्ध होऊन ऋभूंचें गायन श्रवण करीत होते. त्या गायनाच्या ताना अमृताच्या धारेप्रमाणें त्यांच्या कर्णरंध्रांत प्रवेश करून त्यांच्या अंगांत चैतन्याचा संचार करीत होत्या. ज्याप्रमाणें अपार सुखप्रसंगीं स्वप्नवत्–अर्धचेतन व अर्धअचेतन असें–मोहमय, सुखमय, शांतिमय, अमृतमय, दूरस्थ मधुर संगीत-ध्वनीप्रमाणें कानांत गुणगुणत राहणारें व दीर्घसुखाची परंपरा उत्पन्न करणारें असें कांहीं अंतःकरणांत खोलपर्यंत जाऊन बसलेलें असतें, त्याप्रमाणें तो गानध्वनि सर्वांच्या कानांत जाऊन भिनला होता. आपल्या प्राणाला प्रफुल्लित आणि मोहित करणारें हें आहे तरी काय याचें गूढ कोणालाच उकलेना; पण सगळेच मोहित झाले होते. फक्त तिघांनाच त्यांतला अर्थ कळत होता. मंत्राच्या प्रभावानें मोहित झाल्यासारखे हे तिघे नादलुब्ध होऊन त्या स्वराच्या धोरणाधोरणानें हिमालयाच्या शिखराकडे आकर्षिले जात होते. भारतवर्षाच्या मुकुटांतलीं हीं देदीप्यमान् रत्नें होत. जोंपर्यंत हें भरतखंड राहील, जोंवर हा हिंदुधर्म जीवमान असेल, आणि जोंपर्यंत थोरपणाची

बूज लोकांत असेल, तोंपर्यंत या तीन महात्म्यांच्या नांवांचा लोप होणें अशक्य आहे.


३

तीन महात्मे.

पहिले वसिष्ठमुनि. हे आपल्या साठ हजार शिष्यांसह-वर्तमान आश्रमांत राहून त्यांना ज्ञान, धर्म, आणि नीति यांचा उपदेश करीत असत. कोणाला वाक्य, वाच्य, व्यंग्य म्हणजे काय हीं समजावून सांगत आहेत; कोणाला प्रमाण, प्रमेय, प्रयोजन, संशय, निर्णय, छल, जाति, हेत्वाभास इत्यादिकांचीं लक्षणें सांगत आहेत; कोणाला पंचतन्मात्रांसहित लिंगशरिराचा भेदाभेद, कोणाला विवर्तवाद, कोणाला परिणामवाद, याप्रमाणें निरनिराळ्या शिष्यांना त्यांच्या त्यांच्या अधिकाराप्रमाणें निरनिराळे विषय शिकवीत आहेत; कोणाला गोमेध, अश्वमेध, राजसूय, अग्निष्टोम, गोष्टोम, ज्योतिष्टोमप्रभृति यज्ञयागांची माहिती करून देत आहेत; व कोणाला दशकर्मांचें शिक्षण देत आहेत. असें गुरुमहाराजांचें अध्यापन चाललें असतां शिष्यवृंदाचें लक्ष एकाएकीं व्यग्र झालें; ते जागच्या जागीं निश्चल राहिले; आणि मंत्रानें मोहित करून टाकल्याप्रमाणें त्यांची वाचा कुंठित झाली. तो गीतध्वनि वसिष्ठ-

मुनींच्याही कानीं पडला. त्यांनीं योगबलानें जाणिलें कीं, हा ध्वनि ऋभूंचा आहे, आणि योगबलानेंच आकाशमार्गें हिमालयाकडे त्यांनीं प्रयाण केलें. ते एका मुहूर्तांत तेथें जाऊन पोहोंचले आणि ऋभूंचें वंदन करून त्यांचें गायन श्रवण करण्यांत दंग झाले.

दुसरे, विश्वामित्र. हे दिग्विजयार्थ निघाले होते. दिवसभर सैन्यासह कूच करून संध्याकाळच्या सुमारास हिमालयाच्या पायथ्याशीं त्यांनीं तळ दिला होता. वाटेच्या श्रमामुळें थकवा आल्याकारणानें सैन्यांतले शिपाई ज्याला जी जागा पसंत पडे त्या ठिकाणीं राहुटी देण्यांत गुंतले होते. उद्यां कोणत्या दिशेनें कूच करावयाचें या प्रश्नाची आपल्या मंत्र्यांबरोबर वाटाघाट करीत विश्वामित्र राजा एका ओढ्याच्या कांठीं बसला होता. इतक्यांत आकाशांत एकाएकीं प्रकाश चमकूं लागला आणि तो पूर्वीचा संगीतध्वनि सर्वांच्या कानीं येऊं लागला. सैनिक ज्या ज्या स्थितींत होते त्याच स्थितींत निश्चल राहिले. डोळ्याचें पातें लवण्याइतकी स्वतंत्रता कोणाला उरली नाहीं. जो तो सुखमय अशा मोहानें आच्छन्न होऊन देहभान विसरला. ज्यांचें तंबू ठोकण्याचें काम आटोपलें होतें, त्यांना बिछाईत करण्याचें सुचेना; ज्यांचें तंबू ठोकण्याचें काम अर्धवट झालें होतें ते तें काम तसेंच अपुरें ठेवून उभे होते; आणि जे त्या कामाला सुरवात करणार होते त्यांचा बेत जागचे जागींच राहिला. पुढें काम करण्याचें कोणाला सुचेचना. विश्वामित्राला त्या गाण्याचा अर्थ कळला आणि वामनाप्रमाणें तीन पावलें टाकून ते चटकन् एका



" वाल्मीकी शिंग फुंकून हुकूम सोडीत होता. एकाएकीं प्रकाश चमकूं लागला."

(पृष्ठ ९.)

Printed especially for A. C. Bhat, POONA.

The Bombay Art Printing Works, Fort.

शिखरावर आरूढ झाले. त्यांनीं चोहोंकडे दृष्टि फेंकली, पण त्यांच्या आगमनानें ऋभूंची प्रभा कृष्णवर्ण झाली ही गोष्ट त्या राजाच्या दृष्टीस पडली, तरी पण त्याला कळली नाहीं.

तिसरे वाल्मीकि. वाल्मीकि हा आपली चोरांची टोळी घेऊन जंगली राजाच्या राजवाड्यांत लुटालूट करण्यास गेला होता. वाड्याच्या छपरावर चढून आणि थोड्याशा साथीदारांना वर घेऊन शिडी मोडून तोडून टाकणार, इतक्यांत गलबला सुरू झाला. पाहरेवाल्यांना कोणीकडे जावें आणि काय करावें तें सुचेना. मारामारी, हाणाहाणी आणि कापाकापी सुरू झाली. दरवडेखोर पाहरेवाल्यांना मारूं लागले व पाहरेवाले दरवडेखोरांना जखमी करूं लागले. त्या गर्दींत अशीही गंमत झाली कीं, पाहरेवाले पाहरेवाल्यांना व दरवडेखोर दरवडेखोरांना मारूं लागले. वाल्मीकी आपली तरवार सारखा परजीत आणि शिंग फुंकून हुकूम सोडीत होता. हा प्रकार चालला असतां एकाएकीं प्रकाश चमकूं लागला, आणि संगीतध्वनि कानीं येऊं लागला. तो येतांच सगळे जागचे जागीं चित्रांसारखे निश्चल उभे राहिले. वाल्मीकीनें तो ध्वनि ऐकला व त्याला त्या संगीताचा अर्थ कळला. त्यानें हातांतलीं शस्त्रें एकदम फेंकून दिलीं, खालीं उडी टाकली, आणि जवळच्या पर्वतशृंगावर आरोहण केलें.

४

बंधुत्वाचें गाणें.

गाण्याला लुब्ध होत नाहीं असा कोण आहे? सामान्य माणूससुद्धां ताना घेऊं लागला, म्हणजे माणसाचें मन रमतें; त्यापेक्षां खुल्या व आनंदित अंतःकरणानें ताना घेणारा गवई भेटला म्हणजे त्याचें गाणें अधिकच मधुर लागतें. त्या गाण्याचा अर्थ बरोबर जाणणारा भेटला म्हणजे त्या गाण्यापासून होणाऱ्या आनंदानें त्याचें हृदय भरून जातें. ज्याला मर्म कळतें तो मोहित होतो. नुसती कानांचीच नव्हे तर अंतःकरणाचीही तृप्ति करणारें गाणें असलें म्हणजे तें ऐकणाराला गुंग करून सोडतें. आज ऋभूंसारखे गायक, आणि तेही जन्मभूमीच्या दर्शनानें आनंदित होऊन प्रेमपूरित अंतःकरणानें गायनकर्माला प्रवृत्त झालेले होते. चतुःसमुद्रांच्या तरंगांनीं जिचे चरण सदैव धुतले जात आहेत, आणि शुभ्र बर्फानें सर्वदा आच्छादित असें जिचें शिर आहे अशा प्राचीन, 'सुजला, सुफला,' जन्मभूमीचें दर्शन बहुकालावधीनें त्यांना आज घडलेलें; वसिष्ठ, विश्वामित्र व वाल्मीकि यांच्यासारखे श्रोते गाणें ऐकत, व त्याचें रहस्य आणि त्याचा भाव ओळखीत होते. त्यांचे कान, मन व प्राण हीं त्या गायनानें पूर्ण भरलेलीं होतीं. त्यांच्या बहिरिंद्रियांनीं

किंबहुना मन व प्राण यांनींसुद्धां आपापलीं कामें कानांकडेच सोंपविलीं होतीं—तीं सर्व कर्णेंद्रियांत मज्जन पावलीं होतीं. ज्ञान, व चेतना हीं सगळीं नष्ट झालीं होतीं. गायक, त्यांचा भाव, गायन, आणि गायनाचे सूर यांच्याशीं सर्वांची तन्मयता झाली होती. गाण्याच्या गूढ अर्थांत सर्वांचा लय झालेला होता.

जसजसा सूर वाढत चालला, तसतसें बंधुत्वाचें गाणें स्पष्ट होत चाललें. ऋभु हात लांब करून सर्व स्थावर, जंगम, भूचर, जलचर, खेचर इत्यादि प्राण्यांना ‘ भाऊ भाऊ, आपण सगळे भाऊ ’ असें ह्मणत आहेत असें दिसत होतें. आणखी कांहीं वेळानें सूर वाढला तसतसे ‘भाऊ, भाऊ, आपण सगळे भाऊ’ हे शब्द ऋभूंच्या तोंडून अधिकाधिक कळकळीनें निघालेले दिसूं लागले.

‘ भाऊ भाऊ! आपण सगळे भाऊ ’ या नादानें सगळी पृथ्वी दुमदुमून गेली. सगळ्या ब्रह्मांडांतून याच शब्दांचा प्रतिध्वनि येऊं लागला. पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर सगळ्या दिशा गंभीर स्वरानें ‘ भाऊ भाऊ ’ असे शब्द उच्चारूं लागल्या. अहाहा! ‘ आपण सगळे भाऊ! ’

वसिष्ठ, विश्वामित्र, वाल्मीकि या तिघांच्या खऱ्या खऱ्या अंतःकरणांतून ‘ भाऊ भाऊ ’ या शब्दांचा प्रतिध्वनि आला, जणूं काय मोहिनीमंत्रानें त्यांच्या सगळ्या वृत्ति स्तब्ध करून आणि त्यांच्या अंतःकरणांचा एक रस करून ‘ भाऊ भाऊ ’ या शब्दांच्या रूपानें त्या रसाची धारच ओतली होती!

एक जण ऋषि, दुसरा दिग्विजयी राजा आणि तिसरा दरवडेखोर! पण या तिघांचेही परस्पर विरोधी भाव किंचित् कालपर्यंत लुप्त झाले होते. सर्वांच्या अंतःकरणांतून ' भाऊ भाऊ, आपण सगळे भाऊ ' असें बंधुत्वाचें गाणें एकतानतेनें निघत होतें.

५

तिघांचे तीन विचार.

तिघेही गायन ऐकून पुष्कळ वेळपर्यंत देहभान विसरले होते; पण तिघांच्याही अंतर्यामांतून हळू हळू एक भावनास्रोत गुप्तपणें वाहत होता. त्या गाण्याला ते इतके मोहित झाले होते कीं, वेगवान् कल्पनेच्या ओघालासुद्धां त्यांचीं मनें आकर्षण्याचें काम अशक्य झालें. मग हृदयाच्या तळापाशीं वाहणाऱ्या भावनांच्या क्षुद्र प्रवाहाविषयीं तर बोलावयासच नको. ते गाणें ऐकण्यांत तल्लीन झालेले तसेच होते; पण त्यांचें अंतर्याम क्रमाक्रमानें विरघळत विरघळत अगदीं भिन्न स्वरूपाचें झालेलें होतें.

वसिष्ठाच्या मनांत मुख्य भाव स्वतःच्या धन्यतेचा होता. मीं ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्या मधला वाद मिटवून दोघांमध्यें बंधुत्वाचा संबंध स्थापित केला हा अहंभाव त्याच्या मनांत होता.

विश्वामित्राच्या मनांत स्वतःची प्रौढी मुख्यतः होती. मीं बाहुबलानें सगळी पृथ्वी जिंकून एकच्छत्री राज्य केलें; माझ्या अमलाखालीं आतां सगळे लोक बंधुत्वाच्या नात्यानें वागूं लागले; ही अहंता त्याचे ठायीं होती.

वाल्मीकीला काय वाटलें असेल? किती आत्मविषाद त्याला झाला असेल? हाय हाय! मीं हें काय केलें! मीं आपल्या बंधूंच्या नाशास प्रवृत्त झालों आं? किती मी पापी! किती मी निर्घृण!

त्याच्या मनांत जो हा विचार चालला होता तिकडे कोणाचेंच लक्ष गेलें नाहीं.

६

ऋभूंचें प्रयाण.

कांहीं काळ लोटल्यावर ऋभुगण हिमालयाच्या शिखरांवरून उठून वर आकाशमार्गानें जाण्यास निघाला. तेव्हां वसिष्ठादिकांना वाटलें कीं, राशिचक्र अन्य मार्गानें भ्रमण करूं लागलें कीं काय! ऋभु बरेच दूर गेले तेव्हां तर असें दिसलें कीं, जणूं काय लक्षावधि नवे तारे आकाशांत एकाएकीं निर्माण झाले आहेत. होतां होतां तें नक्षत्रांचें स्वरूपही मावळत जाऊन एक मोठा विस्तीर्ण मेघ आकाशाला आच्छादून राहिला आहे असा भास झाला,

आणि क्रमानें हा मेघ आकाशगंगेच्या प्रवाहांत मिसळून गेला. पुढें ही आकाशगंगा सगळें विश्वब्रह्मांड व्यापते कीं काय असेंही वाटूं लागलें. ज्याप्रमाणें द्वापरयुगाच्या अखेरीस विराटस्वरूपी कृष्णाच्या मुखांत प्रवेश करणाऱ्या एकंदर विश्वाचें अर्जुनाला दर्शन झालें, तसाच प्रकार याही वेळीं दिसूं लागला. क्रमाक्रमानें तें सर्व मेघमंडळ आकाशगंगेंत लय पावलें, आणि तिच्या मध्यभागीं असलेलें विशाल गव्हर भरून आलें. विश्वाचा पसारा पुनः पूर्ववत् दिसूं लागला; आकाश पुनः निश्चल झालें; त्याच्या सौम्य नीलवर्णांत पुनः चांदण्या चमकूं लागल्या; पृथ्वीवर प्रभात झाली; कोकिलादि पक्षी जागे होऊन आपल्या स्वरानें दशदिशा भरूं लागले.

वसिष्ठ, विश्वामित्र आणि वाल्मीकि आकाशगंगेकडे एकसारखी टक लावून पाहत होते. ऋभु अंतर्धान पावल्याबरोबर ते हताश झाले; तथापि 'भाऊ भाऊ, आपण सर्व भाऊ' हे त्यांचे गाण्याचे सूर त्यांच्या कानांत घुमत होते.

इतका वेळपर्यंत जो विचार त्यांच्या अंतःकरणांत न कळत संचार करीत होता तो आतां फारच बलिष्ठ झाला. बाल्य व तारुण्य या अवस्थांतले नवे जुने, स्वार्थपर अस्वार्थपर, नाना तऱ्हेचे परस्पर विरोधी भाव त्यांच्या अंतःकरणांत एकसमयावच्छेदेंकरून उदय पावले आणि या अतींद्रिय, नूतन, आधिदैविक भावाशीं मिसळून मनांत कल्लोळ करूं लागले. उठण्याची व चलनवलन करण्याची यत्किंचित् सुद्धां शक्ति त्यांचे अंगीं राहिली

नव्हती. 'भाऊ भाऊ, आपण सर्व भाऊ' हें गाणें मात्र त्यांच्या कानांत सारखें घुमत होतें.

७

अंतर्यामींची खळबळ.

वसिष्ठ मनांत म्हणाले, 'धन्य माझ्या बुद्धीची! मला क्षत्रियांना कसें सहज सहज वळवितां आलें! ज्यानें ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचें एकीकरण केलें त्याला अन्य जाती एक करणें काय कठीण आहे? हा विचार मनांत चालला असतांना 'भाऊ भाऊ, आपण सर्व भाऊ' हें गाणें कानांत घुमत होतेंच.

ते पुनः स्वतःशीं म्हणाले, "आह्मीं सर्व शास्त्रें पढलों. अहाहा! शास्त्रज्ञानाचें तेज काय वर्णावें! शास्त्र ह्मणतें, 'उद्धरेदात्मनात्मानम्'. मग त्यांत मान अपमान कसला? पुरोहितपणाचा धंदा हलका खरा, परंतु सगळी कर्तृत्वशक्ति ब्राह्मणांकरितांच राखून ठेविलेली नाहीं काय? मी पहा कसें खुबीनें काम केलें! आतां पुनः संहिता रचण्याच्या उद्योगाला लागलों आहें. त्यांतही हाच मुद्दा पुढें येणार आहे. योगशास्त्रही हेंच म्हणतें. मान अपमान सगळा बाजूला ठेवून 'स्वकार्यमुद्धरेत्' (आपलें कर्तव्य करण्यास चुकूं नये.) हें काम मला कां करतां येणार नाहीं? पराक्रम, सत्य, धर्म सर्व मिथ्या आहेत; कर्तव्य येवढी

काय ती खरी खरी गोष्ट आहे. मला आपलें कर्तव्य करतां येणार नाहीं काय? हे ऋभु कां आले होते? अहा! किती मधुर त्यांचें गाणें! काय तो त्यांचा भाव! काय मला यश यावयाचें नाहीं? पुनः या डोळ्यांना त्यांचें दर्शन होणार नाहीं काय? झालें तर त्यांच्या बरोबर 'भाऊ भाऊ ' असा सूर मीही खास काढूं लागेन. बुद्धि आणि शास्त्रें हींच माझीं बलवान् शस्त्रें आहेत. या साधनांनीं कार्यसिद्धि झालीच पाहिजे. " हा विचार मनांत चालला असतां ' भाऊ भाऊ आपण सर्व भाऊ ' हें गाणें कानांत घुमत होतेंच.

विश्वामित्र आपल्या मनाशीं म्हणाले, ' हे ऋभुच काय! अहाहा! किती अपूर्व हा यांचा स्वर! किती विचित्र यांचें हें स्वरूप! मी केवढा भाग्यवान्! आणि कां नसेन? एक काळ असाही येईल कीं, त्या दिवशीं त्यांचा तो आनंद मलाही अनुभवतां येईल. यशस्वी होण्याची मला आशा आहे. या ऋभूंना त्यांच्याचसारखें उत्तर मला देतां येईल. मी विश्वामित्र काय सामान्य पुरुष आहें? मी प्रथम सगळें जग जिंकून टाकीन. कोण माझ्या इच्छेच्या आड येतो तें पाहीन. अगोदर सर्वांना माझ्या एकच्छत्री अमलाखालीं आणून सोडल्यावर मग त्यांचें एकिकरण करतां येईल.' हा विचार मनांत घोळत असतां ' भाऊ भाऊ आपण सर्व भाऊ ' हें गाणें कानांत घुमत होतेंच. विश्वामित्राला अभिमान वाटला कीं ' हेंच गाणें सगळ्या पृथ्वीवरल्या लोकांना गायला लावीन तरच मी नांवाचा विश्वामित्र. ही प्रतिज्ञा

शेवटाला जाणार नाहीं काय? इच्छेप्रमाणें घडवून आणण्याचें सामर्थ्य या बाहूंत नाहीं काय?'

वाल्मीकीला वाटलें, 'हाय हाय! मी कितीजणांचा घातपात केला आहे! किती अभागी स्त्रियांचें सौभाग्य नष्ट केलें आहे! या पातकांचें क्षालन मी आतां कसें करूं? माझ्या अंतःकरणांत पेटलेली ही ज्वाळा आतां कशी शांत होईल! आतां येथें ऋभूंचें जें गाणें ऐकण्यांत आलें, त्यानें माझ्या अंतःकरणाचा अगदीं भडका उडवून दिला आहे. त्यांच्या सुरांत आपला सूर मिळवून देण्याचें माझ्या नशिबीं नव्हतें! अरेरे! व्यर्थ मी मनुष्यजन्माला आलों! आह्मी सर्व मानवप्राणी भाऊ भाऊ असतां मला पाहून सगळीं माणसें पळतात! परमेश्वरा! अशी निंद्य वृत्ति माझ्या वांट्याला कां बाबा दिलीस?' हा विचार-तरंग मनांत प्रबळ होत असतांच ' भाऊ भाऊ, आम्ही सर्व भाऊ ' हें गाणें त्याच्या कानांत घुमत होतेंच. वाल्मीकीच्या नेत्रांतून आतां घळघळ अश्रू वाहूं लागले. तो स्वतःला म्हणाला, ' हाय रे पाप्या, चांडाळा, तुझ्या हातून काय घोर पापें घडलीं आहेत! पण हें पापांचें स्मरण कधीं नाहींसें होणारच नाहीं काय '? हा विचार मनांत येऊन पुनः त्याचे डोळे उष्ण अश्रूंनीं भरून आले, आणि त्यांचा पूर लोटला.

८

तीन परिणाम.

त्यांच्या अंतःकरणांत ही खळबळ किती कालपर्यंत चालली होती कोणास ठाऊक ! ऋभूंनीं संचारित केलेल्या नवविद्युच्छक्तीनें त्यांच्या हृदयाकाशांत केवढें भयंकर तुफान उत्पन्न केलें होतें याची बरोबर कल्पना कोणाला करतां येणार आहे ? जेव्हां सगळें वादळ शमलें, आणि बाह्यवस्तु इंद्रियग्राह्य होऊं लागली, तेव्हां पाहतात तों सगळाच चमत्कार ! शरद् ऋतूचा समय ! वर नभोमंडलांत भानु उदय पावला आहे; नक्षत्रांचा अस्त झाला आहे; प्रभातवायु अंतःकरणाला प्रफुल्लता आणीत आहे; ओढ्याचा मधुर असा झुळझुळ शब्द कर्णेंद्रियाची तृप्ति करण्यांत गुंतला आहे. आणि रात्रीं घडलेला वृत्तांत तिघांनाही स्वप्नासारखा दिसत आहे !

परस्पर विरोधी अशा मनोवृत्तींचें द्वंद्व शमल्यावर वसिष्ठांचें मन शांति व सुख अनुभवूं लागलें. तपोबलानें प्राप्त झालेली बुद्धि, विद्या आणि शक्ति ह्यांच्या साह्यानें पृथ्वीवर सर्वत्र भ्रातृभाव आपण स्थापित करूं ही प्रतिज्ञा, आणि ती पूर्ण करण्याची खात्री यांनीं त्यांच्या अंतःकरणांत अहंता उत्पन्न केली.

मीं आपल्या बाहुबलानें बहुतेक सगळें जग जिंकलेंच आहे. राहिलें साहिलेलेंही जिंकून सर्वत्र बंधुत्वाचा भाव स्थापित

करून सोडीन अशी भयंकर घमेंड विश्वामित्राच्या मनांत उत्पन्न झाली. पण त्याच वेळीं त्या घमेंडीच्या बरोबर किंचित् शंकाही जागृत झाली होती.

वाल्मीकीला मात्र कोठली शांति आणि कोठलें सुख ! दारुण अनुतापाच्या इंगळ्या त्याच्या सर्वांगाला लागल्या होत्या.

तो आपल्या साथीदारांकडे परत गेला नाहीं. शोक आणि आक्रोश करीत शांतिप्राप्तीसाठीं एखादें एकांत स्थल शोधण्याकरितां तो निघाला होता.

आनंदानें आणि प्रसन्नमनानें वसिष्ठमुनि आपल्या आश्रमाकडे जाण्याला निघाले असतां तेजःपुंज, विशालदेही, आणि पादभरानें पृथ्वीला कंपायमान करणाऱ्या व पराक्रमी, अशा विश्वामित्राकडे त्यांची सहज नजर गेली. तेव्हां वसिष्ठ योगबलानें सत्वर त्यांचे जवळ गेले आणि ते दोघे बरोबर पर्वतावरून खालीं उतरूं लागले.



खंड दुसरा.

१

दोघांची भेट.

वसिष्ठ आणि विश्वामित्र खालीं उतरले. ते उतरत असतांना त्यांच्या पदभारानें पर्वत वांकत व कांपत होता; वाटेंतले कांटेकुटे आणि दगड बाजूला सरून त्यांना वाट देत होते; प्रचंड वृक्षांच्या पंक्ती आपले शाखारूपी बाहु पसरून त्यांचें स्वागत करीत आणि छायादानानें त्यांच्या शरीरांस शीतलता आणीत होत्या; दिसण्यांत गोंडस, आनंदानें विहरणारे, आणि मंजुल स्वरांनीं दुसऱ्यांस रिझविणारे चित्रविचित्र रंगांचे पक्षी आपल्या मधुर, सुस्वर, गायनानें त्या दोघांच्या कर्णांस आनंदवीत होते; कोमल लता वृक्षांच्या स्कंधांवर चढून तेथून खालीं त्या दोघांच्या अंगांवर पुष्पांचा वर्षाव करीत होत्या; झुळझुळ वाहणारे ओढे पदोपदीं आपल्या जलतुषारांनीं त्यांच्या मार्गावर सडा घालीत होते; डोंगराच्या पायथ्याशीं उगवलेलीं लहान लहान कोमल झाडें झुडपें शीतल, सुगंधयुक्त आणि निद्रा आणणाऱ्या वाऱ्याच्या झुळकेबरोबर हलून त्यांच्यावर जणूं काय चामरें ढाळीत होतीं.

अशा थाटानें त्या पर्वताच्या अतिशय उच्च आणि दुर्गम अशा शिखरांवरून ते दोघे सहज लीलेनें उतरून खालीं आले. पाठीमागें मेघमंडलाला भेदून जाणारे उंच पर्वत, खालीं तृणाच्छादित नीलवर्ण सपाट जागा आणि मध्यें तेजःपुंज कांति धारण करणारे, पर्वतशिखराप्रमाणें विशालदेही आणि दिसण्यांत उग्र असे वसिष्ठ आणि विश्वामित्र! हा सगळा देखावा पाहून असें वाटे कीं जणूं काय सूर्यकिरणांनीं प्रकाशित अतएव तीव्रोज्वल असें हिमालयाचें प्रचंड बर्फराशिद्वय स्वस्थानभ्रष्ट होऊन समानगतीनें खालीं खालींच उतरत आहे!

त्यांची परस्परांची भेट झाल्यानंतर उदात्त, अनुदात्त, स्वरितादि स्वरप्रक्रियेनें शुद्धता पावलेल्या, कोमल, सुखकर, परंतु गंभीर अशा स्वरानें गिरिकंदरामध्यें प्रतिध्वनि उत्पन्न करीत वसिष्ठमुनि विश्वामित्राला म्हणाले, 'महाराजाधिराज, आपण दिग्विजयार्थ निघाल्याविषयींचें आम्हीं पुष्कळ दिवसांपूर्वीं ऐकलें होतें. तपःस्वाध्यायादि आनुश्रविक क्रियाकलापांत निरंतर निमग्न झाल्यामुळें आपल्या सारख्या वीराच्या अद्भुत चरित्रकथांची माहिती आणविण्यास आम्हांस सवड होत नाहीं. आज आमच्या मोठ्या भाग्यानें आपले प्रत्यक्ष दर्शनाचा लाभ घडला आहे; तेव्हां आपण आमच्यावर अनुग्रह करून आपल्या दिग्विजयाच्या कथामृतानें आमचे कर्ण तृप्त करावे अशी विनंति आहे.'

मेघासारखा गंभीर असा तो वसिष्ठांचा स्वर सगळ्या गुहांतून घुमत घुमत दऱ्यांतून शांत होण्यापूर्वींच भीषण कोदंडाच्या

टणत्काराप्रमाणें स्पष्ट, खणखणीत, द्रुत, गंभीर, पण किंचित् कठोर आणि वीराला उचित अशा स्वरानें राजाधिराज विश्वामित्र महाराज ह्मणाले, 'ब्रह्मर्षे, माझ्यासारख्या क्षुद्र माणसाच्या कथाश्रवणाविषयीं आपल्या सारख्या थोरांना जिज्ञासा व्हावी ही मोठी भाग्याची गोष्ट म्हटली पाहिजे; आणि म्हणूनच स्वतःच्या मुखानें स्वतःची कीर्ति सांगणें हें पातक आहे तरी आपल्या जिज्ञासेच्या पूर्तीसाठीं तें स्वीकारून मी आपलें चरित्र सांगतों, तें श्रवण करावें.'

'दिग्विजय करूं इच्छिणाराला साम, दाम, दंड, भेद या चार उपायांपैकीं भेद व दंड हे दोनच उपाय मान्य आहेत. ह्मणून याच दोन उपायांचें अवलंबन करून मी या उद्योगाला प्रवृत्त झालों. अंग, वंग, कलिंग, द्रविड, द्राविड, काशी, कांची, अवंतिका, महाराष्ट्र, सौराष्ट्र, गुर्जरराष्ट्र, मत्स्य, मगध, विदर्भादि देश आपल्या एक अक्षौहिणी सैन्याच्या साह्यानें जिंकून मीं आज या हिमालयाच्या द्वारापाशीं सैन्याचा तळ दिला आहे. पूर्व दिशेला चीन, हूण, शान, मान, श्याम, मग, नाग वगैरे राज्यांची जूट फोडण्यासाठीं भेद करण्यांत चतुर अशा विश्वासु मंत्र्यांना त्या राज्यांत पाठविलें आहे. पश्चिमेकडे शक, यवन, पारद, दरद, आरब, पारस, म्लेच्छ, किरातादि जातींत बंडें उपस्थित करण्यासाठीं मीं आपल्या सेनापतीला ९९ अक्षौहिणी सैन्य बरोबर देऊन तिकडे रवाना केलें आहे. सर्वांकडून आनंदाच्या बातम्या आल्या आहेत. हिमालयाच्या जयानंतर एकदां

सैन्यासह पृथ्वीप्रदक्षिणा केली ह्मणजे दिग्विजय पूर्ण झालाच समजा !

वसिष्ठ म्हणाले, ' महाराजांच्या दिग्विजयाची ही कथा श्रवण करून मनाला अत्यंत संतोष वाटला. आपण जसे चतुर राजनीतिज्ञ मुत्सद्दी आहां, तसेच युद्धकलाविशारद वीराग्रणी सेनापतिही आहां यांत संशय नाहीं. आपल्या हातून दिग्विजयाचें कार्य पूर्ण होईल यांत असंभवनीय असें कांहीं नाहीं. परंतु मला एक थोडीशी शंका आहे; आपण तिचें निरसन केल्यास मी कृतार्थ होईन. '

विश्वा०—आपणच या दीन दासाला ही आज्ञा केली म्हणून ठीक आहे. कोणी दुसऱ्यानें तसें केलें असतें तर मी ती थट्टाच समजलों असतों. आपल्या सारखे गंभीर स्वभावाचे लोक उपहास करतील हें संभवनीयच नाहीं. म्हणून खुशाल आज्ञा करावी. आपल्या शंकेचें निराकरण यथाशक्ति करण्यास हा दास तयार आहे.


वसिष्ठ—माझा पहिला प्रश्न हा कीं, दिग्विजयाचा उपयोग काय ?

विश्वा०—महाराज, दिग्विजयाचा कांहीं उपयोग नाहीं असें समजूं नका. दिग्विजयामुळें सगळी पृथ्वी एका छत्राखालीं आणितां येते, आणि अशा रीतीनें एका राजाच्या अमलाखालीं सगळ्या जातींमध्यें एकी प्रस्थापित होते.

वसिष्ठ—मला वाटतें एकी होणें तर राहोच, पण उलट जेते व जित यांच्यामध्यें द्वेषभाव उत्पन्न होऊन त्यांच्यांत ऐक्य होण्याचा संभव सुद्धां नाहींसा होतो. जेत्यांनीं जित लोकांपैकीं कांहींवर कृपादृष्टि केली आणि कांहींवर केली नाहीं म्हणजे द्वेष उत्पन्न झालाच. माझा प्रश्न हाच कीं, दिग्विजयानें जातीजातींमध्यें भ्रातृभाव उत्पन्न होईल काय? सगळे भाऊ भाऊ होतील काय?

विश्वा०—माझी तर खात्री आहे कीं, पृथ्वीवर भ्रातृभाव व ऐक्य हीं दिग्विजयावांचून दुसऱ्या कोणत्याही उपायानें घडवून आणतां येणें अशक्य आहे. दिग्विजयी राजा म्हटला म्हणजे तो पित्यासमान असतो. तो सगळ्या प्रजेला पुत्रवत् समजून तिचें पालन करतो. अर्थात् सगळी प्रजा म्हणजे परस्पर भावंडांसारखी असते. काल रात्रीं घडलेल्या प्रकारापासून तर माझी ही श्रद्धा अधिक दृढ झाली आहे. मी समजतों कीं, दिग्विजयानें पृथ्वीवर भ्रातृभाव आणि ऐक्य स्थापितां येतें. ही गोष्ट माझे मनावर दृढ बिंबवून मला प्रोत्साहन देण्यासाठींच ऋभु काल या लोकीं अवतरले होते.

वसिष्ठ—हा आपला भ्रम आहे. ऋभु हे मधून मधून असेच आपल्या मातृभूमीच्या दर्शनार्थ येत असतात. ते आपणांला प्रोत्साहन देण्याकरितां येत नाहींत. दुसरी गोष्ट अशी कीं, दिग्विजयानें आपण माणसांच्या शरीराचे स्वामी होतां. पण त्यांच्या मनावर आपलें प्रभुत्व स्थापित होतें असें थोडेंच आहे!



"या हातांत धनुष्यबाण आहे तों पर्यंत माझ्यावर उलटण्याची माझ्या प्रजेची छाती होईल ही गोष्ट मनांत सुद्धां आणूं नका.

(पृष्ठ २५.)

Printed especially for A. C. Bhat, POONA.

The Bombay Art Printing Works, Fort.

विश्वा०—त्यांच्या मनांत कांहींही असो, तें बाहेर प्रकट होऊं दिलें नाहीं म्हणजे झालें.

वसिष्ठ—म्हणजे तें दमन झालें, पालन नव्हे. त्याला भ्रातृभावही म्हणतां येणार नाहीं. मनांत द्वेषभाव आल्यावर भ्रातृभाव राहणारच नाहीं.

विश्वा०—एका अमलाखालीं राहण्याची सर्वांना संवय झाली, म्हणजे सगळ्यांची स्थिति समान होईल, आणि मग सगळेच भावाभावासारखे वागूं लागतील.

वसिष्ठ—हा भ्रातृभाव नव्हे; तर प्रच्छन्न अग्नीचा धूमच होय. फुपाट्यांतला अग्नि एकदां प्रज्वलित झाला म्हणजे त्याच्या ज्वाळा सगळ्या देशभर पसरावयाच्या आणि त्या पेटलेल्या वणव्यांत दिग्विजय करणाराची आहुती पडावयाची.

विश्वा०—(उजवा हात पुढें करून) या हातांत धनुष्यबाण आहे तोंपर्यंत माझ्यावर उलटण्याची माझ्या प्रजेची छाती होईल ही गोष्ट मनांत सुद्धां आणूं नका.

वसिष्ठ—पण धनुष्यबाणांच्या जोरावर जर भ्रातृभावाचें रक्षण करतां येत असेल, तर त्याला भ्रातृभाव हें नांव तरी देतां येईल कीं नाहीं याची शंकाच आहे.

विश्वा० बरें, नाहीं देतां येणार. पण भ्रातृभाव स्थापण्याला दिग्विजयावांचून दुसरा कोणता उपाय आपण सांगतां ?

वसिष्ठ—सांगतां न येता तर येवढा वाक्प्रपंच कशाला केला असता ?

विश्वा०–बरें आहे, पाहूं आतां आपल्या कमंडलूंतून कोणती जडीबुटी बाहेर पडते ती.

वसिष्ठ–दुसरा उपाय म्हणजे हाः बळजबरीनें माणसांमध्यें एकी करतां येत नसते. जोंपर्यंत प्रत्येकजण आपल्या पुरताच विचार पाहत राहील, तोंपर्यंत दोघांचीं मनें जुळवून एकी घडवून आणणें शक्य नाहीं. म्हणून विचारस्वातंत्र्याचा ओघ अगोदर बंद केला पाहिजे. नीच मानलेल्या जातींत विचार-स्वातंत्र्य पसरणार नाहीं याविषयींचा बंदोबस्त प्रथम करणें अवश्य आहे.

विश्वा०–पांच सहा ब्राह्मणांच्या प्रयत्नांनीं विचारस्वातंत्र्या-चा ओघ आडविला जाईल असें का तुम्हांला वाटतें?

वसिष्ठ–बुद्धीच्या प्रभावानें मनुष्य काय करूं शकणार नाहीं? बालपणापासूनच लोकांच्या मनाला निराळ्या प्रकारचें वळण लाविलें म्हणजे झालें. त्यांना सुखोपभोगांत रममाण ठेवावें आणि त्यांच्या मनांत सुखोपभोगावांचून अन्य विचारच येऊं देऊं नयेत. ग्रंथांचें वाचन व अध्ययन सुद्धां बंद ! हा क्रम एका पिढींत–किंवा वाटल्यास दहा पिढ्यांपर्यंत–चालविला म्हणजे माणसांमा-णसांत काय, पण मनुष्य आणि पशु यांच्यांत देखील भ्रातृभाव उत्पन्न करतां येईल.

विश्वा०–माणसांना पशुवत् करणें हा खासा भ्रातृभाव ! असला भ्रातृभाव घेऊन काय करावयाचें आहे? ब्राह्मणांचें वर्चस्व

कायम राखावयाचें हेंच कीं नाहीं ? दिग्विजयानें एकाच राजाच्या सत्तेखालीं सगळीं माणसें येतात; पण यांत तर लाखों ब्राह्मणांच्या सत्तेखालीं येतात. या कामांत तरी आपणाला यश येईल असें वाटतें काय? आपला मुख्य शत्रु–तें आकाश–आपण पाहिलें नाहीं काय ? त्या अनंत–अमर्याद–आकाशाकडे एकदां नजर फेंकली पुरे कीं स्वतंत्र विचार आपोआप मनांत उद्भवतात.

वासिष्ठ—त्याचाही बंदोबस्त करून ठेवितां येईल. वर आकाशाकडे कोणाला पाहूंच दिलें नाहीं म्हणजे झालें. प्रत्येक नक्षत्रावर एकेक नक्षत्रदेवता बसवून ठेवूं, आणि मनुष्याच्या अदृष्टाचा त्या नक्षत्राशीं संबंध जोडून देऊं. अंतरीक्षांत भयंकर आकृति निर्माण करतां येतील. ज्याच्या योगानें आकाशाकडे पाहिलें असतां स्वतंत्र विचार उत्पन्न होतील असें कांहीं राहूंच द्यावयाचें नाहीं. जलमार्गानें प्रवास केला असतां स्वतंत्र विचार उद्भवतात; सबब जलप्रवास बंद! माणसांच्या मागें नित्य नैमित्तिक कर्में अशा कडक रीतीनें लावून द्यावयाचीं कीं ब्राह्मणावांचून कोणालाही एक पाऊल स्वातंत्र्याच्या मार्गांत टाकतां येऊं नये. पुनः ब्राह्मणाच्याही हातीं राज्याधिकार नाहीं तो नाहींच.

विश्वा०—हं! समजलों–समजलों. युक्तिप्रयुक्तीनें जगाला जिंकण्याची तुमची इच्छा आहे; पण तुमच्या युक्तीनें लोक किती दिवस फसत राहतील? तुह्मी खूप समजून रहा कीं हा विश्वामित्र किंवा त्याच्या लोकांपैकीं कोणीही तुमच्या या युक्त्यांनीं फसणार नाहीं.

विश्वामित्राच्या या कटूक्तीनें वसिष्ठाचा क्रोधाग्नि प्रज्वलित होऊं लागला. परंतु त्यांनीं मोठ्या प्रयासानें आत्मसंयमन केलें. क्रोधाचा उद्रेक झाल्यापासून तों त्याची शांति होईपर्यंत वसिष्ठांनीं स्तब्धता धारण केली होती. त्यांची स्तब्धता पाहून विश्वामित्राला वाटलें कीं, आपले तर्कवितर्क आणि परिहासोक्ति यांनीं वसिष्ठ मुनि पराजित झाले. हा विचार मनांत येतांच विश्वामित्र गर्वानें ताठले, आणि बराच वेळपर्यंत त्यांनाही तोंडांतून अक्षर काढण्याची शक्ति राहिली नाहीं.

अशा रीतीनें दोघेही कांहीं कालपर्यंत मुकाट्यानें चालले असतां विश्वामित्राच्या सैन्याची छावणी दिसूं लागली. तेव्हां आकाशाकडे पाहून विश्वामित्र वसिष्ठास म्हणाले, ‘ महात्मन्, बराच उशीर झालेला आहे. जर विशेष कांहीं प्रतिबंध नसेल तर आमच्या येथें येऊन आतिथ्याचा आपण स्वीकार केल्यानें मला कृतार्थता वाटेल.’ वसिष्ठानीं त्या विनंतीला मान दिल्यावर विश्वामित्रांनीं आदरपूर्वक त्यांना आपल्या शिबिरांत नेलें, आणि त्यांचा फार चांगला सत्कार केला, व मग निरनिराळ्या देशांतून आणिलेल्या अपार रत्नराशि त्यांच्यापुढें ऐटीनें मांडून त्यांतलीं कांहीं रत्नें त्यांना नजर केलीं. वसिष्ठांनाही मोठा संतोष झाला, व त्यांनीं निरोप घेतांना आपल्या आश्रमालाही भेट देण्याविषयीं विश्वामित्राला विनंति केली.

२

वसिष्ठाच्या आश्रमांत.

ठरलेल्या वेळीं विश्वामित्र तपोवनांत येऊन दाखल झाले. वसिष्ठ त्यांच्या स्वागतासाठीं बरेच दूरवर आले होते. विश्वामित्राला तेव्हांचा प्रकार पाहून मोठा चमत्कार वाटला. तें सारें तपोवन शाल, ताल, तमाल, पियासाल, हिंताल, बक, बकुल प्रभृति विशाल वृक्षांनीं आच्छादिलें होतें. खालीं तळाशीं लता किंवा झुडपें यांचें नांव नव्हतें. जिकडे तिकडे नीटनेटकेपणा दिसत होता; रानांत लांडगे, सिंह, वाघ, चित्ते, हत्ती, डुकरें, गेंडे, वगैरे भयंकर हिंस्र श्वापदें आणि निरनिराळ्या प्रकारचे लहानमोठे विषारी सर्प, अजगर, व जन्तु निर्भयपणें संचार करीत होते, आणि त्यांच्या खाद्यांकडे—गाई, म्हशी, शेळ्या वगैरे पशूंकडे—नुसतें ढुंकूनसुद्धां पाहत नव्हते. वसिष्ठ आणि विश्वामित्र हे दोघे जात असतां बाजूला होऊन ते त्यांना रस्ता देत होते व वंदन करीत होते.

हा प्रकार पाहून विश्वामित्र वसिष्ठाला म्हणाले, ‘ महात्मन्, आपण बुद्धिप्रभावानें वन्य पशूंना वश करून घेतलें आहे यांत शंका नाहीं. पण अशा रीतीनें माणसांना वश करून घेण्याचें काम आपणांला साधणार नाहीं.’

वसिष्ठ म्हणाले—‘ याला स्थळमहात्म्य कारण आहे. हा कांहीं बुद्धीचा प्रभाव नाहीं.’

पण लवकरच हा देखावा पालटला. वन होतें त्याचें उपवन झालें. शरद् ऋतूंत उमलणाऱ्या फुलांच्या ताटव्यांनीं पृथ्वीतलावर जणूं काय चित्रविचित्र वर्णांचा गालिचा आंथरला आहे असें दिसूं लागलें. कोठें अगदीं पांढराशुभ्र वर्ण, तर कोठें नील, पीत, वगैरे वर्णांशीं त्याचें मिश्रण झालेलें; मध्येंच एखादे ठिकाणीं तांबडा रंग तर त्याचे मागून सबजी रंग; कोठें हिरवा रंग तर कोठें पिंवळा रंग व कोठें निरनिराळ्या रंगांच्या छटा; अशी विलक्षण शोभा दिसत होती. एक रंग जसजसा मंद होत जाई तसतसा दुसरा जास्त गहरा होत होता, आणि ज्या ठिकाणीं फुलांच्या रंगांच्या वैचित्र्यांत उणें पडे, त्या ठिकाणीं चित्रविचित्र रंगांच्या दगडांनीं तें वैगुण्य भरून काढलें जाई. या गालिच्याच्या चारी दिशांना सुगंधि पुष्पांनीं आपला सुगंध विखरून सगळी हवा सुवासित करून सोडली होती. या स्थलाच्या मध्यभागीं एक प्रचंड सरोवर होतें. त्याला संगमरवरी दगडाच्या पायऱ्यांचे घाट बांधलेले होते. पाणी स्फटिकासारखें स्वच्छ होतें. त्यामुळें त्याचे तळचे दगड सुद्धां स्पष्ट दिसत होते. सरोवराच्या मध्यभागीं एका कांठावरून समोरच्या काठावर जाण्यासाठीं पांढऱ्या संगमरवरी पाषाणांचाच एक पूल केला होता. त्याच्या कठड्याला मरकत नांवाचे बहुमोल मणि जडविलेले होते, आणि शिवाय नानारत्नांनीं भूषित असे खांब मधून मधून बसविले होते. यांवर शुक, सारिका, कोकिल, काकातुया (काकाकुवा) व इतर मंजुळ ध्वनि करणारे पक्षी स्वच्छंदानें येऊन

बसत आणि गात. मोर आपला शोभिवंत पिसारा उभारून आनंदानें नाचत होते. ह्या गाण्यानें व नृत्यानें पक्षिगण राजाधिराज विश्वामित्र महाराज यांचें स्वागतच जणूं काय करीत आहे असें दिसत होतें. त्या सरोवराच्या स्वच्छोदकांत लाल, नील, पीत, हरित, हरिद्रा प्रभृति नानावर्णांचे मासे सोडलेले होते. सरोवराच्या पलीकडच्या बाजूलाही वरच्या सारखाच अवर्णनीय शोभिवंत सृष्टिजन्य गालिचा पसरलेला होता; आणि तेथून जवळच एक प्रासाद होता. याच्या दरवाजावरचें तोरण स्पर्शमण्यांचें केलें होतें. दाराच्या कमानीवर 'स्वागतं गाधिकुलतिलकस्य विश्वामित्रस्य' अशीं स्वर्णाक्षरें खोदलेलीं होतीं.

विश्वामित्र आंत प्रवेश करतांच तेथील शोभा पाहून चकित झाले. आपण एवढी पृथ्वी पादाक्रांत केली, तथापि असा सुंदर व शोभिवंत प्रासाद आपल्या पाहण्यांत कोठेंही नाहीं असें त्यांना वाटलें. हिरे, मोत्यें, पाच वगैरे रत्नांचा उपयोग त्या स्थलाला शोभिवंत करण्याचें कामीं सढळ हातानें केलेला होता. बहुमूल्य रत्नांनींच तो वाडा बांधून काढला होता म्हटलें तरी चालेल. या वाड्याच्या भिंतीवर परशुरामाच्या चरित्रांतल्या ठळक ठळक कथांचीं चित्रें काढलीं होतीं; कोठें तो क्षत्रियांच्या रक्तानें पितरांचें तर्पण करीत आहे व कोठें युद्ध करून त्यांचा निर्वंश करीत आहे अशा तऱ्हेचीं एकवीस मोठालीं भव्य चित्रें काढलीं होतीं.

हा सगळा प्रकार पाहून तर विश्वामित्र भांबावल्यासारखेच

झाले. मग त्यांच्या लक्षांत आलें कीं आपण मागें वसिष्ठाचें स्वागत केलें होतें, आणि त्या वेळीं त्यांच्याशीं थोडेंसें संभाषण झालें होतें त्याची ही फेड आहे. त्यांच्या मनांत हळू हळू चलबिचल उत्पन्न झाली, आणि तिनें वाढतां वाढतां द्वेषाचें स्वरूप धारण केलें; तथापि त्यांनीं आपला मनोभाव प्रकट न करतां त्या आतिथ्याचा स्वीकार केला. पान, भोजन, गायन, नृत्य इत्यादि गोष्टी यथासांग पार पडल्या. शेवटीं विश्वामित्र जाण्यास निघाले, तेव्हां वसिष्ठांनीं त्यांना देण्याकरितां बहुमोल नजराणा आणिला. तेव्हां मात्र विश्वामित्राच्यानें राहवेना. ते म्हणाले, ' महात्मन्, आपण ऋषि, या तपोवनांत आश्रम करून राहणारे; असें असतां हें एवढें ऐश्वर्य आपणांस कसें प्राप्त झालें तें ऐकण्याची माझी इच्छा आहे. '

वसिष्ठ—राजाधिराज, देवाच्या दयेनें आमच्या या आश्रमांत कामधेनूची मुलगी—नंदिनी—आहे. तिचा हा प्रभाव आहे. ती इच्छित वस्तु देत असते.

विश्वा०—तर मग या अल्पस्वल्प देणग्यांनीं माझी तृप्ति होणार नाहीं. मला आपण तेवढी कामधेनु द्यावी.

वसिष्ठ—जेव्हां ही वासरी तिच्या आईपासून मीं आणिली, तेव्हां मी हिला दुसऱ्या कोणालाही देणार नाहीं अशी कबुली केली आहे. तो वचनभंग मी कसा करूं ?

विश्वा०—आणि जर तुम्ही मला देणार नाहीं तर अति-

थीचा अपमान केल्याचें पाप लागेल या गोष्टीचा विचार करा. समाजाला नीतीचे नियम घालून देणारे आपणच आहां.

वसिष्ठ—बळजबरीनें अथवा युक्तिप्रयुक्तीनें एखाद्याला वचनभंग करावयास लावणें हें महत्पाप आहे. तेव्हां अशा कार्यापासून आपण परावृत्त व्हावें अशी माझी आपणांस प्रार्थना आहे.

आतां आपल्या मनांतला भाव प्रकट केल्यावांचून विश्वामित्राच्यानें राहवेना. ते म्हणाले, " आपण मला कामधेनु देत नाहीं काय? बरें आहे, मीच तिला हरण करून नेतों. एखाद्याची वस्तु हरण करून नेणें हें वचनभंगापेक्षां मोठेंसें पाप आहे असें नाहीं." इतकें बोलून नंदिनीला हरण करून नेण्याविषयीं विश्वामित्रानीं आपल्या सेवकांस हुकूम केला.

आतां वसिष्ठाला एकीकडे आड, एकीकडे विहीर, असें झालें. अतिथि म्हटला म्हणजे प्रत्यक्ष देवाचा अंश. त्याची अवज्ञा कशी करावी ? दुसरीकडे नंदिनीला बळजबरीनें हरण करून नेत असतां आपण स्वस्थ राहावें हेंही वाईटच! अशा अडचणींत वसिष्ठांना कांहीं उपाय सुचेना. ते स्तब्ध उभे होते. इकडे विश्वामित्राचे सेवक यजमानाच्या आज्ञेप्रमाणें धेनूला बळजबरीनें नेण्यास तयार झाले. तेव्हां ती धेनु डोळ्यांत आंसवें आणून दीनवाणी वसिष्ठाकडे पाहूं लागली. तिची ती केविलवाणी मुद्रा पाहून वसिष्ठांच्याही डोळ्यांला पाणी आलें आणि ते म्हणाले, ' बाई, काय करूं ? हा अतिथि प्रबल दिग्विजयी राजा आहे आणि मी गरीब ब्राह्मण आहें. हा तुला बलात्का-

रानें नेत आहे. तेव्हां आतां तुझा तूंच विचार पहा.' वसिष्ठांनीं इतकें म्हणण्याचा अवकाश! इतक्यांत नंदिनीनें मोठा हंबरडा फोडला. त्या आवाजानें सगळें आकाशपाताळ भेदलें जाऊन त्यांतून पारद, पारस, चीन, शान, मान प्रभृति नाना जातींचे असंख्य वीर सशस्त्र होऊन तिच्या रक्षणार्थ बाहेर पडले.

हा प्रकार पाहून विश्वामित्र मनांत म्हणाले, 'ज्या या पारदादि वीरांना माझे सेनापति बाहुबलानें वश करूं शकले नाहींत, त्यांना या वसिष्ठ ऋषींनीं आपल्या बुद्धिप्रभावानें अंकित करून सोडलें आहे. तस्मात् बुद्धिप्रभावानें मनुष्यप्राणीही वश करून घेतां येतात असें म्हटलें पाहिजे!'

३

पराभव.

क्षत्रियसैनिक व यवनवीर यांच्यामध्यें त्या नंदिनीवरून मोठें भांडण सुरू झालें. एका बाजूला क्षत्रियसैनिक व दुसऱ्या बाजला यवनवीर होते; मध्यें नंदिनी उभी होती. ती निघून जाण्यासाठीं वारंवार धडपड करीत होती, आणि क्षत्रिय तिला जाऊं देत नव्हते. तिला सोडविण्याचा यवनांनीं यत्न केला, आणि त्यामुळें युद्ध सुरूं झालें. यवन आणि क्षत्रिय यांच्यांत युद्ध! आणि तें कोणा-


करितां तर तटस्थ राहिलेल्या ब्राह्मणासाठीं! तलवारीचीं पात्यांवर पातीं झळकत होतीं; भाल्यांच्या उंच उंच फेंकी चालल्या होत्या. आणि प्रचंड धनुष्यांचे टणत्कार प्रळयकाळच्या मेघगर्जनेप्रमाणें भयंकर वाटत होते. विश्वामित्रानें आपल्या सैन्याचें सेनापतित्व स्वतःकडे घेतलें होतें. ब्राह्मणाच्या पक्षाला कोणी सेनापति नव्हता. वसिष्ठ स्वतः अतिथीबरोबर युद्ध करण्यास तयार नव्हते; इतकेंच नाहीं, तर त्यांनीं पुत्रांना व शिष्यांना युद्ध करण्याची मनाई केली होती. ' ब्राह्मणस्य बलं क्षमा, ' ब्राह्मणांनीं युद्ध करूं नये असें त्यांचें त्यांना सांगणें होतें.

ब्राह्मणांनीं युद्ध केलें नाहीं, तथापि युद्ध चाललेंच होतें. लवकरच रक्तपाताला सुरुवात झाली. रणभूमीवरची धूळ त्या रक्ताच्या प्रवाहानें भिजून तिचा गाढ चिखल झाला. विश्वामित्राचे शेकडों हत्ती, घोडे, रथी व पायदळ मारलें गेलें; रथ मोडून छिन्नविच्छिन्न झाले. शेवटीं विश्वामित्र स्वतः हातांत प्रचंड खड्ग घेऊन आवेशानें गर्दींत शिरले. त्यांनीं खड्गाच्या एकेका प्रहारानें अनेक यवनांचीं मस्तकें छेदावीं असें चाललें होतें. तरी आपले प्रयास व्यर्थ होत असें विश्वामित्राला लवकरच दिसून आलें. कारण नंन्दिनीच्या एका हुंकाराबरोबर एक अक्षौहिणी सेना उत्पन्न होई. या नव्या सेनेपुढें विश्वामित्राच्या रणधुरंधरवीरांचा टिकाव लागेना. आपलें कांहीं चालत नाहीं असें पाहून विश्वामित्रानीं शेवटीं नंदिनीला ठार करण्याचा हुकूम दिला.

नंदिनी अद्याप क्षत्रियांच्या ताब्यांत गेली नव्हती. त्यांनीं तिला धरून मारण्यासाठीं नाराच, बल्लमादिकांचा प्रयोग करून पाहिला. त्याबरोबर तिनें दिव्य स्त्रीरूप धारण करून आकाशमार्गानें प्रयाण केलें. श्वेतपद्मावर आरूढ झालेली, श्वेतवस्त्रानें विभूषित, हातांत श्वेतवर्ण वीणा आणि अंगावर श्वेतपद्मांचीं भूषणें धारण केलेल्या अशा तिच्या दिव्य कांतीनें पौर्णिमेच्या रात्रींच्या चांदण्याच्या धवलकांतीलाही लज्जित केलें होतें आणि तिच्या लावण्यानें सगळें जग प्रकाशमय झालें होतें. ती वर गेल्यावर म्हणाली, " रे मूर्खा, मी ब्राह्मणांची विद्यादेवी सरस्वती आहें. मला हरण करण्याची तुझी काय शक्ति आहे? मी पिढ्यानपिढ्या ब्राह्मणकुलांत राहत आलयें आहें, आणि पुढेंही राहीन. "

हा एकंदर प्रकार पाहून विश्वामित्र अगदीं चकित झाले. सरस्वती देवी पुनः गाईचें रूप धारण करून वसिष्ठाजवळ गेली, आणि सगळें यवनसैन्य एकाएकीं अंतर्धान पावलें. वसिष्ठाच्या नेत्रांतून खळखळ अश्रुधारा वाहूं लागल्या, आणि ते आनंदानें व प्रेमानें नंदिनीला कुरवाळूं लागले.

विश्वामित्राला आतांपर्यंत पराजय कसा असतो तो ठाऊक नव्हता. तो या खेपेला प्राप्त झाल्यामुळं त्यांच्या मनाला अत्यंत विषाद, दुःख, व हेवा वाटला व त्यांनीं मान वर करून वसिष्ठांकडे किंवा नंदिनीकडे पाहिलें सुद्धां नाहीं. त्यांनीं रागानें हातांतलें धनुष्य फेंकून दिलें, सैन्याला आपापल्या घरीं परत



"रे मूर्खा, मी ब्राम्हणांची विद्यादेवी सरस्वती आहें."

(पृष्ठ ३६.)

Printed especially for A. C. Bhat, POONA.

The Bombay Art Printing Works, Fort.

जाण्यास सांगितलें आणि राज्याचा कारभार सगळा मंत्र्यांकडे सोंपविला. मग ' धिक् बलं क्षत्रियबलं ब्रह्मतेजोबलं बलम् ।' असे उद्गार काढून ब्राह्मणत्व प्राप्त करून घेण्यासाठीं तपश्चर्या करण्याकरितां त्यांनीं हिमालयाच्या कंदरांत प्रवेश केला.

केवळ बाहुबलानें सगळ्या जगांत एकी करतां येईल असें विश्वामित्रांचें म्हणणें होतें. त्याची व्यर्थता त्यांना आतां दिसून आली.



खंड तिसरा.

१

तपश्चर्या.

विश्वामित्र कोणीकडे गेले तें कोणालाच कळलें नाहीं. ते सैन्याबरोबर नव्हते हें खास. मंत्री राज्याचा कारभार पाहूं लागले. यजमान आज परत येतील, उद्यां येतील, अशी आशा करतां करतां दिवस गेले, महिने गेले, वर्षें लोटलीं. ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचा मिलाफ करण्याचा वसिष्ठांचा उद्योग सुरूच होता; पण तो प्रयत्न निष्फळ झाला. कारण विश्वामित्राच्या पक्षाची मंडळी त्यांचा द्वेष करूं लागली.

इकडे विश्वामित्र पहावे तर घोर तपश्चर्येंत निमग्न! मी स्वतः ब्राह्मण होऊन, ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचा मिलाफ करीन, आणि अशा रीतीनें या दोन मुख्य जातींची एकी केल्यावर या समुद्रवलयांकित पृथ्वीचें प्रभुत्व करून एकच्छत्री राज्याखालीं सर्वांना आणून सोडीन हा त्यांचा मनोदय होता. यासाठींच ते हिमालयाच्या एका अत्यंत निबिड अरण्यामध्यें गेले, आणि अत्यंत दुर्गम अशा स्थानीं बसून त्यांनीं घोर तपश्चर्या आरंभिली. पहिल्या दिवशीं एकच घास खावयाचा, दुसऱ्या दिवशीं

अर्धाच, तिसऱ्या दिवशीं एकच दाणा, चवथ्या दिवशीं अर्ध्या-दाण्यावर जिवाची तृप्ति करावयाची, त्यानंतर पाण्याचा एकच थेंब तोंडांत टाकावयाचा, दुसरे दिवशीं तोही नाहीं, अशा रीतीनें क्रमाक्रमानें त्यांनीं आहार अजिबात बंद करून तपश्चर्येला सुरुवात केली. त्यामुळें शरीर क्षीण झालें. थंडी, वारा, ऊन, पाऊस हीं सगळीं त्यांनीं अंगावर घेतलीं. तथापि त्याचें त्यांना कांहीं वाटलें नाहीं. डोळ्याचें पातें सुद्धां उघडलें नाहीं. केवळ ध्यान ! ध्यानावांचून व्यवसाय नाहीं. डोळे खोल गेले; नाकांतलें प्रत्येक हाड स्पष्ट दिसूं लागलें; शरीराचा अस्थिपंजर मात्र उरला; जटाभार वाढत वाढत जमिनीवर लोळूं लागला; हातापायांचीं नखें वाढत वाढत झाडाच्या मुळांसारखीं जमिनींत घुसलीं; अंगावर मुंग्यांनीं वारुळ केलें; तरी विश्वामित्रांचें ध्यान संपेचना ! वाघ, लांडगे वगैरे हिंस्र पशु देखील समोर आले तर उपद्रव न देतां मुकाट्यानें दूर निघून जात.

अशा भयानक अवस्थेंत विश्वामित्रांना नानाप्रकारचे साक्षात्कार होत. कधीं कधीं हें सगळें विश्व लय पावून त्याचे परमाणु वेगळे वेगळे झाले आहेत, आणि आपण एकटे केंद्रस्थानीं असून आपलें शरीर वाढत वाढत जाऊन त्यानें सारें विश्व व्यापिलें आहे; आपल्या तेजानें सर्व परमाणु दग्ध झाले आहेत, आणि शेवटीं स्वतःचें शरीरही दग्ध झालें आहे असें त्यांना दिसे. त्या दारुण अंतर्ज्वालांनीं त्यांची समाधी उतरे, आणि पाहतात तों अगदीं निराळाच देखावा! समोर अत्यंत स्वरूपवान्, अप्सरेपेक्षांही

सुंदर, अशा युवती–कोणी नृत्य करीत आहेत; कोणी गरगरा फिरत आहेत, कोणी कामलालसेनें विव्हल होऊन शरीराचें आंदोलन करीत आहेत; कोणी अर्धनग्न होऊन कमरेवर हात देऊन उभ्या आहेत; कोणी केव्हां कोमल, केव्हां चंचल, आणि केव्हां हृदयास भेदून जाणाऱ्या कठोर नेत्रकटाक्षांचा वर्षाव करीत आहेत; त्या स्त्रिया केव्हां सुस्त तर केव्हां बिजलीसारख्या चंचल अशा नानाविध नेत्रांच्या हावभावांनीं आपला हेतु व्यक्त करीत आहेत; त्यांचे ते कटाक्ष बाणासारखे एका मागून एक सपाट्यानें येऊन भेद करीत आहेत; त्या युवतींपैकीं कोणी वेणीं घातली आहे; कोणीं आपले लांब, सडक व तुळतुळीत केंस तसेच पाठीवर मोकळे सोडले आहेत; कोणाचे केंस कुरळे आहेत; कोणाचे वायूच्या लहरींबरोबर दोलायमान होत आहेत; आणि सगळयाच स्त्रिया अशा नानाप्रकारच्या कामचेष्टा दाखवून केवळ विश्वामित्राचें मन वश करण्याच्या उद्योगांत होत्या. हा प्रकार विश्वामित्रानीं पाहिला, आणि त्यांचा अंतर्दाह किंचित् शमून, ते पुनः ध्यानस्थ झाले.

आतां एक नवाच चमत्कार स्वप्नासारखा त्यांना दिसूं लागला. कोट्यवधि सूर्य उदय पावले आहेत; त्यांच्या तेजानें डोळे दिपून जात आहेत; आणि उष्णतेनें शरीर दग्ध होत आहे; आपण (विश्वामित्र) तेथून दूर पळून जात आहों; जातां जातां फार दूर गेल्यावर सूर्याचें तेज मंद झालें खरें, पण या नव्या ठिकाणीं लक्षावधि भयंकर सर्प आपणांस दंश करीत आहेत, असें विश्वामि-

त्रानीं पाहिलें; आणि त्या विषाच्या ज्वालांनीं त्यांची समाधी उतरली. समाधी उतरून डोळे उघडतात तों एक भयंकर प्रकार दृष्टीस पडला. नानाप्रकारचे भयंकर आकाराचे हिंस्र पशु त्यांच्या समोर उभे ! कोणाच्या दाढा डुकराच्या दाढांसारख्या भयंकर असून मानेवर सिंहासारखी आयाळ व शेपटें कित्येक योजनां-इतकीं लांब. कोणाचें स्वरूप पिशाच्यासारखें भयंकर! डोक्यावर डोळे, अर्धे अंग ह्मणजे नुसते हातच, आणि दोन हात व दोन पाय लांब करून चारी दिशांनीं भक्ष्याचा शोध करीत आहेत, आणि जें सांपडेल तें घशाखालीं उतरीत आहेत. कोणाचे दांत डुकराच्या सुळक्यासारखे व तीक्ष्ण आहेत; कोणाचे हत्तीसारखे आहेत; कोणाचीं डोकीं पर्वतशिखरांसारखीं आहेत; कोणाचें नुसतें डोकेंच दिसत आहे—त्यांना हातपाय आहेत कीं नाहींत कोण जाणे! कांहीं स्त्रीपिशाच्यांचे नुसते काळे स्तन पर्वत-शिखरायेवढे! कांहीं काळ्या रंगाचे आहेत; कांहीं निळया, कांहीं पिंवळ्या. अशा भिन्न भिन्न वर्णांच्या पशूंचीं स्वरूपें भयानक दिसत होतीं यांत आश्चर्य कोणतें! त्यांच्या मुख्याच्या हुकुमावरून जेव्हां त्यांच्या टोळ्या विश्वामित्रावर तुटून पडल्या, तेव्हां त्यांची प्रथम पांचावर धारण बसली. तथापि त्यांच्या नुसत्या नेत्रकटाक्षानें ती पिशाच्चसेना पिटाळून लाविली. त्या पळण्याच्या धांदलींत कोणाचे हातपाय मोडले, कोणी चेंगरले जाऊन मेले, कोणाचीं डोकीं फुटलीं, स्त्रीपिशाच्चांचे स्तन गळून त्यांचे देहभार हलके झाले; एकाचें डोकें दुसऱ्याच्या-

धडावर जाऊन बसलें, दुसऱ्याचे पाय तिसऱ्याच्या धडाला लागून तें थैयमान करूं लागलें !

अशा प्रकारें पिशाच्चसेनेचा नाश झाल्यावर तिचा नायक विश्वामित्राची कृपा संपादन करण्यासाठीं हंसत हंसत पुढें आला आणि म्हणाला, ' विश्वामित्रा! तूं महान् पराक्रमी आहेस यांत शंका नाहीं. तूं भुजबलानें जसा या पृथ्वीवर दिग्विजय केला, तसा तपोबलानें आमच्या या पिशाच्चसेनेचाही ध्वंस करून टाकला आहे. तेव्हां तूं माझा पुत्र हो. हें जें अखिल विश्व–ब्रह्मांड–तूं पाहतोस, त्यांतले सगळे असुर, पिशाच्च, दैत्य, दानव इत्यादिकांचा मी अधिपति आहें. ते सगळे माझ्या आधीन आहेत. मलाही कोणी उत्तराधिकारी नाहीं, तेव्हां तूंच माझा उत्तराधिकारी हो. तुला एका क्षणांत राज्यपदावर बसवून मी विलासभोगांत निमग्न होईन. तूं माझा पुत्र झालास ह्मणजे या हिमालयाच्या शिखरावरून दिसणारीं असंख्य, धनसंपन्न व समृद्ध राज्यें तुझीं होतील. चीन, जपान, मिसर, पारस्य, सर्व देशांचा स्वामी तूं होशील. ज्या या सुंदर युवती तुझ्या मनाला मोह पाडण्याकरितां येथें आल्या होत्या, त्याही तुझ्या होतील. जेवढ्या म्हणून सोन्याचांदीच्या व रत्नांच्या खाणी भूगर्भांत आहेत त्यांचें स्वामित्व तुला मिळेल. माझी प्रजा असंख्य आहे. तूं माझा पुत्र झालास म्हणजे या सगळ्या प्रजेचा तूं एकटा स्वामी होशील. मग तुला कोणत्याही प्रकारची चिंता वाहावी लागणार नाहीं. काळजी करावी लागणार नाहीं. तूं या माझ्या

राज्यावर स्थिर होईतोंपर्यंत मी स्वतः पाहिजे तर तुझ्याजवळ राहून सर्वांचा नीट बंदोबस्त राखीन.'

विश्वामित्र म्हणाले, ' तें सगळें खरें, पण मला ब्राह्मणत्व देण्याचें सामर्थ्य तुमचे अंगीं आहे काय ? नंदिनी, विद्या, सरस्वती या देण्याचें तरी ? '

' नाहीं बाबा, तेवढें सामर्थ्य नाहीं. पण ब्राह्मणांबरोबर वाद करण्याचें सामर्थ्य मी तुला देऊं शकेन. नंदिनीला मारून टाकण्याचें सामर्थ्य देतां येईल. विद्येचा उच्छेद करतां येईल, सरस्वतीचें मात्र कांहीं करतां येणार नाहीं. '

' तर मग तुमचा मला कांहीं उपयोग नाहीं ' असें म्हणून विश्वामित्र पुनः ध्यानमग्न झाले.

२

मंत्रदर्शन.

आतां त्याचे डोळे मिटलेले नव्हते. श्वासनिरोध, एकाग्रचित्त, आणि निराहार यांच्या योगानें डोळे मिटतच नव्हते. डोळे जरी उघडे राहिले, तरी त्यांची दृष्टि सर्वथा अंतर्गामी असल्यामुळें बाह्य जगताचें ज्ञान त्यांना यत्किंचित्‌ही शिवलें नाहीं. त्यांच्या कर्णरंध्रांतून जात्याच्या घरघर आवाजासारखा कांहीं ध्वनि निघूं लागला, आणि नाकांतून अग्नीच्या

ठिणग्या बाहेर येऊं लागल्या. हा ध्वनि निघूं लागतांच राशि-चक्रही त्यांच्या मस्तकाभोंवतीं उजवीकडून डावीकडे भ्रमण करूं लागलें. आकाशगंगेचाही ओघ वळला. पाहतां पाहतां त्यांच्या डोक्याची कवटी आंतील अग्नीच्या ज्वाळेनें वर अंत-राळीं उडून जाऊं लागली. कांहीं चमत्कारिक नाद सगळ्या-विश्वांत घुमूं लागला. तो आकाशांत सारखा घुमत राहिला. शेवटीं ब्रह्मांडाची कपालिका विदीर्ण करून तो बाहेर निघून गेला.

मग बाहेरून अनवरत शतसहस्र गर्जनेप्रमाणें पुढील नाद ऐकूं आलाः—

ॐ भूर्भुवः स्वः
तत्सवितुर्वरेण्यम्
भर्गो देवस्य धीमहि
धियो यो नः प्रचोदयात् । ॐ

विश्वामित्रांनीं तो ध्वनि श्रवण केल्याबरोबर त्यांच्या डो-क्याची कवटी वर उडून गेली होती ती परत खालीं आली. एका क्षणांत त्यांचें शरीर बलयुक्त व तेजःपुंज झालें. ते आपल्या मनाशीं म्हणाले, ‘ ब्राह्मणत्व प्राप्त झालें नाहीं तर नाहीं; पण मंत्रदर्शनाचा अधिकार ब्राह्मणांनीं स्वतःकडेच फक्त ठेविला होता, तो तर भंग पावला ! पुरे आहे.’ इतकें म्हणून ते पुनः ध्यानांत निमग्न झाले.

३

ब्रह्मर्षींची सभा.

विश्वामित्राच्या तपश्चर्येमुळें ब्रह्मांडांत जी मोठी क्रांति घडून आली, तिच्या विषयींची माहिती लवकरच सर्वांना कळली. ब्रह्मदेवानीं विश्वामित्राला ब्राह्मण करून घ्यावयाच्या प्रश्नासंबंधानें विचार करण्यासाठीं ब्रह्मर्षींची महासभा बोलाविली. कण्व, वसिष्ठादि ब्रह्मर्षि आणि नारदादि देवर्षि सभेला आले. ही सभा आकाशांत झाली. तेव्हां आज शताधिक सूर्यांचा उदय झाला आहे कीं काय असा लोकांना भास झाला. या सभेनें एका शूद्र राजाला ब्राह्मण करून घेतलें. मागच्या प्रकरणांत विश्वामित्राला जो मंत्र दिसला म्हणून सांगितलें आहे, तो गायत्रीमंत्र होता व हा मंत्र जपण्याचा अधिकार एकट्या ब्राह्मणजातीचाच आहे असेंही या सभेमध्यें ठरविण्यांत आलें. ह्या गायत्रीमंत्राचें दर्शन विश्वामित्राला घडलें, तरी त्याला ब्राह्मण करून घेण्याच्या ब्रह्मदेवाच्या सूचनेला ब्रह्मर्षि व देवर्षि यांपैकीं कोणाचें अनुमोदन मिळेना. कोणी ह्मणाले, ‘ विश्वामित्र प्रतिस्रष्टा होऊं पहात आहे. त्याला ब्राह्मणत्व आणि विद्या हीं प्राप्त झालीं म्हणजे मग तर बोलायासच नको; सृष्टीचा अंतच व्हावयाचा ! ’ दुसरे कित्येक म्हणाले, ‘ त्याची महत्वाकांक्षा फार जबर आहे.

आज त्याला ब्राह्मणत्व पाहिजे आहे. उद्यां प्रत्यक्ष ब्रह्मपदच मागणार नाहीं कशावरून? तेव्हां असल्या कामांत उत्तेजन देणें योग्य नाहीं.' शेवटीं सर्वांनीं ब्रह्मदेवाला आपला प्रतिनिधि करून पाठविण्याचें ठरलें आणि ब्राह्मणत्वाखेरीज दुसरें जें कांहीं विश्वामित्र मागेल तें त्याला देण्याचा अधिकारही ब्रह्मदेवाला देण्यांत आला.

मग सूर्यकिरणांच्या रथावर आरूढ होऊन आणि सूर्यकिरणांपेक्षांही ज्यास्त प्रभा फांकीत ब्रह्मदेवाची स्वारी विश्वामित्र बसले होते त्या हिमालयाच्या गुहेंत प्रविष्ट झाली. त्यांनीं विश्वामित्राला त्यांच्या समाधींतून जागृत करून म्हटलें, 'मी ब्रह्मदेव आहें. तुझी तपश्चर्या पाहून प्रसन्न होऊन वर देण्यासाठीं आलों आहें. काय वर देऊं बोल. देण्यासारखा असल्यास अवश्य देईन.'

विश्वा०—मला ब्राह्मणत्व पाहिजे. देतां का?

ब्रह्म०—नाहीं.

विश्वा०—तर मग अशा ब्रह्मदेवापासून मला कांहीं एक वर नको.

ब्रह्मदेव थोडेसे खजिल झाले आणि पुनः सूर्यकिरणांच्या रथावर आरूढ होऊन ते ब्रह्मर्षींच्या सभेंत येऊन पोंचले. विश्वामित्राला ब्राह्मण करून घेण्याविषयीं ब्रह्मदेवानीं सभेपुढें सूचना मांडली, पण तिला कोणीही अनुमति देईना. सर्वांनीं विचार करून

शेवटीं असें ठरविलें कीं, सगळ्याजणांनीं मिळून जाऊन दुसरा कांहीं वर माग असें विश्वामित्रास म्हणावें. वसिष्ठांची त्यांच्याबरोबर जाण्याची प्रथम इच्छा नव्हती, पण ब्रह्मदेवादिकांनीं विशेष आग्रह केल्यामुळें त्यांनीं जाण्याचें कबूल केलें. मग एकाहून एक तेजःपुंज अशी ही मंडळी कोणी सूर्यकिरणांच्या रथावर तर कोणी वायूरूपी अश्वावर आरूढ होऊन, कोणी मनोजवानें तर कोणी योगबलानें, एका क्षणांत विश्वामित्राजवळ येऊन दाखल झाली. ब्रह्मदेवानें पुनः एकदां विश्वामित्राच्या समाधीचा भंग केला. वर देण्यासाठीं आलेल्या मंडळींत वसिष्ठ आहेत हें पाहून विश्वामित्रांना कोप चढला; तथापि त्यांनीं बराच वेळ मौन धरलें. मग आलेल्या मंडळीनें बोलण्यास प्रारंभ केला. ते म्हणाले, ' ब्राह्मणत्व म्हणजे यःकश्चित् गोष्ट! आपण महापुरुष! आपली योग्यता काय सांगावी! आपलें तेज किती अवर्णनीय! आपण ब्राह्मणांहून श्रेष्ठ असे महान् तपस्वी आहां. ब्राह्मणांनीं स्वतः आपले मंत्र पठण करावे व जपावे असा नियम घालून दिल्यावर आपण ब्राह्मणत्व संपादन केल्यासारखेंच झालें! ब्राह्मणाच्या मागें अनेक कष्ट, अनेक व्रतें व नेमधर्म लागले आहेत. आपण राजे आहां, आपणांस ते फार त्रासदायक वाटतील!"

विश्वा०—ज्यानें येवढी घोर तपश्चर्या केली त्या माझ्याच्यानें ब्राह्मणाचे नेमधर्म पाळवणार नाहींत काय?

मंडळी—पाळवणार नाहींत असें कोण म्हणतो? पण जिवाला इतके कष्ट करून घेण्याचें प्रयोजन तरी काय? त्यापेक्षां आपण

इंद्रपद मिळविण्याची खटपट केलेली काय वाईट! इंद्रपद हेंच आपणांस योग्य आहे. आपल्या तपश्चर्येनें संतुष्ट होऊन आम्हीं आपणांस राजर्षि हें पद देतों. ब्रह्मर्षि व देवर्षि यांच्या खालो-खाल राजर्षि हें पद आहे. आपणांस तिसऱ्या प्रतीचे ऋषि करण्यात आलें आहे. आतां आणखी ब्राह्मणत्व घेऊन काय करावयाचें आहे? राजर्षिपदास युक्त अशीं हीं चिन्हें धारण करा.'

या भाषणांतली खुबी विश्वामित्राच्या लक्षांत तेव्हांच आली. आपल्या तपश्चर्येमुळें ब्रह्मर्षिमंडळी गडबडून गेली आहे हें त्यांनीं ताडलें, आणि राजर्षिपदाचीं चिन्हें फेंकून देऊन म्हटलें, ' ब्रह्मर्षि गणहो, आपली युक्ति माझे लक्षांत चांगली आली आहे. अघळपघळ बोलून ब्रह्मर्षिपदापासून मला वंचित करण्याचा आपला यत्न आहे हें मला कळतें. पण आतां मी ब्राह्मणत्व चाहत नाहीं. ब्रह्मपदाची प्राप्ति आतां मला हवी आहे. इतःपर तुमची खुशामत करणें नको, आणि तपश्चर्याही नको. आतां मी नवी सृष्टि निर्माण करणार आहें, आणि तिचा स्रष्टा (ब्रह्मदेव) होणार आहें. माझ्या या नव्या सृष्टींतून दुःख पार घालविण्यांत येईल. ब्राह्मणांनाही दूर ठेवण्यांत येईल. पाहूं बरें मला या कामांत कोण प्रतिबंध करणारा आहे तो. '

वसिष्ठांनीं ब्रह्मदेवाला हळूंच खुणावून म्हटलें, ' कां ? मीं म्हटलें तसें झालें ना ? अजून ब्राह्मणत्व प्राप्त झालें नाहीं तोंच पहा केवढा ताठा आहे?' जमलेले ऋषि विश्वामित्राची नानाप्रकारें समजूत घालीत होते. ते ह्मणाले, ' आपण मनांत आणिलें

तर नवें ब्रह्मांड निर्माण कराल यांत काय नवल आहे? ज्यानें तपोबलानें ब्रह्मांड द्विखंडित केलें त्यानें तें नवीन निर्माण केल्यास काय आश्चर्य आहे! पण आम्ही आपले बांधव आहों; आमच्या दोन हितगुजाच्या गोष्टी ऐकून घ्याव्या. येवढे सायास करण्याचें काय कारण आहे? आपण या लोकीं अद्वितीय आहांत. ब्राह्मण आणि ब्रह्मदेव यांचेही वर आपली पायरी आहे. मग नवी सृष्टि निर्माण करण्याचे श्रम आपण कां घेतां?

विश्वा०—या जगांतून ब्राह्मणकुलाचीं पाळेंमुळें खणून काढा, म्हणजे मी सृष्टि निर्माण करण्याचें काम थांबवीन. ब्राह्मण पाहिले म्हणजे माझ्या नेत्रांना शूल उत्पन्न होतो.

विश्वामित्राचें हें भाषण ऐकून ब्रह्मदेवादि मंडळी रागानें कंपायमान होऊन तेथून त्वरेनें उठून गेली. विश्वामित्रही नवी सृष्टि निर्माण करण्याच्या उद्देशानें ब्रह्मांडाच्या पर्यवेक्षणासाठीं धवलगिरीचें अत्युच्च शिखर चढूं लागले.

खंड चौथा.

१

साहित्याच्या शोधांत.

शरद् ऋतूंत आकाशाकडे सहज नजर फेंकली तरी असंख्य तारासमूहांच्या मधन मधून पांढऱ्या धुक्याप्रमाणें अस्पष्ट असें कांहीं कधीं कधीं दिसतें. दुर्बिणींतून पाहिलें असतां त्याचें स्वरूप थोडेंसें अधिक स्पष्टपणें दृग्गोचर होतें. हें नवीन सृष्टि निर्माण करण्याचें साहित्य होय. पृथ्वी किंवा ग्रहमाला निर्माण होण्यापूर्वींची ही स्थिति असते. नीहारासारखें (धुक्यासारखें) हें दिसतें ह्मणून याला संस्कृतांत नीहारिका (*Nebulæ*) म्हणतात. ज्या दिवशीं ब्रह्मदेव व ब्रह्मर्षि यांच्याशीं वाद केल्यावर विश्वामित्र धवलगिरीच्या उंच शिखराकडे चालते झाले, त्या दिवशीं प्रथमतः त्यांच्या नजरेला या सगळ्या नीहारिका पडल्या. त्या पाहतांच ते शून्यमार्गानें तिकडे धांवत गेले. आगगाडीच्या वेगानें म्हणा, बाणाच्या वेगानें म्हणा, किंवा विद्युल्लतेच्या वेगानें म्हणा, राजर्षि विश्वामित्र आकाशमार्गानें चालूं लागले. एका क्षणांत लक्षावधि मैल ते जात होते. त्यांचा वर्ण तप्तकांचनासारखा होता आणि त्यांच्या पिंगट रंगाच्या जटा मोकळ्या सुटल्या असून

सूर्यप्रकाशात चमकत होत्या. प्रखर सूर्याच्या तेजांत भरादिवसा हा आकाशांतला चमत्कार पाहून हा अकालीं उल्कापात होत आहे, असें पृथ्वीवरील लोकांस वाटलें. रात्रीं वसिष्ठ आपल्या आश्रमांत एकटेच मंत्रसाधनाच्या उद्योगांत असतां एकाएकीं आकाशांत धूमकेतूचा उदय झालेला पाहून लवकरच कांहीं अनर्थापात होणार अशा शंकेनें त्यांचें हृदय कंपित झालें. जें हृदय मोठाल्या युद्धप्रसंगीं अढळ व ब्रह्मर्षींच्या सभेंत अक्षुब्ध राहिलें होतें तेंच आतां अकस्मात् भयभीत झालें. विश्वामित्र प्रथम वायुपथ, नंतर स्थिरवायुपथ, त्यानंतर कारणवारिपथ, अशा क्रमानें जातां जातां मंगळ, बृहस्पति वगैरे ग्रहांच्या कक्षांतून पलीकडे दुसऱ्या एका सौरजगतांत प्राप्त झाले. तेथील ग्रह व उपग्रह यांतून गेल्यावर ते तिसऱ्या सूर्यमालेंत आले. याप्रमाणें एका सौरजगतांतून दुसऱ्यांत व दुसऱ्यांतून तिसऱ्यांत याप्रमाणें जातां जातां निर्वात, निःसंज्ञ, निस्तब्ध, निःशब्द, अतर्क्य, कल्पनातीत, शून्यमय, अनंतांत ते प्राप्त झाले. हें अनंत, अनादि, गाढ, गभीर, अकुल, अतल, अलंघ्य, अपार, आकृतिहीन, भयंकर सागराप्रमाणें होतें. ग्रहनक्षत्रें वगैरे इतकीं दूर मागें राहिलीं कीं तीं अगदीं दिसेनाशीं झालीं. प्रकाशही क्षीण झाला. विश्वामित्राचें हें उड्डाण मानुषबलाचें नव्हतें, योगबलाचें होतें. म्हणूनच कल्पनेला सुद्धां अगम्य अशा या भयंकर स्थळीं त्यांच्या मनांत भयाचा संचार झाला नाहीं. या अगाध अनंतांत पुष्कळ दूर

गेल्यावर विश्वामित्रांनीं मंद प्रकाशाच्या साह्यानें पाहिलें तों त्यांना दिसलें कीं, कांहीं एका अदृश्य केंद्राच्या भोंवतीं सर्वबाजूंनीं अगाध, अमर्याद, असंख्य, परमाणु एकसारखे फिरत आहेत. ज्यांच्या कडेस जाण्यास आपण निघालों त्याच या नीहारिका आहेत असें पाहून त्यांनीं लवकरच आपली गति थांबविली.

२

नवा प्रकाश.

ते मग विश्वामित्रांनीं योगबलानें जाणलें कीं, अगाध, अनंत व शून्याकार आकाशांत असंख्य नीहारिका आहेत. त्यांनाही आपल्या योगबलानें ते ओढूं लागले, त्या वेळीं किती असंख्य ग्रह व नक्षत्रें त्या नीहारिकांमध्यें आकृष्ट झालीं असतील तें कोणाला सांगतां येणार आहे? अति मंद प्रकाशाच्या साह्यानें विश्वामित्र पाहूं लागले तों त्यांना दिसलें कीं जणूं काय अति विशाल देहाचे हे जलचर प्राणी आतां उडालेल्या खळबळीनें भयभीत होऊन स्फटिकाप्रमाणें स्वच्छ अशा सरोवराच्या तळाशीं आश्रय घेण्यासाठीं जात आहेत! अथवा जणूं काय प्रचंड मेघसमूह परस्परविरोधी दिशांनीं वाहणाऱ्या वायूंच्या योगानें ताडित होऊन एकत्र गोळ होत आहेत.

विश्वामित्राला पाहिजे होत्या तेवढ्या नीहारिका त्यांनीं गोळा केल्यावर त्यांना त्यांनीं योगबलानें चक्राकार गति दिली. प्रत्येक नीहारिका आपआपल्या केंद्राभोंवतीं फिरूं लागली आणि सगळ्या नीहारिका एका ठरीव मध्यबिंदूभोंवतीं फिरूं लागल्या. ही चक्राकार गति क्षणोक्षणीं वाढत वाढत इतकी वाढली कीं, या नीहारिका एका निमिषांत कोटि कोटि, खर्व खर्व, परार्ध परार्ध, कोस फिरूं लागल्या. त्या जसजशा वेगानें फिरत तसतसें त्यांचे परमाणु जवळ जवळ येऊन त्यांना घनता प्राप्त होई. ही घनता जसजशी वाढूं लागली तसतशी त्यांची उष्णता वाढूं लागली. क्रमाक्रमानें परमाणूंच्या मोठमोठाल्या राशी चमकूं लागल्या. परार्ध कोसांच्या अंतरावर असलेलीं नक्षत्रें कोणीकडे लुप्त झालीं. गाढ अंधःकार भेदून नव्या पृथ्वीवरल्या तमाला दूर सारून व चिर अन्धकारमय अशा अनंत गव्हराला प्रकाशित करून अनंत दिशा व्यापणारी प्रकाशपरंपरा एकेका पळांत सहा कोटि कोस अंतराचें आक्रमण करून जणूं काय वसिष्ठाला नव्या सृष्टीची खबर देण्यासाठींच वेगानें धांवत येत होती. या नव्या प्रकाशानें आणि नव्या सूर्यमालेनें विश्वामित्राचें समाधान झालें; आणि या सूर्याचा अग्नि कोटिकल्पांमध्यें सुद्धां शांत होणार नाहीं असें त्यांना वाटलें.

३

नवी सृष्टि.

कांहीं वेळानें विश्वामित्र म्हणाले, 'बुध निमाण होवो,' आणि असें म्हणतांच त्या फिरणाऱ्या ज्वलत् पदार्थांतून एक खंड वेगळा निघून कांहीं अंतरावर स्वतःच्या भोंवतीं फिरूं लागला. कांहीं वेळानें थंड होऊन त्यानें बुधग्रहाचें रूप धारण केलें. विश्वामित्रानें पाहिलें कीं, बुध ग्रह चांगला झाला आहे. मग शुक्र निर्माण होवो असें त्यांनीं म्हणतांच त्या तेजस्वी पदार्थराशींतून दुसरा एक खंड बाहेर पडून तोही आपल्या भोंवतीं फिरूं लागला. मग पृथ्वी निर्माण होवो असें ह्मणतांच आणखी एक तुकडा तसाच निघून त्याची पृथ्वी झाली. मग डोंगर, नद्या, बेटें, समुद्र वगैरे भेद झाले. आपल्या पृथ्वीशीं जुन्या पृथ्वीची तुलनाच होणार नाहीं असें विश्वामित्राला वाटलें. याप्रमाणें त्या अगाध परमाणुराशींतून एकेक गोल निर्माण होतां होतां तीन दिवसांत चंद्र, सूर्य, मंगळ, बृहस्पती, उल्का, धूमकेतु वगैरे आमच्या सैार जगांत असलेल्या सर्व गोष्टी विश्वामित्रानें निर्माण केल्या, विश्वामित्राची पृथ्वी आणि सूर्य हीं आमच्या पृथ्वीपेक्षां व सूर्यापेक्षां कोटिपट मोठीं होतीं. पृथ्वीवरून विश्वामित्राची सृष्टि प्रचंड दिसूं लागली.

४

नवी पृथ्वी.

तृण, वायु, जल, पर्वत, नदी, वन, वृक्ष, बर्फ वगैरे सगळ्या गोष्टी पृथ्वीवरच्या प्रमाणेंच विश्वामित्राच्या नव्या सृष्टींत होत्या. नवीन गोष्ट ह्मणजे एकच-नारळ-ही होती. कारण, त्या वेळीं नारळ या पृथ्वीवर होत नसत. या नव्या सृष्टींत हिंस्र पशु नव्हते. चित्रविचित्र रंगांनीं युक्त अशा पंखांचे पक्षी प्रेक्षकांची दृष्टि व मन दोन्ही मोहित करून सोडीत. कांहीं मनाला आनंद देणारे विचित्र पशुही होते. ते फार मनोहर होते. सगळेच पुष्पवृक्ष सुगंधि फुलांनीं युक्त होते. वृक्षांचीं पानें सुवासिक, खोडें सुवासिक, फुलें सुवासिक, सगळेंच सुवासिक आणि मधुर होतें. जमिनीवर उगवणारें गवतसुद्धां अत्तरापेक्षां अधिक सुवासिक होतें. आकाशांतून पाऊस पडे तो गुलाबपाण्याचा! जळणाऱ्या धूपाच्या सुगंधानें वायु सुगंधित झाले होते.

खाण्याचे पदार्थ पिकवावे लागत नसत. वन, जल, वायु, हेच त्यांचा पुरवठा करीत, आणि आणखीही हजारों वर्षें त्यांनीं ते जिन्नस पुरविले असते व शेतकीचीं कामें करण्याची जरूरच पडली नसती. जर लोकसंख्या अमर्याद रीतीनें वाढत जाऊन असंख्य झाली असती तर काय ती पंचाईत येऊन पडली असती. घर, दार, अंथरूण, पांघरूण, कशाची जरूर नव्हती. उत्तम,

सुवासिक, मऊ, कोमल तृणाची शय्या फार सुखकारक होत असे. पावसाळ्यांत आश्रयासाठीं डोंगर पोखरून सुंदर गुहा केलेल्या होत्या. दुपारच्या प्रखर उन्हाचा ताप होऊं नये ह्मणून रस्ते आच्छादलेले होते, आणि त्यांवर बर्फ ठेवण्याची योजना केलेली होती. यामुळें उघड्या मैदानांत उन्हाळ्यांत उन्हाचा त्रास होऊं लागला तर या आच्छादलेल्या रस्त्यांत यावें ह्मणजे शरीर गारेगार होत असे. विश्वामित्राला सृष्टिसौंदर्य अनुभवण्याचा भारी नाद असे; म्हणन पहाडावर चढून जाण्याच्या सोयीही त्यानें केल्या होत्या. लोकांना पर्वताच्या शिखरापासून तों समुद्राच्या तळापर्यंत सगळें कांहीं बारकाईनें निरखून पाहतां यावें म्हणून नानाप्रकारच्या तजविजी करण्यांत आल्या होत्या.

५

नवा मनुष्य,

आणि माणसें? तींही नवीं निर्माण झालीं. विश्वामित्राची सृष्टि त्यांनीं आपल्या आवडीप्रमाणें केली होती. या सृष्टींतलीं सगळीं माणसें सुखी आणि दुःखभोगाविषयींच्या प्रवृत्तींच नव्हत्या. अति उच्च बुद्धीचा विकास होण्याला अनेक मार्ग ठेविले होते. ब्राह्मण ब्रह्मदेवाच्या मुखापासून उत्पन्न झाले नाहींत अशी विश्वामित्राची पक्की समजूत होती. मनाच्या उच्चतर वृत्तींच्या परिपाकानें ब्राह्मणांना श्रेष्ठत्व मिळालें, पण एकदां तें

मिळाल्यावर स्वार्थसाधनाविषयींची त्यांची प्रवृत्ति प्रबळ होऊन ते निर्लज्ज होऊन बसले अशी त्यांची समजूत होती. म्हणून सर्वांना आपापल्या बुद्धीचा सारखा विकास करतां यावा यासाठीं विश्वामित्रानीं जागोजागीं विद्यालयें आणि पाठशाळा स्थापिल्या. उच्च प्रकारचें नीतिशिक्षण, किंवा राज्यशासनपद्धतींचें शिक्षण अमक्याच विशिष्ट लोकांनीं द्यावें असा निर्बंध नव्हता; तर सर्वच त्या कामीं आपापल्या परीनें उद्योग करीत होते. **युक्तिग्राह्यता** हेंच उपास्य दैवत होतें. त्यावांचून अन्य दैवत नव्हतें. प्रत्येक जण रोज या देवतेची उपासना करीत असे.

आणि परस्पराविषयीं प्रेम? सगळें प्रेममय होतें. सगळीं माणसें सारखीं होतीं. एकाद्यानें एकाद्या विषयांत पुढें पाऊल टाकल्याबरोबर तो मागें राहिलेल्यांना आपल्या बरोबरील आणी, आणि पुनः समानभाव स्थापन होत असे. विश्वामित्राच्या सृष्टींतलीं सगळीं माणसें सुंदर होतीं; कुरूपता ही बहुधा कोठें दिसतच नसे. प्रत्येकाच्या मुद्रेवर असा मोहकपणा असे कीं, दोघांची दृष्टादृष्ट होतांच दोघेही परस्परांला पाहून मोहित होत. गांठ पडल्यावर नमस्कार, सलाम, हस्तस्पर्श वगैरे करण्याची चाल त्यांच्यांत नसे. तर ते एकमेकांना कडकडून भेटत आणि गाढ आलिंगन देत. सगळेच उद्योगी आणि उन्नतीच्या मार्गांत त्वरेनें पुढें सरणारे होते. या नव्या सृष्टींतले लोक नव्या दमानें कामें करीत असत. कोणी पर्वताच्या शिखरावर चढून, कोणी समुद्राच्या तळाशीं बुडी मारून, तर कोणी

आकाशांत उड्डाण करून नव्या शास्त्रीय तत्त्वांचा शोध लावीत होते. याप्रमाणें आत्मोन्नति, समाजोन्नति व मनुष्योन्नति यांच्या कामांत प्रत्येक जण गुंतलेला होता.

विश्वामित्राच्या सृष्टींत विवाहपद्धति नव्हती. तथापि, प्रणय इतका बलवान् होता कीं, विवाहपद्धति नसतांही मनांचा एकदां झालेला संगम बहुधा भंग पावत नसे. यदाकदाचित् काडी मोडण्याचा प्रसंग आलाच तर पुनः संगम होण्याच्या अपेक्षेनें तीन वर्षेंपर्यंत वाट पहावी लागत असे. यांत कोणालाही कांहीं दोष दिसत नव्हता; कारण सगळेच लोक जितेंद्रिय होते. चोरीसारख्या भयंकर अपराधांचें नांवसुद्धां नव्हतें.

गीतवादनादि ललितकलांत लोक निपुण होते. कोठें गाणें, कोठें बजावणें, कोठें नाटकतमाशे, कोठें नाच अशा गोष्टी रोज सर्वजण मिळून करीत असत. रोज नवा उत्सव होता. राजा, सेनापति किंवा कोणी अधिकारी यांचें भय बिलकुल नसे. प्रत्येक गोष्ट सर्वांच्या अनुमतीनें घडे. सृष्टिशास्त्राच्या गूढ तत्वांचा शोध आणि परस्परांना आल्हाद देणें हीं दोन विश्वामित्राच्या सृष्टीवरील लोकांचीं नित्यकर्में होतीं.

उल्हास! उल्हास! उल्हास! मनाचा उल्हास असला म्हणजे पृथ्वीवरील लोक आनंदानें नाचूं बागडूं लागतात. मनुष्यामनुष्यांत ज्या कारणांनीं बिघाड होतो तीं कारणें विश्वामित्रानीं फार काळजीपूर्वक वर्ज्य केलीं होतीं. कीर्तितृष्णा, धनतृष्णा अधिकारतृष्णा यांचा अजिबात लोप होता. केवळ आनंद !

आम्ही तुमच्या आनंदांत आज सामील व्हावें, उद्यां तुम्ही आमच्या आनंदांत सामील व्हावें, असा प्रकार होता. विश्वामित्राच्या सृष्टींत मनुष्यांना मरण ठाऊक नव्हतें. तीं ही पृथ्वी सोडून दुसऱ्या पृथ्वीवर जात आणि अशा सात आठ फेऱ्या केल्यानंतर पुनः पहिल्या पृथ्वीवर परत येत. जन्म दोन प्रकारचे होते. एक नूतन जन्म व दुसरा पुनरावर्तन जन्म. नूतन जन्म फार थोडे होत. बाकीचे पुनरावर्तन जन्म असत. विश्वामित्राची पृथ्वी फार थोडा वेळ टिकली. तिच्यांत नूतन जन्म अधिक होते तर काय स्थिति झाली असती कोण जाणे!

६


काव्योदय.

इकडे वाल्मीकि हिमालयाच्या अरण्यांत आक्रोश करीत हिंडत होता. त्याच्या त्या आक्रोशाला विराम नव्हता, तसा त्याच्या अन्तर्दाहालाहि नव्हता. 'हाय हाय! मी किती अगणित पापें केलीं आहेत! त्यांचें क्षालन मी आतां कसें करूं?' हा विचार मनांत आला ह्मणजे त्याचें चित्त बावरें होई. त्याच्या जिवाला तळमळ लागून राही. विश्रांतीचें—शांततेचें—नांव नाहीं. आतां पूर्वींच्या साथीदार लुटारूंचें दर्शन सुद्धां घेण्याची इच्छा नव्हती. ते याला पुष्कळ शोधीत होते, पण याची त्यांची भेट

झाली नाहीं. मनुष्यप्राणी पाहिला कीं याच्या अंतःकरणांतली ज्वाळा भडके. अरण्यांत पशुपक्ष्यांच्या संगतीनें तो राही आणि तेही त्याच्या दुःखाचे वाटेकरी होत. तो कित्येकांना खावयाला घाली; कित्येकांना प्रेमानें कुरवाळी; कित्येकांना स्वच्छ पाण्यानें न्हाऊं धुवूं घाली; अशा रीतीनें कालक्रमणा करी.

एके दिवशीं क्रौंच पक्ष्यांचें एक जोडपें आनंदानें विहार करीत होतें. दोन्ही पक्षी क्षणांत एकमेकांच्या अंगावर लोळत होते, क्षणांत दूर सरत होते; एकमेकांना चोंचीनें टोंचीत होते; पुनः प्रेमानें कुरवाळीत होते. एकानें उलटावें, दुसऱ्याच्या अंगावर पडावें; त्यानें पुनः उलटून दुसऱ्याच्या अंगावर अंग टाकावें; मग भुर्कन् शब्द करीत झाडाच्या एका फांदीवरून दुसरीवर उडून जावें असें त्यांचें चाललें होतें. वाल्मीकि एकसारखी टक लावून त्यांची ती क्रीडा अवलोकन करीत होता. ती पाहून तो मनांत म्हणाला, ‘ हे पक्षी माझ्यापेक्षां किती तरी सुखी आहेत ! मी यांच्यासारखा आनंदांतच गर्क होऊन कां भ्रमण करीत नाहीं ? मलाही सोबती आहेत. ’ यापुढें त्याचे विचार चालेनात. पूर्वीची गोष्ट पुनः मनांत येऊन अंतःकरण व्याकळ होई.

त्याच्या मनांत असे तरंग येत आहेत तोंच एक बाण मर्मी लागून त्या जोडप्यापैकीं एक पक्षी खालीं पडला आणि तडफडूं लागला. त्याबरोबर व्याधानें चटकन् पुढें होऊन त्याला धरलें. त्याला पाहतांच वाल्मीकि म्हणाला, ‘ हे दुरात्मन्,



" ती देवी वाल्मीकीच्या पुढें येऊन उभी राहिली."   (पृष्ठ ६१.)

Printed especially for A. C. Bhat, POONA.

The Bombay Art Printing Works, Fort.

मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः
यत्क्रौंचमिथुनादेकमवधीः काममोहितम् ॥ '

हे शब्द वाल्मीकीच्या तोंडांतून निघाल्याबरोबर जवळच्या जलप्रवाहाच्या मध्यभागांतून एक देवी आपल्या दिव्य कांतीनें त्या अरण्यांतल्या मार्गावर प्रभा फांकीत बाहेर आली. तिचें सौंदर्य अप्सरांना लाजविणारें, चांदण्यापेक्षांहि स्निग्ध व सौम्य आणि चित्ताला मोहित करणारें होतें. त्या सुंदर देवीचें अकस्मात् दर्शन घडतांच सगळे आश्चर्यानें स्तब्ध झाले. तो व्याध पक्ष्याला उचलण्यासाठीं हात पुढें करून तसाच स्तब्ध राहिला. पशु, पक्षी सगळेच एकदम निःशब्द झाले. ती देवी वाल्मीकीच्या पुढें येऊन उभी राहिली. वाल्मीकीच्या तोंडांतून शब्द फुटेना. तिनेंही त्याला बोलण्याला अवसर मिळूं दिला नाहीं. ती म्हणाली, ' वाल्मीकि, असा आश्चर्यचकित होऊं नकोस. मी सरस्वती-ब्राह्मणाची कुलदेवता-आहें. परंतु ब्राह्मणांत कोणाचेंही हृदय तुझ्याइतकें कोमल पाहिलें नाहीं. म्हणून ही वीणा तुला देण्यासाठीं मी आलें आहें. हें वाद्य तुझ्या व तुझ्यासारख्या लोकांच्या हातांत सदोदित राहील. दुसऱ्याच्या कल्याणाचे कामींच याचा उपयोग करण्याचें व्रत तुह्मी स्वीकारलें पाहिजे ! '

हे तिचे शब्द वाल्मीकीनें शिरसा मान्य केले, व तिच्या चरणावर लोटांगण घातलें. ती वीणा त्याच्याच हातांत राहिली, आणि सरस्वती अंतर्धान पावली.

खंड पांचवा.

१

जुनी सृष्टि.

विश्वामित्र नवी सृष्टि निर्माण करण्यासाठीं या पृथ्वीतलावरून गेले. त्यानंतर मागें या जुन्या सृष्टींत काय काय वर्तमान घडलें त्याची कोणालाही सहज कल्पना करतां येईल. सगळ्या पृथ्वीभर गोंधळ, अराजकता, लूटमाऱ्या, रक्तपात इ. गोष्टी चालू झाल्या. इतिहासांत धामधुमीच्या व अराजकतेच्या अनेक प्रसंगांचीं वर्णनें आह्मीं वाचतों. यवनांचें साम्राज्य नाहींसें झाल्यापासून इंग्रजांचें राज्य स्थापित होईपर्यंत या भरतखंडांत जशी भयंकर क्रांति झाली होती तशी पृथ्वीवर दुसरीकडे कोठेंही झाली असेल कीं नाहीं शंका आहे. पण नवी सृष्टि उत्पन्न करण्यास उद्युक्त झालेल्या विश्वामित्राच्या प्रयाणानंतर जी क्रांति झाली तिच्या शतांशानेंही भयंकर ही आधुनिक क्रांति नसेल.

स्थूलमानानें पाहतां त्या वेळीं ब्राह्मण, क्षत्रिय, राक्षस, आणि वानर या चार मुख्य जाती होत्या. यवन, म्लेच्छ, हूण वगैरे लोकांचीं राज्यें विश्वामित्रानीं छिन्नविच्छिन्न करून टाकलीं होतीं. त्यांचे पुष्कळ राजे समरांगणीं ठार होऊन पडले होते;

पुष्कळांनीं पळून जाऊन वसिष्ठांचा आश्रय केला होता; कित्येक कोठें गेले त्यांचा पत्ता नव्हता; त्यांचीं राज्यें विस्कळित झालीं होतीं. लुटारू, वाटमारे, वगैरे लोक दिवसांढवळ्या लोकांना लुटीत, मारीत, गांवाला आग लावीत, किंवा कापून काढीत. अशा वेळीं वाल्मीकीनें वाटमाऱ्यांचा नाईकपणा सोडला. पण त्यामुळें त्यांचा पुंडावा संपला असें नाहीं. त्यांनीं गूहक नांवाच्या चांडाळाला आपला नाईक करून सगळ्या हिंदुस्थानभर लूटमार आरंभिली. आज जम्नोत्रीला तर उद्यां प्रयाग येथें, परवा शतद्रूच्या संगमाचे ठिकाणीं तर तेरवा शरयूचे तीरीं त्यांची लूट चाललीच होती. या चोरांच्या टोळ्यांकडे पाहिलें ह्मणजे कलियुगाच्या प्रारंभीं होणाऱ्या गोलंकाराची वेळ येऊन ठेपली असें वाटे. म्लेच्छ, यवन, राक्षस, वानर, ब्राह्मण, क्षत्रिय सर्वांचें एके जागीं खाणें पिणें, एके जागीं निजणें, एकच धंदा, एकच सुख, आणि एकसारखा थाटमाट दिसत होता. नरहत्या आणि लूटमार हा सर्वांचा धंदा. प्रत्यक्ष देवांना सुद्धांही मंडळी अनावर झाली होती! असल्या अराजक काळांत एखादें राज्य प्रबळ असतें किंवा एखाद्या जातीचें प्राधान्य असतें तर फार चांगलें झालें असतें. पण तेंही नव्हतें. सगळ्या राज्यांत दुफळी व सगळ्या जातींत बेकी! एकी कोठेंच नव्हती. बरें, ज्यांच्या हातांत राज्याचा अधिकार असे, ते भयंकर अत्याचारी व जुलमी असत. त्यांच्या जुलमापेक्षां लुटारू लोकांचा अत्याचार हजारपटीनें बरा वाटे. कारण, लुटारू एखाद्याचा एकदम

जीव घेत, पण हे हाल हाल करून त्याला मारीत. या वेळीं रावण हा एक महान् पराक्रमी राजा होता. परस्त्री व परधन यांचा अपहार, परपीडा व केवळ स्वतःच्या चैनीखातर दुसऱ्याला घोर यातना देणें, यांत त्याला मोठा आनंद वाटे. त्याच्या देशांत त्याच्या विरुद्धपक्षाला त्याचा भाऊ बिभीषण हा होता. रावणानें बिभीषणाला कारागृहांत ठेविलें होतें, आणि आपल्याच पक्षांतल्या एका मुख्य प्रधानाचें नाक, व कान कापविले होते. वानरांच्या राज्यांतल्या सुग्रीवाशीं बिभीषण मित्रत्व जोडील असा संभव दिसल्यावरून रावणानें दंडकारण्यांत सुग्रीवाशीं लढण्यासाठीं खर आणि दूषण असे आपले दोन क्रूर आणि अविचारी सेनापति रवाना केले होते.

वानरांच्या राज्यांत राजा वाली यानें आपल्या विरुद्ध पक्षांतल्या लोकांना देशपार केलें होतें, व आपल्या भावजयीशीं रममाण होऊन तो राहिला होता. लोकांना हद्दपार केल्यामुळें भरलेलीं घरें ओसाड पडलीं होतीं. ज्याला आपण दंडकारण्य म्हणतों तें एका काळीं भरभराटलेलें राज्य होतें; पण वालीच्या अत्याचारामुळें निर्जन अरण्य होऊन त्या ठिकाणीं सिंहव्याघ्रादि हिंस्र पशु निवास करूं लागले होते.

ब्राह्मणांतही दोन पक्ष होते—दोनच कां?—प्रत्येकाचा पक्ष स्वतंत्र होता—तथापि या ब्राह्मणांत मुख्य पक्ष दोन होते. एकाचा पुढारी परशुराम होता. क्षत्रियांच्या नांवाचा सुद्धां उच्छेद करण्याचा त्याचा कृतसंकल्प होता. त्याचें व दुसऱ्या कोणाचेंही

पटत नसे. तो समुद्रतीरीं स्वतःस राहण्यासाठीं जागा निर्माण करून तेथें राहिला होता. त्याच्या संधानानें चालण्याचें ब्राह्मणांनीं नाकारल्यामुळें क्षत्रिय पुनः प्रबळ झाले होते. ह्मणून दोघांचाही उच्छेद व्हावा ही त्याची इच्छा होती. तो एकटा हजार जणांना भारी होता. तो ब्राह्मणाच्या नित्यनैमित्तिक कर्मांत कधीं सामिल होत नसे. त्याच्या सारखे क्षत्रियांचा नाश करूं पाहणारे दुसरे जे कित्येक असत ते स्वतःच्या इच्छेप्रमाणें वागत. ब्राह्मणांचा दुसरा एक वर्ग होता. त्याचा नेता वसिष्ठ हा होता. त्यांचा आपल्या पक्षावर कांहीं थोडा अधिकार असे; पण सर्वच बाबतींत त्यांचें प्रभुत्व चालत नसे.

क्षत्रियांतही एक वर्ग असा होता कीं, तो वसिष्ठासंबंधानें ऋणबद्ध असे. अर्थात् ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्यांत मिलाफ ठेवण्यासाठीं हा वर्ग अनेक प्रकारें यत्न करीत होता. या वर्गांत अयोध्या व मिथिला येथील राजे हे प्रमुख होते. दुसरा एक क्षत्रियांचा वर्ग होता. परशुराम जसा क्षत्रियकुलासंबंधानें तिळांजलि घेऊन नेहमीं उभा असे, त्याप्रमाणें हा वर्ग ब्राह्मणांचा नाश करण्यास सर्वदा तत्पर होता. विश्वामित्राचें कुल या वर्गांत अग्रगण्य होतें. वसिष्ठाचे अनुयायी खेरीज करून बाकीचे हे सगळे लोक परस्परांचें अनिष्ट करण्यासाठीं स्वतःच्या प्राणांची आहुती देण्यास तयार होते. विश्वामित्राचे प्रधान ब्राह्मणांच्या यज्ञयागांचा ध्वंस करण्यासाठीं खरदूषणासारख्या राक्षसांना सुद्धां आव्हान करण्यास चुकत नसत. प्रतिपक्षाच्या नाशार्थ दस्यु (चोर)

व लुटारू वगैरेंचें साह्य घेण्यास कोणालाच संकोच वाटत नसे. क्षुद्र कारणावरून माजलेल्या कलहाचे पायीं देशचे देश उजाड होत. अधिक उदाहरणें देण्याची अवश्यकता नाहीं. विश्वामित्राची राजधानी कान्यकुब्ज येथें एका ब्राह्मणास पकडून प्रधानापुढें उभें करण्यांत आलें. त्या प्रधानानें त्याला चाबकानें व वेतानें खूप मारविलें, त्याचें नाक व कान हीं कापलीं आणि त्याच्या कर्णरंध्रांत शिशाचा रस ओतविला. मग त्यानें कांहीं कुत्रे धरून आणविले। आणि त्यांच्याबरोबर या ब्राह्मणालाही पिंजऱ्यांत अडकावून ठेविलें. तेथें त्याला दारुण यातना होऊं लागल्या तेव्हां त्या ब्राह्मणानें भारद्वाज मुनींचा मोठ्यानें धांवा केला. भारद्वाज मुनि तेथून जवळच आपल्या शिष्यांसहवर्तमान आश्रमांत राहत होते. अरण्याच्या बऱ्याच विस्तीर्ण प्रदेशावर त्यांची एकट्याची सत्ता होती. ते परशुरामाच्याही पक्षाचे नव्हते व वसिष्ठांच्याही नव्हते. ब्राह्मणांनीं कलहापासून अलिप्त राहावें असें म्हणणार ते होते. ते कोणाचा पुरोहितपणाही स्वीकारीत नसत, आणि कोणाशीं वांकडेही राहत नसत. त्यामुळें ते सगळ्यांनाच प्रिय होते. त्या ब्राह्मणाच्या तोंडून भारद्वाजाचें नांव निघालेलें ऐकून त्या प्रधानाला शंका आली कीं हा भारद्वाजाचा गुप्त हेर असेल. म्हणून त्यानें त्याचे अधिकच हालहाल करून शेवटीं त्याला ठार मारलें, आणि मग दरोडेखोरांच्या दहावीस टोळ्या भोंवतीं जमवून त्यांचेकडून दुसरे दिवशीं भारद्वाजमुनींच्या आश्रमाला आग लावून दिली. भार-

द्वाज व त्यांचे शिष्य केवळ योगबळामुळेंच त्या दिवशीं वांचले. पण त्या रानांतले असंख्य जलचर व स्थलचर प्राणी प्राणास मुकून तें सगळें रान एका दिवसांत भयाण झालें.

२

पृथ्वीवर शांतता.

इकडे वाल्मीकि सरस्वती देवीच्या हातून वीणा व काव्याभिरुचि प्राप्त झाल्यावर हिमालयाचा त्याग करून मनुष्याच्या वस्तींत आले. या ठिकाणीं मनुष्यसमाजाची शोचनीय स्थिति पाहून त्यांच्या अंतःकरणाचें पाणी झालें, आणि विव्हल होऊन ते शोक करूं लागले. मनुष्याच्या दुःखमय स्थितीकडे पाहून प्रथम त्यांच्याच डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या असतील. परदुःखानें दुःखित होणारे प्राणी कितीसे असणार! असल्या अश्रूंच्या धारा अमूल्य होत. कारण प्रत्येक अश्रुबिंदु शतशत अत्याचारांचा नाश करण्यास समर्थ असतो. अशा रीतीनें आक्रोश करीत आणि गात वाल्मीकीनें सगळ्या हिंदुस्थानभर पर्यटन केलें. दुःखनिवारणाचा उपाय कांहीं दिसेना आणि दुःखही सहन होईना. एके दिवशीं एका नदीतीरावर ते बसले होते. हातानें वीण्यांतून नाद काढण्याचें काम चाललें होतें.

डोळ्यांतून अश्रूंचा पूर वाहून तो नदीच्या प्रवाहाला मिळत होता. इतक्यांत कांहीं अंतरावरून एक भयंकर शब्द त्यांच्या कानीं आला. प्रथम दरवडेखोरांच्या आवाजासारखा तो भासला, पण मागाहून तो कोणाचा तरी आर्तस्वर असावा असें वाटलें. वाल्मीकीच्यानें राहवेना. ते त्या शब्दाच्या धोरणानें जाऊं लागले. कांहीं अंतर चालून गेल्यावर त्यांना दिसलें कीं, एका मोठ्या नगरांत दरोडेखोर लूट करीत आहेत. वाल्मीकि तसेच हातांत वीणा घेऊन धांवत गेले आणि त्या दरोडेखोरांच्या नाइकाचा हात धरून त्याला म्हणाले, “ बाबारे, हें काम सोडून दे. ”

दुसऱ्यासाठीं विव्हळण्याचा परिणाम तत्काल होतो. तुह्मी स्वतः-साठीं कितीही तळमळलां, तरी तुमच्या दुःखाकडे कोणी ढुंकून पहात नाहीं. पण तेंच दुसऱ्यासाठीं तुह्मीं अश्रु ढाळले ह्मणजे तसे अश्रु ढाळणारे दुसरेही कित्येक मिळतात. या तुमच्या आक्रोशांत गंभीरता आणि सहृदयता असेल तर याहूनही तीव्र परिणाम दिसतो. वाल्मीकींचें तें रोदन, गायन आणि त्याची एकंदर वृत्ति पाहून तो नाईक थोडासा विरमला, आणि हा वाल्मीकि आहे असें त्यानें चटकन् ओळखलें. त्याच्यानें आतां स्तब्ध राहवेना. लूट बंद करा असा त्यानें आपल्या सोबत्यांस एकदम हुकूम केला. त्याच्या टोळींतले लोक एकदम थांबले. पण म्लेच्छ, यवन, बाबर आणि राक्षस हेही त्या दरोडेखोरांत होते; ते कसे थांबावे? नाईक स्वतः त्यांना मना करण्यासाठीं गेला. पण राक्षसांनीं

राजघराण्यांतल्या सर्वांना खाऊन टाकलेलें त्याला आढळलें. नाइकानें अजून तरी थांबा ह्मणून त्यांची प्रार्थना केली; पण ते राक्षस नुसते नरमांस भक्षण करून तृप्त झाले नाहींत. मद्य-प्राशन आणि लुटींत मिळालेलें द्रव्य यापुळें त्यांना उन्माद चढला होता. ते का त्याचें ऐकतात? ते अधिकच उपद्रव देऊं लागले. शेवटीं त्या नाइकानें जबरदस्तीनें त्यांना नगराबाहेर घालविलें. बाहेर गेल्यावरही ते स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं म्लेच्छ आणि वानर यांचें साहाय्य घेऊन त्या नाइकाच्या शिबिरावर निकराचा हल्ला केला. तो असा कीं त्याला आपल्या शिबिरांत जाण्यास फारच प्रयास पडले. तेथें जाऊन पाहतो तों निराळाच चमत्कार!

वाल्मीकि हातांत वीणा घेऊन " भाऊ भाऊ आम्ही सर्व भाऊ " हें गाणें गात आहेत; सगळे दरोडेखोर–हजारों योद्धे-डोळ्यांतून ढळढळां अश्रु गाळून व निःशब्द होऊन रडत आहेत; नरहत्त्या हा ज्यांचा व्यवसाय व जीवनोपाय ते सगळे शस्त्रास्त्रें टाकून रडत बसले आहेत; राक्षस, यवन, म्लेच्छ वगैरेंच्या टोळ्या त्यांना वेढा घालून बसल्या आहेत, तथापि तिकडे ते ढुंकूनही पाहत नाहींत! राक्षसांचा हल्ला जितका जितका जास्त निकराचा तितक्या तितक्या उंच ताना वाल्मीकीच्या कंठांतून निघत आहेत; आणि मानवजातीविषयींची पोटांतली दया आणि हृदयाची कातरता हीं त्या गायनांत अधिकाधिक व्यक्त होत आहेत; हळूं हळूं राक्षसही त्या गायनानें मोहित होत आहेत;

असा प्रकार चालला होता. मागें ऋभूंचें गाणें ऐकून वाल्मीकीच्या मनाची जी स्थिति झाली होती, तीच आज सगळ्या दरोडेखोरांची झाली. यवन, म्लेच्छ, राक्षस, वानर सगळेच मोहित झाले. सर्वांच्या अंतःकरणांत दयेचा पाझर फुटला. जणूं काय तें गाणें त्यांना असें सांगत होतें कीं, "बांधव हो, हें काम सोडा. झालें तेवढें पुरे झालें. आतां तरी पुढें तें करूं नका. तुम्हीच असल्या कृत्यांना बळी पडलां असतां तर तुम्हांस कसें वाटलें असतें याचा विचार करा. सगळीं माणसें तुमच्यासारखींच रक्तमांसाची बनलेलीं नाहींत काय? तुम्हांला थोडेंसें लागलें तर कशा वेदना होतात! थोडीशी इजा झाली तर तुम्हीं कसे तळमळतां! तेच तुम्हीं दुसऱ्याच्या मस्तकावर तरवारीचा वार करणार? हाय हाय! तुम्ही ज्याला मारतां त्याच्या मनाची कशी स्थिति होते तें कल्पनेनें मनांत आणा. दुसऱ्याच्या कच्चाबच्चयांच्या मुंड्या मुरगाळतांना तुमच्या अंतःकरणाला वेदना होत नाहींत. पण तुमचीं स्वतःचीं मुलेंबाळें अशा रीतीनें मारलीं जातांना तुम्हां स्वतःला कसें वाटेल त्याचा विचार करा."

लागलींच श्रोत्यांनीं लोटांगणें घातलीं आणि आर्तस्वरानें म्हटलें, "गुरो, आमच्या रक्षणाचा कांहीं उपाय सांगा."

गायन सुरू होतेंच. त्या गाण्याचा अर्थ असा होताः— "बाबांनो, सर्वांना भावासारखें समजा. आपण सगळे भाऊ आहों, कोणी परके नाहीं. आपण सगळे मनुष्यप्राणी सारखे आहों. हिंवाळ्यांत तुम्हांस थंडी वाजते तशी सर्वांस वाजते. उन्हाळ्यांत

तुह्मांस उष्मा होतो तसा सर्वांना होतो. पाऊस तुम्हांस भिजवितो तसाच सर्वांना भिजवितो. तुमच्यांत आणि इतर मनुष्यांत फरक कोठें आहे? म्हणून सगळे एक व्हा. सर्वांची एकतानता होऊं द्या. मी तुमचा, तसे तुम्ही माझे. एकच तृण तुम्हांला, मला, सर्वांना शय्या करून देतें. एकच पृथ्वी सर्वांना राहण्यास जागा देते; एकच सूर्य सर्वांना प्रकाश देतो; एकच चंद्र सर्वांच्या अंतरात्म्याला सुख देतो; मग भिन्नता ती कोठें राहिली?" आणखी किती तरी गोष्टी त्या गायनांत होत्या! किती वेळपर्यंत तें गाणें चाललें होतें आणि वाल्मीकीच्या त्या प्रासादिक गायनांत किती उदात्त अर्थ होता तें या क्षुद्र लेखकाच्यानें काय सांगवणार आहे?

या गायनाचा परिणाम असा झाला कीं, सगळे दरवडेखोर आपलें लुटारूपणाचें काम सोडून देऊन वाल्मीकीच्या चरणाला लागले. त्यांचा नाईक चांडाल गूहक हा तर ते चरण घट्ट धरून रडूं लागला. आपल्या चरणीं लागण्याविषयींचा निषेध करतांना वाल्मीकि म्हणाले, 'बाबारे, मी कांहीं देव नाहीं, देवाचा अवतार नाहीं, किंवा राजा नाहीं. जसा तूं तसाच मी. माझ्या पायां पडण्यानें काय मिळणार आहे? आजपर्यंत दुष्कर्म केलें तें केलेंस; आतां तें सोडून दे. आपलें वर्तन पालट; सन्मार्गानें चालून सुखी हो!'

याप्रमाणें बोलून तो सर्वांना निरोप देऊं लागला, तों इतक्यांत शहरांतून कांहीं मंडळी आली; कांहीं लंगडेलुळे होते; कांहीं आंधळे

होते; कोणी अग्नीमध्यें पोळले होते; कोणी वृद्ध मातापितरांना खांद्यावरून आणीत होते; कोणी जखम लागून मृतप्राय झालेल्या आपल्या मुलाला पोटाशीं धरून आणीत होते. राजकुल राक्षसांनीं खाऊन नष्ट केलें, आतां अराजक अशा नगरांत राहून काय करावयाचें? त्यापेक्षां आपले आप्तइष्ट जेथें असतील तेथें जाऊन पडावें अशा बुद्धीनें ते निघाले होते. वाल्मीकीनें त्यांच्याकडे बोट दाखवून म्हटलें, ' ही पहा तुमची कीर्ति!' हे शब्द तोंडातून निघण्याचा अवकाश, तों त्यांच्या नेत्रांतून खळखळ अश्रुधारा वाहूं लागल्या. पश्चात्तापाच्या योगानें त्यांच्या पापकर्माचा घोरपणा त्यांच्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत दिसूं लागला आणि त्यांच्या मुद्रेवर प्रेतकळा आली. वाल्मीकि म्हणाले, ' त्यांना परत फिरवा. ' त्याप्रमाणें दरवडेखोर त्यांना परत फिरविण्यासाठीं त्यांच्याजवळ गेले मात्र, तों ते नागरिक भयानें मोठ्यानें ओरडूं लागले, व ज्याला जिकडे वाट दिसली तिकडे पळूं लागले. दुष्ट लोक चांगली गोष्ट सांगूं लागले तरी त्यांच्या शब्दावर लोकांचा भरंवसा बसत नाहीं ही गोष्ट दरवडेखोरांना आतां चांगली कळली. तुम्ही परत फिरण्याविषयीं नागरिकांचें मन वळवा अशी दरवडेखोरांनीं वाल्मीकीची प्रार्थना केली. पण वाल्मीकि स्वतः त्या दरवडेखोरांपैकीं नाहीं हें त्या नागरिकांना कसें कळावें ?

वाल्मीकीनें याही वेळीं आपल्या गाण्यानें त्यांना फिरविलें. त्यानें अशा गोड ताना घेऊन अत्यंत करुणस्वरानें त्यांची

प्रार्थना केली कीं, त्या ताना ऐकून श्रोत्यांचें चित्त दयार्द्र होऊन ते परत फिरले. परंतु अराजक देशांत वास करणें हा अधर्म, सबब वाल्मीकीलाच राजा होण्याविषयीं ते आग्रह करूं लागले. वाल्मीकीनें त्यांचें म्हणणें ऐकलें नाहीं. पण दरवडेखोरांचा नायक जो चांडाल गृहक त्याला त्यानें राज्यावर बसविलें. गृहकाच्या अमलाखालीं म्लेच्छ, यवन, वानर, राक्षस, सगळे एकत्र सुखानें नांदूं लागले, आणि दरोडे घालण्याचें नांव सुद्धां ते काढीनात. परदेशांत लूटमार करण्याचा विचारही सुटला. इतकेंच नाहीं, तर दुसरे कोणी कोणाला उपद्रव देऊं लागले तर हे त्या उपद्रवाचें निवारण करण्याचे कामीं मदत करण्यासाठीं धांवत. याप्रमाणें पृथ्वीवर शांततेचें साम्राज्य सुरू झालें. पण हें साम्राज्य असेंच टिकेल, आणि हे दरवडेखोर एकोप्यानें राहतील असा भरंवसा वाल्मीकीच्या मनाला वाटेना. वाल्मीकि दर महिन्याला एकदा गृहकाच्या भेटीला येत, आणि बाकीच्या वेळीं इच्छेस येईल त्याप्रमाणें गात गात पृथ्वीवर चोहोंकडे हिंडत.

खंड सहावा.

१

उडतें शहर.

विश्वामित्रानीं अपत्यनिर्विशेष प्रेमानें व उत्साहानें आपल्या नव्या सृष्टीचें पालन चालविलें होतें. लोकांत सुखाची वृद्धि व्हावी व त्यांचा जीवनकाल सौकर्यानें जावा याकरितां ते जिवापाड यत्न करीत होते, पण त्यांच्या स्वतःची काय स्थिति होती? सृष्टींविषयींच्या उत्साहाचे भरांत स्वतःच्या सुखदुःखाविषयीं विचार करण्यास त्यांना फुरसतच मिळत नसे. या नव्या सृष्टीचे ईश्वर ते स्वतःच होते.

कोणी सोबती अगर ज्याच्याजवळ अंतःकरण खुलें करून बोलतां चालतां येईल असा मनुष्य जवळ नसला, ह्मणजे सामान्य मनुष्य बावरल्यासारखा होतो. विश्वामित्रासारखा अद्वितीय पराक्रमी, राजाधिराज, या नव्या सृष्टीच्या संबंधानें सर्वोच्च पदावर आरूढ झालेला पुरुष, पण त्याला अखेर आपण एकटे आहों असें वाटूं लागलें! सगळ्या गोष्टींची अनुकूलता खरी, पण सुख कोठें आहे? आपलें स्वतःचें काय होणार?

ते आपल्या सृष्टींतल्या माणसांशीं मिळून मिसळून वागूं लागले. पण ज्यांच्या संगतींत त्यांनीं दिवस घालवावयाचे,

किंवा जीं त्यांचीं सुखदुःखें जाणूं शकतील, अशा योग्यतेचीं माणसें कोठें होतीं ? या नव्या सृष्टींतलीं माणसें सुखी होतीं खरीं; पण विश्वामित्र स्वतः जुन्या सृष्टींतले असल्यामुळें भोक्तृत्त्व त्यांना सुटलें नव्हतें. ते दुःखी कष्टी असले ह्मणजे क्षणभर त्यांच्या तोंडाकडे पाहून तरी सहानुभूति दाखवितील अशीं माणसें कोठें होतीं ? या एका गोष्टीनें त्यांचें मन फार व्यथित होई.

अशा रीतीनें कांहीं काळ लोटल्यावर पृथ्वीवरचीं कांहीं माणसें आपल्या या नव्या सृष्टींत आणून ठेवावीं हा विचार त्यांचे डोक्यांत आला, आणि कान्यकुब्ज शहराचा समावेश होईल येवढें मोठें नगर त्यांनीं निर्माण केलें. या नव्या सृष्टींत शत्रूचें भय नसल्यामुळें या शहराला तटबंदी किंवा खंदक वगैरे कांहीं नव्हतें. हें नगर टोलेजंग राजवाडे व रमणीय हवेल्या यांनीं गच्च भरलें होतें. याप्रमाणें तयारी झाल्यावर विश्वामित्राची स्वारी या पृथ्वीवर आली, आणि कान्यकुब्ज नगरांत प्रवेश करती झाली. तेथें आपल्या प्रधानाची आणि आपल्या परिवाराची त्यांनीं भेट घेतली. कांहीं काळ त्यांच्यांत वास केल्यावर त्यांना कळून चुकलें कीं, आपापल्या मंडळीच्या समागमांत माणसाला जें सुख लागतें तें तो प्रत्यक्ष परमेश्वर असला तरी एकटें राहण्यांत लागत नाहीं. या पृथ्वीवरच राहावें अशी एकदां त्यांना इच्छा झाली होती. पण त्या सृष्टींतला त्यांचा अधिकार व या पृथ्वीवरला अधिकार यांच्यांतली विषमता लक्षांत घेऊन

आणि या पृथ्वीवरल्या ब्राह्मणांचें वर्तन मनांत आणून त्यांनीं शेवटीं स्वजनाला आपल्या नव्या सृष्टींत घेऊन जाण्याची तयारी केली.

कान्यकुब्ज शहर आस्ते आस्ते वर हवेंत जाऊं लागलें. हा चमत्कार पाहून पृथ्वीवरले लोक आश्चर्यानें एकमेकांकडे टकमक पाहूं लागले. वर जाऊं लागलेल्या या शहरांतून नानाप्रकारचे मंजुळ वाद्यध्वनि निघूं लागले. त्या शहरचे नागरिक आनंदानें नाचूं लागले. कांहीं मर्यादेपर्यंत गेल्यावर त्यांच्या सुखाचें रूप पालटून लवकरच त्या जागीं दुःखाची झाक आली. श्वासोच्छ्वास करणें मुष्किलीचें झालें व त्यामुळें जीव गुदमरूं लागला. पृथ्वीवरली हवा वर आकर्षून घेण्याचा विश्वामित्रानीं यत्न केला; पण तें जमेना. मग ते मोठ्या विवंचनेंत पडले. पृथ्वीवरल्या वायूसारखा वायु निर्माण करण्याचीही खटपट त्यांनीं करून पाहिली; पण व्यर्थ. तेव्हां त्यांनीं ब्रह्मदेवाचें स्मरण केलें. ब्रह्मदेव प्रकट झाल्यावर विश्वामित्र म्हणाले, ' अजून माझ्याशीं वाद करण्याची तुमची इच्छा आहे काय ? मी आपल्या नागरिकांना घेऊन नव्या सृष्टीकडे चाललों आहें, माझ्या मार्गांत तुम्ही अडथळा कां करतां ? '

ब्रह्मदेव म्हणाले, ' तुमचें सारें तपोबल नवी सृष्टि निर्माण करण्यांतच खर्च झालें आहे. आतां एखादें नवें कार्य हातीं धरण्याला तुम्हांला तपोबलच उरलें नाहीं. नवीन एखादी गोष्ट तुम्ही कराल तर तुमच्या सृष्टीचा नाश होईल. म्हणून सांगतों अजून स्थिरचित्त व्हा, आणि शहाणपणानें वागा. '

'अरे पाषंडा, तुझें तोंड मोठें, तशा तुझ्या वल्गनाही मोठ्या ! शहाणपणानें वागण्याचा उपदेश कोणाला करतोस ? माझ्या नव्या सृष्टींतून वायु आणून मी यांना वर नेतों बघ,' येवढें बोलून विश्वामित्र तडकाफडकीं तेथून नव्या सृष्टीकडे निघून गेले.

इकडे कान्यकुब्ज शहर वेगानें खालीं उतरूं लागलें. ब्रह्मदेवाला वाटलें कीं, त्याला तसेंच वेगानें खालीं आपटूं दिलें तर आपल्याच सृष्टीचा नाश होईल. म्हणून त्यानें त्याला हळूंच खालीं उतरवून घेतलें, आणि पूर्वींच्या जागीं त्याची स्थापना केली. विश्वामित्राच्या अनुयायांनीं आतां ब्राह्मणांवर भयंकर जुलूम करण्यास सुरुवात केली, व राक्षसांचें साह्य घेऊन त्यांनीं ब्राह्मणांना नानाप्रकारें त्रास दिला.

२

नव्या सृष्टीचा अंत.

विश्वामित्र आपल्या सृष्टींतून शून्यपथानें वायु आणण्याचा यत्न करूं लागले, पण कांहीं उपाय चालेना. तेव्हां रागानें त्यांनीं पुनः ब्रह्मदेवाचें स्मरण केलें. ब्रह्मदेव पुनः प्रकट झाले. विश्वामित्र त्यांना म्हणाले, 'शून्यपथानें वायु आणण्याचा माझा मार्ग खुला

करून द्या.' ब्रह्मदेव म्हणाले, 'तितकें तपोबल आतां तुमचेपाशीं नाहीं, आणि तपोबल नसल्यामुळें तुम्ही म्हणतां तसें मलाही करतां येत नाहीं.'

विश्वामित्र अतिशय क्रुद्ध झाले, आणि ब्रह्मदेवाला कैद करण्याचें त्यांनीं मनांत आणिलें. पण तें शक्य नव्हतें. तेव्हां रागानें गदा उचलून त्या गदेनें ब्रह्मदेवाच्या सृष्टीचा नाश करण्याचा त्यांनीं विचार केला. ब्रह्मदेव म्हणाले, 'आहां असेच राहा; नवीन कांहीं कार्य करूं लागाल, तर तुमच्या सृष्टीचा नाश मात्र होईल.'

विश्वामित्र चरफडत बसले व ब्रह्मदेवाला दूषणें लावूं लागले; तेव्हां ब्रह्मदेव तेथून चालते झाले. मग विश्वामित्रांनीं पुनः गदा उचलली, पण ती हातांतून खालीं पडली. विश्वामित्रांनीं ती पुनः आवेशानें उचलली. तों त्यांच्या पृथ्वीला मोठाल्या भेगा पडल्या. ते जोरानें गदा फिरवूं लागले, तसे त्यांच्या पृथ्वीचे सांधे खिळखिळे झाले. ब्रह्मांडाच्या केंद्रावर गदेचा आघात करावा अशा हेतूनें विश्वामित्रांनीं गदेचा नेम धरला, आणि गदा गरगर फिरविली, तसतसे त्यांच्या सृष्टीचे सांधे अधिकच ढिले झाले. जशीजशी ते गदा फिरवीत, तसतशी त्यांची सृष्टि विस्कळित होऊन नीहारिकेचें रूप धारण करूं लागली. शेवटीं विश्वामित्रांनीं गदा फेकून दिली. त्याबरोबर ज्या ज्या ठिकाणांहून विश्वामित्रांनीं नीहारिका गोळा करून आणिल्या होत्या, त्या त्या ठिकाणीं त्या वेगानें परत गेल्या. अनंतगर्भ

आकाशांत पूर्वीं जसा मंद प्रकाश होता, तसा पुनः झाला. जीं जीं नक्षत्रें नीहारिकांनीं आकर्षून नेलीं होतीं तीं तीं पूर्वस्थानापन्न झालीं. समुद्राच्या पाण्याचा बिंदु समुद्रांत मिळून जातो, त्याप्रमाणें नवी सृष्टि एका क्षणांत शून्यांत अंतर्धान पावली. पृथ्वीच्या ईशान्य दिशेला आकाशाचा भाग नक्षत्रपुंजांनीं भरलेला दिसत होता, तो आतां पुनः शून्यमय झाला. विश्वामित्राच्या सृष्टींत माणसांना जें सुख व स्वातंत्र्य होतें तें एकदम नष्ट झालें. खुद्द माणसें आकृतिहीन परमाणूंमध्यें लय पावलीं. ते सुंदर पर्वत व डोंगर, ते भव्य राजवाडे, ते प्रशस्त राजमार्ग, सगळी पृथ्वी पुनः परमाणूंच्या रूपाला येऊन पोंचली. ज्या समाजाच्या घटनेंत जुलमाला वाव नव्हती, उच्चनीच हा भेद नव्हता, केवळ प्रेम, ऐक्य आणि समता हीं जेथें नांदत होतीं, तो समाजही अनंतगर्भांत लय पावला.

३

विश्वामित्राचा अधःपात.

इकडे विश्वामित्राची स्थिति काय झाली ? गदा फेंकून दिल्याबरोबर ते मूर्च्छित होऊन पडले. पण कोठें? त्यांच्यासाठीं एखादें स्थान उरलें होतें काय ? नाहीं. ते शून्यांतच मूर्च्छित होऊन पडले होते. आतांपर्यंत त्यांना त्यांची स्वतःची

सृष्टि वर आकर्षित होती; आतां ही जुनी पृथ्वी त्यांच्या मृतप्राय देहपिंडाला आकर्षूं लागली. विश्वामित्र गरगर गिरक्या घेत खालीं पडूं लागले. ब्रह्मदेवाचा त्यांच्यावर अतिशय लोभ असे; आणि म्हणूनच विश्वामित्रांनीं कितीही वेळां त्यांचा उपमर्द केला तरी ते पुनः पुनः विश्वामित्राकडे जात, आणि त्यांना ब्राह्मण करण्याचा यत्न करीत. त्यांनीं आतां असा विचार केला कीं, आतां अधिक अंत पाहणें चांगलें नाहीं. तसें केलें असतां श्वासोच्छ्वासाला वायु न मिळाल्यामुळें विश्वामित्राचें प्राणोत्क्रमण होईल. म्हणून ब्रह्मदेवानीं पृथ्वीवरून वायु आणून त्यांच्या नाकाशीं धरला. विश्वामित्राचें प्राणोत्क्रमण झालें नव्हतें. ते मूर्च्छितावस्थेंत गिरक्या घेत घेत शून्यमार्गानें खालीं पडत होते. या भ्रमणामुळें त्यांच्या तोंडातून रक्त पडूं लागलें आणि अंगावर सूज चढली. त्यांचें पतन चाललेंच होतें—कोणाला ठाऊक किती काळपर्यंत ते या स्थितींत होते!





" विश्वामित्र गिरक्या घेत खालीं पडूं लागले."

(पृष्ठ ८०.)

Printed especially for A. C. Bhat, POONA.

The Bombay Art Printing Works, Fort.

खंड सातवा.

१

यज्ञ.

पृथ्वीवर महाप्रळय होण्याचा काळ येऊन ठेपला आहे. यांतून वांचले तर मनुष्यप्राणी या जगांत वास्तव्य करतील, आणि ब्राह्मणादि जाती राहतील. आजच्या प्रसंगांतून बचावण्यावर सगळ्या सृष्टीची सुरक्षितता अवलंबून आहे.

आज कौशांबीचा राजा यज्ञ करणार आहे. त्यासाठीं सगळे भूचर, खेचर, आणि उभयचर प्राणिवृन्दांना आमंत्रणें करण्यांत आलीं आहेत. हा यज्ञ वर्षभर चालणार आहे. कौशांबी नगरीच्या भोंवतालचा विस्तीर्ण प्रदेश यज्ञासाठीं आलेल्या पाहुण्यांनीं व्यापून टाकिला आहे. इतका जनसंमर्द एकत्र झाला आहे, पण एकाचेंही चित्त ठिकाणावर नाहीं. या अगाध मानवीसमुद्रांत जिकडे पहावें तिकडे द्वेष आणि वैर दिसून येत असल्यामुळें केव्हां कोणत्या तऱ्हेनें प्रळय होईल याचा नेम सांगवत नाहीं, आणि लवकरच अशी स्थिति घडून आली आहे.

कौशांबीचा राजा हा सूर्यवंशांतला आणि ब्राह्मणांचा कैवार घेणारा असल्यामुळें त्यानें वसिष्ठाला आपला पुरोहित नेमिलें. त्यावरून विश्वामित्र आणि परशुराम यांच्या अनुयायांना त्वेष आला. विश्वामित्राच्या प्रधानानें खर, दूषण, आणि वालीराजा यांना आपल्या पक्षाला वळवून घेतलें होतें व त्याचप्रमाणें द्रव्याची लालूच दाखवून पुष्कळ पराक्रमी व बलवान दरवडे-खोरांच्या नायकांनाही आपलेसे करून घेतलें होतें. तेही येऊन विश्वामित्राला मिळाले होते. इकडे वसिष्ठाच्या पक्षाची ब्राह्मण मंडळी आणि अयोध्या व मिथिला येथील क्षत्रिय यज्ञाच्या रक्षणार्थ सज्ज होऊन आले होते. पारद व हूण वगैरे जाती वसिष्ठाच्या आश्रित होत्या; तेही लोक यज्ञाच्या रक्षणार्थ शस्त्रास्त्रें घेऊन यज्ञभूमीवर आले होते. शांतिराज्याचा स्वामी गूहक हाही अशा त्या प्रसंगीं आपले लोकांना बरोबर घेऊन आलेला होता. होतां होईल तों दोन्ही पक्षांचा समेट करावा, निदान त्यांच्यांतला युद्धाचा प्रसंग तरी टाळावा, आणि तेंही न घडलें तर अखेर जो पक्ष अन्यायाचा असेल त्याच्याशीं युद्ध करावें हा त्याचा विचार होता.

वाल्मीकि काय करीत होते ? ते दुसऱ्याच्या हातांत हात घालून रोदन करीत फिरत होते. परंतु त्यांच्या आक्रोशाकडे कोणी लक्ष देईना. वाल्मीकीच्या करुणस्वरानें पाषाणालासुद्धां पाझर फुटला असता; परंतु आपण राजनीतिज्ञ, आपण उच्चवर्णाचे, आपण सुधारलेले असा ज्यांना अभिमान वाटत असतो, जे आपले

अधिकार गाजविण्यासाठीं प्रत्यक्ष आपल्या प्रिय पत्नीच्या किंवा पुत्राच्या मानेवर सुरी ठेवण्यास मागें घेत नाहींत, ज्यांचें मन पाषाणापेक्षांही कठोर अशा वस्तूचें बनविलेलें असतें, माणसें ह्मणजे ज्यांचीं खेळणीं होत व आपल्या मतलबाच्या सिद्धीसाठीं लक्षावधि माणसांच्या प्राणांचा सुद्धा नाश करतांना ज्याच्या मनाला संकोच वाटत नाहीं, त्यांना आक्रोशानें काय पाझर फुटणार आहे? त्यांचें अंतःकरण द्रवो वा न द्रवो, वाल्मीकीचा आक्रोश सुरू होता. त्यांनीं एकदां वसिष्ठाकडे जावें, एकदां खरदूषणांच्या हातांत हात घालावा. सैन्यांतले शिपाई व इतर जन वाल्मीकीच्या आक्रोशानें दयार्द्र झाले होते, पण बडेबडे राजनीतिज्ञ दयामायाशून्य होते. वाल्मीकीचा आक्रोश त्यांच्या क्षितींत नव्हता.

शेवटीं वेदींत यज्ञाग्नि प्रदीप्त करण्याविषयीं वसिष्ठांनीं आज्ञा केली. अध्वर्यु वेदीवर आरोहण करते झाले. वाल्मीकीची आशा निष्फळ झाली. ते गूहकाजवळ जाऊन रडत बसले. गूहकानें त्यांच्या मनाचें शांतवन करण्याचा यत्न केला. यज्ञाग्नि पेटल्याबरोबर रक्तपाताला सुरुवात व्हावयाची हें प्रत्येकाला कळून चुकलें होतें. ब्राह्मण वेदीवर आरूढ झाले हें कळल्याबरोबर विरुद्ध पक्षांतली मंडळी शस्त्रास्त्रें पाजळून वेदीच्या जवळ गेली. त्यांचें निवारण करण्यासाठीं याज्ञिक दुसऱ्या बाजूला उभे राहिले. तशी वेळ आलीच तर मध्यें पडण्यासाठीं गूहक समोर उभा राहिला. वाल्मीकींनीं उठून ब्राह्मणांच्या हातांतून यज्ञाग्नि

हिसकावून घेतला, आणि आपण स्वतः कुंडांत जाऊन बसले. ब्राह्मणांनीं त्यांना बाहेर काढून बाजूला लोटून दिलें, आणि त्यांनीं पुनः कुंडांत उडी घालूं नये म्हणून तीनशें ब्राह्मणांनीं वाल्मीकीचे हातपाय बांधण्याची तयारी चालविली. मोठाच कोलाहल सुरू झाला. ब्राह्मणांनीं यज्ञाग्नि प्रदीप्त करण्याचा पुनः यत्न केला. इतक्यांत अकस्मात् कोठून कोण जाणे पण पाण्याचे थेंब येऊन ब्राह्मणांच्या अंगावर पडले. आकाश निरभ्र होतें, आणि पाण्याचे थेंब तर पडले. तेव्हां हें अपवित्र जल असलें पाहिजे असा निर्णय करून स्नानानें शुचिर्भूत होण्यासाठीं ब्राह्मण निघून गेले. यामुळें कांहीं काळपर्यंत महाप्रळय लांबणीवर पडला. सर्वांच्या वृत्तींत या वेळीं कांहीं विचित्र भावाचा संचार झालेला होता. काय होणार आहे आणि काय नाहीं अशी भीति सर्वांना वाटत होती. लवकरच भयंकर घोर युद्ध होणार असें सर्वांना निश्चयपूर्वक वाटत होतें.

२

बेशुद्धावस्था.

गिरक्या घेत घेत विश्वामित्र खालीं खालीं पडत होते. ब्रह्मदेवानें तशा स्थितींत त्यांना शुद्धी-वर आणिलें. शुद्धीवर आल्याबरोबर त्यांच्या

मनाची जी स्थिति झाली तिचें बरोबर वर्णन कोणाला करतां येणार आहे ? 'मी आहें तरी कोठें ?' हें पाहण्यासाठीं त्यांनीं डोळे उघडले, चोहींकडे पाहिलें, आणि डोळे मिटले, ते पुनः बेशुद्ध ! पुनः शुद्धीवर आले, पुनः बेशुद्ध पडले ! 'मी जातों आहें तरी कोठें !' असें एकदां म्हणाले. नरकलोकाच्या जवळ जवळ आपण आलों आहों असें वाटून त्यांनीं भयानें डोळे मिटून घेतले, आणि पुनः ते बेशुद्ध झाले.

'माझी सृष्टि कोठें आहे ?' असें एकदां म्हणावें, आणि लगेच बेशुद्ध व्हावें. 'ती तर गेलीच ! पण पृथ्वीवर जरी मी असतों–' इतकें म्हणून पुनः बेशुद्धावस्था प्राप्त व्हावी. 'मला येवढी महत्त्वाकांक्षा कां उत्पन्न झाली ?–मी मोठेपण मिळवायला कां धडपडलों ?–तपश्चर्या कां केली ?–दिग्विजयाची इच्छा कां धरली ?–अरेरे ! सगळें आतां घालवून बसलों आं ?––मी आतां जाणार तरी कोठें ? परत फिरण्याची शक्ति नाहीं––नुसतें डोळे उघडून पाहण्याची सुद्धां ताकद नाहीं!'

असें म्हणतां म्हणतां विश्वामित्रांच्या डोळ्यांतून टपकन् अश्रु गळाले, आणि तेच ब्राह्मणांच्या अंगावर पडले. रडण्यानें त्यांची शक्ति अधिकच क्षीण झाली. ते बेशुद्ध झाले. त्या बेशुद्ध स्थितींतच त्यांना वाटलें कीं, ऋभु गातगात म्हणत आहेत, कीं आपण सगळे भाऊ भाऊ आहों. आपण दुसऱ्यावर अधिकार गाजवावयाचा अशी इच्छा माणसानें धरली नसती तर सगळ्या मनुष्यजातींत

बंधुभाव किती लवकर उत्पन्न झाला असता ! राजानें आपलें कर्तव्य चोख बजावलें असतें, तर आपण कसे सगळे भाऊभाऊ झालों असतों ! हा त्या गाण्याचा भावार्थ ऐकून आपल्या मनांत पुनः दुराकांक्षेला वाव द्यावयाचा नाहीं असा विश्वामित्रांनीं निश्चय केला. इतक्यांत ते पुनः शुद्धीवर आले, आणि त्या बरोबर केवळ परोपकारार्थ प्राण खर्ची घालण्याची त्यांनीं प्रतिज्ञा केली. पुनः बेशुद्ध होऊन गिरक्या घेत घेत ते खालीं खालीं पडूं लागले.

३

वाल्मीकीचा जय.

स्नानासाठीं गेलेले ब्राह्मण परत येऊन पाहतात तों मनुष्याच्या आकृतीसारखी कांहीं प्रचंड वस्तु वरून अग्निकुंडांत पडत आहे! सर्वांचे डोळे अर्थातच त्या दिशेकडे लागले. सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें. तो अलौकिक चमत्कार पाहून आश्चर्य आणि भीति यांनीं सगळे मूढ झाले. त्यांच्या तोंडांतून शब्द फुटेना. ज्यांनीं वाल्मीकींला धरून ठेविलें होतें, त्यांनीं आतां त्यांना सोडून दिलें. वाल्मीकि धांवत कुंडापाशीं गेले आणि पाहतात तों एक धिप्पाड पुरुष कुंडांत पडलेला ! त्यांनीं दिव्य दृष्टीनें

हा विश्वामित्र आहे हें जाणलें, आणि हें ज्ञान झाल्यावर तर त्यांच्या आक्रोशाला पारावारच राहिला नाहीं. त्यांच्या वीणें-तून अतिशय कोमल आणि करुणपर नाद निघूं लागले व डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. ते म्हणाले, 'क्षुद्र प्राण्यांनो, पहा ! तुम्ही तर तुच्छ मानव आहां. पण हा प्रतिसृष्टि निर्माण करणारा, प्रत्यक्ष ब्रह्मदेवावरही ज्यानें सरशी केली होती असा हा प्रतापी विश्वामित्र—याची दैवगतीमुळें काय ही अवस्था झाली आहे पहा ! हा केवढा प्रतापशाली वीर ! केवढा तपस्वी ! केवढा अलौकिक पुरुष ! पण कोण ही त्याची दशा ! तुम्ही आपल्या क्षुद्र सुखदुःखादिकांच्या पायीं वेडे होतां; पण या विश्वामित्राच्या सृष्टीचा कसा ध्वंस झाला आहे, त्याचें सृष्टिनिर्मातृत्वाचें उच्च पद कसें नष्ट झालें आहे, तो ज्या मनुष्य-स्थितींत जन्म पावला ती स्थितिसुद्धां कशी नष्ट झाली आहे आणि तिचा मागमूससुद्धां कसा उरला नाहीं तें पहा ! त्याच्या जिवाला कशा यातना होत असतील याची कल्पना करा. विश्वामित्रा-सारख्याची जर ही दशा, तर तुमच्यासारख्याची काय होणार याचा विचार करा. हे पहा ब्रह्मदेव विश्वामित्रासाठीं होणाऱ्या शोकानें कसे व्याकुल झाले आहेत ! विश्वामित्राच्या हातून ज्यांचा येवढा छळ झाला ते वसिष्ठ सुद्धां त्याच्या दुःखानें वि-व्हळत आहेत. सारांश, तुम्ही आपसांतलीं भांडणें टाकून द्या; शांत व्हा; हें आयुष्य क्षणभंगुर आहे.'

वाल्मीकीच्या वीणेंतून निघणारे हे करुणपर बोल ऐकून स-

गळे स्तब्ध झाले. सर्वांचीं मनें दयेनें आर्द्र झालीं; आणि त्यांना पश्चात्ताप होऊं लागला. सगळे मोठ्यानें रडूं लागले. त्यांनीं हातांतलीं शस्त्रास्त्रें टाकून दिलीं; त्याबरोबरच कठोर भाषणें आणि भांडणें यांचाही त्यांनीं त्याग केला. क्रमाक्रमानें त्यांच्या वृत्तींत पालट झाला.

इकडे विश्वामित्र हळूं हळूं शुद्धीवर येऊं लागले. दुरून संगीत ध्वनि कर्णीं यावा त्याप्रमाणें वाल्मीकीच्या वीणेंतून निघणारा ध्वनि त्यांचे कानीं मंद मंद जाऊं लागला. ते इतका वेळ मूर्च्छितावस्थेंत भयंकर साक्षात्कार पाहत होते. हळूं हळूं त्यांच्या शरीराला शीतलता येऊन त्यांनीं डोळे उघडले. वाल्मीकींचें गाणें सुरू होतेंच. त्या गाण्यांतले मृदु, मंद, तिरस्कारवाचक व त्याचप्रमाणें क्षमा व दया यांची याचना करणारे ते शब्द आतां विश्वामित्राच्या अंतःकरणाला शल्यासारखे टोंचूं लागले. विश्वामित्र डोळे उघडून पाहतात तों समोरच ब्रह्मदेवाची मूर्ती ! क्रमाक्रमानें ब्रह्मदेवाबरोबर आलेल्या ब्रह्मर्षींच्या व देवर्षींच्या मूर्तीही प्रकट झाल्या. विश्वामित्राच्या नेत्रांतून अश्रूंचा इतका पूर लोटला कीं, त्यांनीं अश्रुजलानें स्नान केलें. त्यांनीं हात जोडून ब्रह्मदेवाजवळ अपराधाची क्षमा मागितली. ब्रह्मदेवांनीं त्यांना पोटाशीं धरून गाढ आलिंगन दिलें, आणि म्हटलें, ‘ वत्सा ! आज तूं ब्राह्मण झालास. ’ विश्वामित्र रडत रडत त्यांच्या पायां पडले. वाल्मीकीचा गाण्याचा क्रम सुरूच होता.

ब्रह्मदेवाच्या दयाळूपणानें मुग्ध होऊन विश्वामित्रांनीं विचारलें, ' भगवन्, मी कोठें आहें ? ' ब्रह्मदेव ह्मणाले, ' पृथ्वीवर. तुझ्या सगळ्या दुःखांचा परिहार मी आतां करतों पहा ! ' इतकें बोलून त्यांनीं आपल्या कमंडलूंतलें जल विश्वामित्राच्या अंगावर सिंचन केलें. त्याबरोबर विश्वामित्राच्या अंगांत शक्तीचा संचार झाला. ते उठून उभे राहिले आणि पाहूं लागले. तेव्हां सगळें ब्रह्मांड शोकमग्न आहे, आणि पलीकडे एक मनुष्य गात आहे असें त्यांना दिसलें. वसिष्ठांनीं धांवत येऊन विश्वामित्राला गाढ आलिंगन दिलें. विश्वामित्राच्या अशा दुःस्थितींत त्यांच्या विषयींची दया वसिष्ठांच्या अंतःकरणांत प्रादुर्भूत झाली होती. विश्वामित्राला ब्राह्मणत्व मिळूं द्यावयाचें नाहीं हा भाव आतां राहिला नव्हता. अंतःकरणाची पूर्वीची कठोरता जाऊन कोमलता आली होती. वसिष्ठांनीं स्वतःच्या हातांनीं यज्ञोपवीत आणून तें मंत्रपूत करून विश्वामित्राच्या गळ्यांत घातलें आणि म्हटलें, ' बंधो, आज तुह्मी व आम्ही एक झालों. तुह्मी ब्राह्मण झालां. आतां आपण परस्परांना कडकडून भेटूं. ' विश्वामित्र ह्मणाले, ' गुरो, मी ऐश्वर्यमदानें उन्मत्त होऊन अज्ञानानें आपणांला फार कष्ट दिले. आपणांस त्यामुळें फार यातना झाल्या. मी आपणांस दुर्वचनें बोललों. आज माझी ही दशा पाहून आपल्या नेत्रांना पाणी आलें. पण आपलें दुःख पाहून माझ्या डोळ्यांत असे अश्रु कधीं आले नव्हते. आपल्या अंतःकरणांत इतकी दया भरली आहे हें पाहून आज माझे नेत्र अश्रूंनीं भरून आले आहेत.

ब्राह्मण परम दयाळु असतात अशी आज माझी खात्री झाली.' आणखी ब्रह्मदेवाकडे वळून ते ह्मणाले, 'महाराज, तुह्मी सृष्टिकर्ते, असें असून तुह्मांला मीं नाहीं नाहीं तें बोललों, इतकेंच नाहीं तर तुह्मांला कैद करण्याचेंही मनांत आणिलें. आज माझ्या या विपत्तींत तुह्मीं मला जीवदान दिलें. तेव्हां तुमची करुणा किती अपार ह्मटली पाहिजे ! ' ब्रह्मदेव ह्मणाले, ' वत्सा, तुझ्या सारख्या थोर पुरुषाला क्षमा न केली तर सृष्टिकर्त्याचा क्षमा हा गुण व्यर्थच ह्मटला पाहिजे.'

वसिष्ठ आणि विश्वामित्र यांचें उदाहरण पाहून इतर ब्राह्मण आणि क्षत्रिय युद्धासाठीं हातांत घेतलेलीं शस्त्रास्त्रें टाकून देऊन परस्परांना कडकडून भेटले, आणि आपापल्या मनांतले दुष्ट विचार मोकळ्या मनानें कबूल करून परस्परांची क्षमा मागूं लागले. आज कांहीं तरी भयंकर प्रसंग ओढवणार आहे अशी गूहक चांडाळाला भीति पडली होती, पण हा शुभ परिणाम झालेला पाहून तो आनंदानें नाचूं लागला. कोशांबीच्या राजाला आरंभिलेल्या यज्ञाचें विपरीत पर्यवसान पाहून आरंभीं फार दुःख झालें होतें, पण शेवटीं हें आनंदकारक पर्यवसान झालेलें पाहून तोही आल्हादित झाला, आणि यज्ञाकरितां केलेलें साहित्य विश्वामित्राच्या उपनयनासाठीं त्यानें मोठ्या हर्षानें देऊन टाकिलें. वाल्मीकि तर आनंदसागरांत पोहत होते, आणि ' भाऊ भाऊ आह्मी सर्व भाऊ ' हें गाणें घोकून घोकून म्हणत होते. जे कोणी भेटतील त्यांना ते आलिंगन देत होते. स्पृश्य, अस्पृश्य,

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, म्लेच्छ, यवन, राक्षस, वानर हा भेद त्यांचेपाशीं नव्हता. याप्रमाणें बाचत नाचत, तोंडानें गाणें गात आणि सर्वांना भेटत ते ब्रह्मदेवापाशीं आले. त्यांनाही त्यांनीं आलिंगन दिलें, पण लवकरच ओळखून जरासे खजिल झाले. इतक्यांत ब्रह्मदेवांनीं त्यांना आलिंगन देऊन म्हटलें, 'वाल्मीकि, आज तुमचाच जय झाला !' वसिष्ट दूर होते त्यांनीं जवळ येऊन वाल्मीकिला आलिंगन देऊन त्याच शब्दांनीं त्यांचें अभिनंदन केलें. तेव्हां सर्व दिशांतून 'वाल्मीकीचा जय' 'वाल्मीकीचा जय' असा नाद उठला. गूहकाचे लोकही 'वाल्मीकीचा जय' असा जयध्वनि मोठ्यानें करूं लागले. तेव्हां सर्व दिशांतून 'जय वाल्मीकि ! वाल्मीकीचा जय' असा प्रतिध्वनि येऊं लागला.

होतां होतां रात्र झाली; तेव्हां रडत रडतच मंडळी घरोघर परतली. आतां अराजकता नष्ट झाली असा भरंवसा प्रत्येकाच्या मनाला वाटला. विश्वामित्र ब्राह्मण झाल्यामुळें त्यांनीं राज्याचा त्याग केला, तेव्हां त्यांचे वंशज कान्यकुब्जाचें राज्य करूं लागले.

ब्रह्मदेवानें जातांना तिघां ऋषींना बोलावून सांगितलें कीं, माणसांत ऐक्यभावाची स्थापना करण्यासाठीं नारायण स्वतः लवकरच अवतार घेणार आहेत, तेव्हां त्यांच्या अवताराचा कार्यक्रम तुम्ही तयार करून ठेवावा. विश्वामित्र आणि वाल्मीकि दोघे वसिष्ठाबरोबर त्यांच्या आश्रमाला गेले, आणि तेथें तिघांनीं बसून त्या विषयाचा बिचार ठरविला.

खंड ८ वा.

१

रामायणाची कल्पना.

विश्वामित्र, वसिष्ठ आणि वाल्मीकि हे तिघे राम अवतार होण्याच्या पूर्वीं साठ हजार वर्षें रामानें पृथ्वीवर कोणकोणतीं अवतारकृत्यें करावयाचीं तें ठरवीत बसले होतें. रामायणाची शुद्ध रचनापद्धति ठरविणें येवढाच त्यांचा उद्देश नव्हता, तर पृथ्वीवरल्या निरनिराळ्या जातींत बंधुभाव स्थापन करण्याविषयींच्या उपायांचें चिंतन हें कार्य त्यांना करावयाचें होतें. नानाविध स्थितींच्या परंपरेंतून गेल्यामुळें मनुष्याची दुर्बलता विश्वामित्राला चांगली कळून चुकली होती. परंतु ऋभूंच्या गायनानें अंगांत संचरलेल्या नवविद्युच्छक्तीच्या प्रभावानें मनुष्यजातीची एकी करण्याविषयींची त्यांची इच्छा अद्याप प्रबळ होती. कोशांबी येथें आलेल्या अनुभवामुळें वसिष्ठाला हें कळून चुकलें होतें कीं, केवळ बुद्धीच्या जोरावर सगळ्या मनुष्यजातींत तर राहोच, पण दोन माणसांत देखील ऐक्य संपादन होणें कठीण आहे. त्या ठिकाणीं वाल्मीकीचा जो जय झाला त्यावरून दोघानांही एका गोष्टीचें उत्तम ज्ञान झालें;

आणि ती गोष्ट ही कीं, हृदय हेंच ऐक्यबंधनाचें अमोघ साधन आहे, आणि या ऐक्यसंपादनाचे कामीं वाल्मीकीइतका यशस्वी दुसरा कोणी होणार नाहीं. म्हणून या कामीं वाल्मीकीला साह्य करण्यांत आपले आयुष्य वेंचणें हाच आपल्या जीवनाचा मुख्य उद्देश त्यांनीं ठरविला. सारांश, वाल्मीकीचें हृदय, वसिष्ठाची बुद्धि आणि विश्वामित्राचें राजनीतिज्ञान हीं जगांत ऐक्य आणि बंधुप्रेम यांच्या स्थापनार्थ एकत्र झालीं.

पूर्णपणें विचार केल्यानंतर त्यांना आढळून आलें कीं, जरी ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्यांत एकी झाली, विश्वामित्र आणि वसिष्ठ हे मित्र झाले, आणि विश्वामित्राला ब्राह्मणत्व प्राप्त झाल्यामुळें ब्राह्मण आणि क्षत्रिय या दोन जातींत विरोध उत्पन्न होण्याचा आतां संभव उरला नाहीं, तथापि आतांपर्यंत घडलेल्या गोष्टी पुष्कळांच्या मनांत जागृत राहणारच. प्रत्यक्ष युद्धप्रसंग आला नाहीं तरी ऐक्याचा अभाव संभवनीय आहे. यासाठीं त्यांनीं ठरविलें कीं, रामानें आपल्या अवतारांत प्रथम या दोन जातींत ऐक्य घडवून आणावें. त्यानें अयोध्येच्या राजकुलांत जन्म घेऊन मिथिलेच्या राजकन्येशीं विवाह करावा, व गूहक चांडाल याच्याशीं मैत्री करावी; परशुरामाचा नाश करावा; पण सर्वस्वीं नाश करण्याला वसिष्ठ विरुद्ध होते, म्हणून ठरलें कीं, परशुरामाचा नुसता गर्व परिहार करावा. याप्रमाणें अगोदर आर्यांमध्यें एकी करून मग अनार्यांत ऐक्य स्थापन करण्याच्या उद्योगास लागावें. वानरांत जे धार्मिक प्रवृत्तीचे

असतील त्यांना हातीं धरून अधार्मिक प्रवृत्तीच्या लोकांचा नाश करावा. इतक्या प्राणांची हानि करण्याला वाल्मीकि हे विरुद्ध होते. म्हणून शेवटीं असें ठरलें कीं, फक्त वालीला मारावें. ह्यानंतर अत्याचार करणाऱ्या राक्षसांचा नाश करावा, आणि त्यांच्यांतला धर्मपरप्रवृत्तीचा असा जो बिभीषण त्याला राज्य-पद द्यावें. इतक्या राक्षसांचा संहार करण्याला वाल्मीकींनीं हरकत घेतली, पण ती मान्य झाली नाहीं. कारण, राक्षस हे इतके अत्याचारी होते कीं, त्यांची सुधारणा होणें बहुतेक असं-भवनीय होतें. इतकें केल्यावर रामानें पारद वगैरे लोकांचीं राज्यें जिंकून तेथें शांतता स्थापना करावी आणि मग स्वर्गा-रोहण करावें. शेवटीं हा सगळा कथाभाग घेऊन त्यावर नव-रसांनीं युक्त असें महाकाव्य रचण्याचें काम वाल्मीकींनीं करावें, असेंही ठरलें.

वाल्मीकीकडे हें काम सोंपवितांना वसिष्ठ म्हणाले कीं, राम हा धार्मिकांतला चूडामणि असा दाखवावा; त्याच्या शरीराला पापाच्या लेशाचाहि स्पर्श होऊं नये.

विश्वामित्र ह्मणाले, कीं, येवढ्यानेंच भागणार नाहीं. रामानें क्षत्रिय असावें, राजा असावें, आणि शौर्य व राजनीतीचें ज्ञान हे गुण त्याच्या चरित्रांत ठळकपणें दिसावे.

वाल्मीकि ह्मणाले, ' ब्रह्मर्षींची आज्ञा मला शिरसामान्य आहे. पण मी रामाला साधुही करावयाचा नाहीं आणि वीर किंवा मुत्सद्दीही करणार नाहीं. स्वतः नारायण या पृथ्वीतला-

वर अवतार घेणार आहेत, तेव्हां मी रामचंद्राला आदर्शपुरुष करीन. त्यांच्या चरित्रलेखनांत आदर्श पुरुष, आदर्श स्त्री, आदर्श दंपती, आदर्श बंधु, आदर्श परिवार, आदर्श मित्र, आदर्श राजा, आदर्श राज्यपद्धति, आदर्श सेवक, व आदर्श शत्रु हीं दाखवीन. आपल्या आशीर्वादानें असें एक मनुष्यचित्र मी रेखाटीन कीं त्याच्या दर्शनानें कोणत्याही देशांतल्या, जातीच्या व काळच्या माणसाला आनंद वाटून बोधही घेतां येईल.'

विश्वामित्र व वसिष्ठ म्हणाले, 'तथास्तु! तुमचा राम चिरकालपर्यंत मनुष्यजातीला आदर्शरूप होऊन राहील!'

वाल्मीकीनें कामगिरी पतकरल्याप्रमाणें आपल्या असाधारण प्रतिभेच्या जोरावर रामायणाची रचना करून तें वसिष्ठ व विश्वामित्र यांना ऐकविलें. वाल्मीकींची रचना ऐकून दोघांनींही त्याला शतशः धन्यवाद दिले.

२

नारायणाचा अवतार.

भगवान् भूतभावन नारायण या पृथ्वीतलावर स्वतः अवतीर्ण झाले. वसिष्ठ, विश्वामित्र व वाल्मीकि या तिघांनीं आंखून दिल्याप्रमाणें दुष्टांचें दमन आणि शिष्टांचें पालन करून सगळ्या पृथ्वीवर शांति-



" वाल्मीकीच्या आनंदाला सीमा राहिली नाहीं. व
वीणेलाही विश्रांति मिळाली नाहीं." (पृष्ठ ९६.)

Printed especially for A. C. Bhat, POONA.

The Bombay Art Printing Works, Fort.

राज्याची स्थापना त्यांनीं केली. त्यांच्या करतलाच्या छाये-खालीं पृथ्वी फलांनीं व धनधान्यांनीं पूर्ण झाली. ज्या ठिकाणीं निर्जन अरण्य होतें, त्या ठिकाणीं समृद्ध नगरें दिसूं लागलीं. समुद्र व नद्या व्यापारी गलबतें व सुखसंचार करणाऱ्या होड्या यांनीं भरून गेल्या. लोकांत सुख व स्वातंत्र्य यांची वृद्धि झाली. चोरीचपाटीचें नांवसुद्धां निघेनासें झालें. रोगराई व अकालीन मृत्यु ह्या गोष्टी लोकांच्या स्मरणांतून गेल्या. नृत्य, वादन वगैरे चौसष्ट कला यांच्या अभ्यासानें लोकांचीं मनें सुसंस्कृत होऊं लागलीं. नानाविध शिल्पांची उन्नति होऊं लागली. जिकडे नजर फेंकावी तिकडे अभ्रभेदी सौधशिखरें सूर्यकिरणांनीं लखाखतांना दिसत. जिकडे जावें तिकडे कर्णमधुर असा गीतध्वनि व वाद्यध्वनि श्रुतिगोचर होत असे. यूथि, जाति, मल्लिका, मालती, बक, कुरुबक, नवमल्लिका, काष्टमल्लिका, नागकेशर, गंधराज, बकुल यांनीं सुशोभित अशीं उद्यानें दिसत व इंदीवर, कोकनद, पुंडरीक, कुमुद, कल्हार, वगैरे सुगंधि पुष्पांच्या सुवासानें घ्राणेंद्रियाला आल्हाद होत असे. नेहमीं उत्तम प्रकारची पर्जन्यवृष्टि झाल्यामुळें गोरगरिबाला सुद्धां कधीं कष्ट किंवा दुःख होत नसे. लोकसंख्या सर्व बाजूंनीं वाढूं लागली. वसिष्ठांच्या हातून मिळालेल्या शिक्षणानें लोकांचीं मनें उन्नत होऊं लागलीं. विश्वामित्राच्या राजनीतिचातुर्यामुळें व उत्तम राज्यपद्धतीमुळें देशांत तंटेबखेड्यांचें नांवसुद्धां निघेना. वाल्मीकीच्या आनंदाला सीमा

राहिली नाहीं, व वीणेलाही विश्रांति मिळाली नाहीं. ते पृथ्वी-प्रदक्षिणा करीत हिंडत होते. त्यांच्या वीणेच्या तारेचा नाद ऐकून लोकांचे थवेच थवे त्यांच्या मागें धांवत. त्यांच्या गायनाचा सूर क्रमाक्रमानें चढत होता. त्या गाण्याचें पालुपद ह्मणजे ' भाऊ भाऊ, आह्मीं सर्व भाऊ ' हें होतें.

तथापि अद्याप वाल्मीकीच्या मनांतला संदेह गेला नव्हता. पृथ्वीवर ऐक्य व सत्य हीं स्थापित झालीं आहेत खरीं, तथापि खरें बंधुप्रेम उत्पन्न झालें आहे किंवा नाहीं याविषयीं त्यांना मोठी शंका वाटत होती.

३

रामायणाचें गान.

अशा रीतीनें चैनीनें व सुखानें काळ जाऊं लागला. एका मागून दुसरें वर्ष गेलें, दुसऱ्याच्या मागून तिसरें गेलें, अशीं अयुत वर्षें लोटलीं. रामचंद्राच्या वैकुंठारोहणाचा काळ समीप येऊन ठेपला. लक्ष्मणाच्या प्रयाणानंतर त्याच्या शोकानें विव्हल होऊन सरयू नदींत देहाचा त्याग करण्याचा रामचंद्राचा विचार ठरला. त्यासाठीं त्या नदीच्या वाम तीरावर त्यांनीं एक प्रचंड सभा बोलाविली. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, निषाद, चांडाल, राक्षस, वानरप्रभृति सगळ्या जातींचे लोक

सभेला आले. या मंडळीच्या देखत वाल्मीकींनीं आपले रामायणाचा प्रचार करावा अशाविषयीं विश्वामित्र व वसिष्ठ यांनीं त्यांना फार आग्रह केला. तेव्हां वाल्मीकींनीं आपले विद्यासंपन्न शिष्य लव आणि कुश यांच्या करवीं मोठ्या थाटानें वीणेच्या करुण स्वरांत आपलें काव्य गाऊन दाखविण्यास सुरुवात केली.

वाल्मीकि वीणा वाजवीत होते. कुश लव गात होते. श्रोतृवर्गाची वृत्ति तें गान ऐकण्यांत तल्लीन झाली होती. काव्यांतल्या करुण किंवा हास्य रसाबरोबर मंडळी रडत किंवा हंसत होती. पूर्व लीलांचें स्मरण होऊन स्वतः रामचंद्र केव्हां हर्षित व केव्हां दुःखित होत होते; केव्हां तर त्यांचे डोळे अश्रूंनीं भरून येत होते. तसेंच पूर्वावस्थेंतल्या दिवसांची स्मृति जागृत होऊन त्यांचें मन केव्हां शोकानें तर केव्हां मोहानें व्याप्त होत होतें. वाल्मीकीच्या आश्चर्यकारक कौशल्यानें वसिष्ठ आणि विश्वामित्र दोघेही मोहित झाले होते.

अशा वेळीं आकाशगंगा एकाएकीं दुभंग झाली, आणि वाल्मीकीच्या मस्तकावर वरून पुष्पवृष्टि झाली. त्याबरोबर सगळे लोक वर माना करून पाहूं लागले. तेव्हां ऋभु कुश आणि लव यांच्याबरोबर एकस्वरानें व एकतानतेनें गात गात खालीं उतरतांना दिसले. ते जसजसे जवळ आले, तसा त्यांच्या गाण्याचा ध्वनि अधिकाधिक मधुर लागूं लागला. त्यांच्या त्या गायनाच्या श्रवणानें श्रोतृमंडळीची चित्तवृत्ति उचंबळली. कधीं तरी ऋभूंच्या सुरांत आपला सूर मिळवून गाण्याची संधी

आपणांस मिळेल अशी विश्वामित्र आणि वसिष्ठ यांना आशा वाटत होती. आज आनंदातिशयानें त्यांचा कंठ फुटून रामायण बाहेर येऊं लागलें. ऋभु, मनुष्यें, ऋषि सगळेच प्रेमानें विवश होऊन दोन्ही हात वर करून गाऊं लागले, व रामचंद्रही हिताहितविवेकशून्य होऊन त्यांच्याबरोबर गाऊं व नाचूं लागले. जर ब्रह्मदेव त्या वेळीं तेथें आले नसते, तर तें नृत्य आणखी किती वेळ तसेंच चाललें असतें कोणाला ठाऊक!

४

प्रयाण.

ब्रह्मदेव आल्यावर त्यांनाही असेंच प्रेमानें उद्दाम होऊन नाचूं लागावें अशी उत्कंठा उत्पन्न झाली. मनुष्यरूपानें अवतीर्ण झालेल्या भूतभावनाचे मनोविकार त्यांच्यांतही प्रबळ झाले यांत काय नवल आहे! तथापि त्यांनीं आपली उत्कंठा दाबून रामचंद्राला वैकुंठाचें स्मरण करून दिलें. रामचंद्रानें आपल्या प्रजाजनांचा शेवटचा निरोप घेऊन सरयूच्या प्रवाहांत पार्थिव देहाचा त्याग केला. त्याचे बंधूही तसाच देहत्याग करून पूर्णब्रह्मांत लीन झाले.

प्रजेपैकीं जे वयोवृद्ध होते त्यांनीं तोच मार्ग स्वीकारून ऋभूंच्या संख्येंत भर टाकली. ऋभूंनीं मोठ्या प्रेमानें त्यांचें स्वागत केलें, आणि ज्या गायनानें एके काळीं क्षत्रियांच्या

मनांत विद्युच्छक्तीचा संचार केला होता तेंच बंधुप्रेमाचें गाणें ते अत्यंत प्रेमळ वाणीनें आतां ह्मणूं लागले.

५
सप्तर्षीतलें स्थान.

वसिष्ठांनीं या मर्त्य शरीराचा त्याग करून सप्तर्षि-गणामध्यें स्थान स्वीकारावें ह्मणून ब्रह्मदेवानें त्यांना फार आग्रह केला. त्याप्रमाणें वसिष्ठांनीं मृण्मय देह सरयूच्या प्रवाहांत टाकून नवा ज्योतिर्मय देह धारण केला, आणि जगांतल्या व्यवहाराचें पर्यालोचन करण्यासाठीं ते आकाशांत रोज उदय पावूं लागले.

६
विश्वामित्र.

विश्वामित्रांनीं देहत्याग केल्यावर तेही ऋभूचे मुख्य नेते होऊन बसले. तेव्हां त्यांना कळून चुकलें कीं, या पृथ्वी-वरलें साम्राज्य असार आहे. आत्म्याची उन्नति हें सारांतलें सार आहे.

७

स्वर्गसुख नको !

ब्रह्मदेवानीं वाल्मीकीला स्वर्गलोकाला येण्याविषयीं आग्रह केला, तेव्हां त्यांचे नेत्र अश्रूंनीं भरून आले; त्यांनीं ब्रह्मदेवाच्या चरणापाशीं लोळण घेतलें आणि म्हटलें, ' देवाधिदेवा, मी अत्यंत पापी, नराधम, आपल्या शब्दाप्रमाणें करण्यास मी असमर्थ आहें. मीं जीं पापें केलीं आहेत त्यांचें क्षालन अद्याप माझे हातून घडलें नाहीं. प्रभो! मी पापपंकांत मग्न आहें. मी स्वर्गलोकीं येऊन काय करूं? दयाघना! माझ्या हातून मनुष्यजातीसंबंधानें इतका अपकार घडला आहे कीं, सर्व माणसांना सारखें सुखी करण्याचें काम माझ्या हातून घडल्याशिवाय केलेल्या पापांचें योग्य प्रायश्चित्त माझे हातून घडलें असें होणार नाहीं. अहो दीननाथ! मनुष्याच्या जातीला केवढा ताठा असतो पहा! हा ब्राह्मण, हा क्षत्रिय, हा पंडित, हा मूर्ख, हा श्रीमंत, हा गरीब, असले भेदाभेद ते अभिमानानें काढीत बसतात. हे ब्रह्मन्! अशानें हीं माणसें कशीं सुखी होतील? जेव्हां हा अभिमान गळेल, तेव्हां सगळी पृथ्वी स्वर्गलोकाला जाईल. मग मी आपली आज्ञा शिरसावंद्य करीन. हे दयामय, हे करुणाकर प्रभो, तूर्त मला क्षमा करा.'

इतकें बोलून वाल्मीकि रडूं लागले. वाल्मीकीची ती वृत्ति

पाहून ब्रह्मदेव गहिंवरले. त्याच वेळीं वरून ऋभूंनीं वाल्मीकीच्या मस्तकावर पुष्पवृष्टि केली.

८

विराट् स्वरूपाचें दर्शन.

ब्रह्मदेव ह्मणाले, 'वर नभोमंडलाकडे नजर फेंका.' त्याबरोबर वाल्मीकींनीं वर पाहिलें, तों सवितृमंडलमध्यवर्ती, सरसिजासनसंनिविष्ट, केयूरवान्, कनककुंडलधारी, किरीटी, हिरण्मयवपु, शंखचक्रधारी, अशी श्री नारायणाची मूर्ति विराजमान दिसली. वाल्मीकीचें अंतःकरण भक्तिभावानें सद्गदित झालें. पाहतां पाहतां नारायणानें आपलें विराट् स्वरूप धारण केलें. लागलीच अनेक बाहु, अनेक उदरें, अनेक मुखें, अनेक नेत्र, कराल दंष्ट्रा आणि नानाविध रूपें दिसूं लागलीं. या स्वरूपाला आदि, मध्य, अंत कांहींच दिसेना. चंद्रसूर्य हे नेत्रांच्या जागीं, प्रज्वलित अग्नि हा मुखाचे ठायीं, आणि दिगंतव्यापी अशा प्रकाशानें तेजःपुंज झालेल्या शरीरानें पृथ्वी आणि आकाश यांच्यातलें अंतर व्यापून टाकलेलें! देव, दानव, यक्ष, राक्षस, ब्रह्मादि देव, सगळे मनुष्यप्राणी व जीवजंतु—सगळे या विराट् पुरुषाच्या मुखांत प्रवेश करीत होते. त्याच्या प्रत्येक रोमागणिक कोटि कोटि ब्रह्मांडें लीन झालेलीं होतीं. या विराट मूर्तीपुढें देवसुद्धां

क्षुद्र कीटकाप्रमाणें दिसत होते, मग मनुष्य ह्मणजे कःपदार्थ! असें तें स्वरूप पाहून वाल्मीकि स्तुति करून ह्मणाले:—

नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते
नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व।
अनन्तवीर्योऽमितविक्रमस्त्वं
सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः॥

तेव्हां ब्रह्मदेव बोलले. 'वाल्मीकि! पहा, सगळीं माणसें सारखीं आहेत. सगळे भाऊ भाऊ, आणि सगळे एक! जा, आणि ही समता, हा भ्रातृभाव, हें ऐक्य, गाण्याच्या रूपानें सांगत पृथ्वीवर हिंडा. तुह्मी अमर झालां आहां. तुमचा विजय असो!'

तेव्हां त्या विराट् पुरुषाच्याही तोंडून 'जय' असा शब्द निघाला.

समाप्त.

'वाल्मीकीचा जय'

वाल्मीकि नांव पृथिवींत दिगंत गाजे
त्या सार्थ "आद्यकवि" हें अभिधान साजे।
गाई यथार्थचि तदीय गुणानुवाद
तो वंगदेश्य कविवर्य हरप्रसाद ॥ १ ॥

जों जों घडे अधिक घर्षण चंदनातें
तों तों हि तें अधिक उत्कट गंध देतें।
रामायणामृत तसेंच जनास देतें।
आलोडिलें वरिवरी नवमाधुरीतें ॥ २ ॥

ब्रह्मर्षि सत्त्वनिधि मूर्तचि तो वसिष्ठ
एकातपत्र नृप गाधिज तो बलिष्ठ।
वाल्मीकि काव्यतरुकोकिल मंजुरावें
लोकत्रया रमविता प्रतिभाप्रभावें ॥ ३ ॥

आधार घेउनि अशा प्रथित त्रिमूर्ती
जो गद्यकाव्यमय सुंदर मूस ओती ॥
घारू करूनि मरुदादिक पंचभूतें
यत्कल्पना सकल लंघुनि विश्व जाते ॥ ४ ॥

सौंदर्यभाव मनुजांत सदा रहावा
हा शुद्धसत्त्व मनुजासि अमोल ठेवा
आदर्श उज्ज्वल जनाप्रति होउं राम
सीता स्त्रियांप्रति तशीच सतीललाम ॥ ५ ॥

काव्या रची करुनि यापरि भावना जो
ताऱ्यासमान कवितांबरिं तो विराजो।

वाल्मीकि ह्या कृतिवरी तुकवील शीर्ष
अन्या न केविं घडणार उमोप हर्ष ॥ ६ ॥

वाग्देवतावसतिला अजुनीहि योग्य
ही भूमि, हेंचि गणितों बहु थोर भाग्य ।
ऐसे अनेक निपजोत हरप्रसाद ।
होवो अम्हांवरि असाचि हर-प्रसाद ॥ ७ ॥

द्वारांत विश्वपुरिच्या स्थिर दीप दोन
जों काल सूर्यशशि राहति दीप्यमान
तारासुमें फुलति जों गगनांगणांत
वाल्मीकिचा विजय तोंवरि होउं गीत ॥ ८ ॥

स्वस्थानिं हा अचल जोंवरि भूमिगोल
वेलातटा जलधि जों न अतिक्रमील ।
जों काल संस्कृतगिरा जनिं हो अधीत
वाल्मीकिचा विजय तोंवरि होउं गीत ॥ ९ ॥

केले शिलामय पिरामिद मिश्रपांनीं ।
प्रासाद रम्य दयितास्मरणार्थ कोणी
शब्दार्थमन्दिर सुमेरु-समान अन्य
कोठें असे करिल जें जडजीव धन्य ॥ १० ॥
